सन २०२४-२५

# यशवंत

नॅक बी+ मानांकन




आधारस्तंभ

**श्री. विलासराव घुमरे (सर)**

सचिव, विद्या विकास मंडळ












विद्या विकास मंडळाचे

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालय

करमाळा, जि. सोलापूर फोन. (०२१८२) २२०५५२ पिन. ४१३२०३

# अविस्मरणीय क्षण



‘२००० नंतरची ग्रामीण कविता’
या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन
करताना मा. विलासराव घुमरे
व इतर मान्यवर.



एन.सी.सी मधील पोलीस भरती झालेले
विद्यार्थी यांच्या समावेत
मा. विलासराव घुमरे सर



राष्ट्रीय सेवा योजना उद्‌घाटन समारंभ प्रसंगी
तहसीलदार शिल्पा ठोकडे,
मा. विलासराव घुमरे




पदवी प्रदान सोहळ्याप्रसंगी उपस्थित
मा. अरुण अडसूळ, माजी कुलगुरू,
मा. विलासराव घुमरे,
रश्मी दीदी बागल, डॉ. व्हटकर



श्री. विलासराव घुमरे सर यांच्या वाढदिवसानिमित्त
सत्कार करताना उद्योजक पंढरीनाथ साटपे.



एन. सी. सी. विभागाकडून रक्तदान शिबिर

विनम्र अभिवादन

नव महाराष्ट्राचे शिल्पकार



कै. यशवंतराव चव्हाण

## विनम्र अभिवादन

### संस्थापक



## कै. नामदेवराव जगताप

## विनम्र अभिवादन

अनमोल सहकार्य



## कै. दिगंबरराव बागल (मामा)

# विद्या विकास मंडळ संस्थेचे
# विद्यमान विश्वस्त मंडळ



श्री. मिलिंद अर्जुन फंड
अध्यक्ष



श्री. तात्यासाहेब रंगनाथ मस्कर
उपाध्यक्ष



श्री विलासराव रामचंद्र घुमरे (सर)
सचिव



श्री. गुलाबराव कोंडीबा बागल
खजिनदार



श्री. विक्रमसिंह प्रतापराव सूर्यवंशी
सहसचिव



सौ. जयश्री विलासराव घुमरे
विश्वस्त



सौ. रश्मी दिगंबरराव बागल-कोलते
विश्वस्त



श्री. संभाजी लक्ष्मण किर्दाक
विश्वस्त



श्री. चंद्रशेखर गौरीशंकर शीलवंत
विश्वस्त



ॲड. विक्रांत घुमरे
विश्वस्त, कायदेशीर सल्लागार





श्री. आशुतोष विलासराव घुमरे
विश्वस्त

# * आधारस्तंभ *



**श्री. मिलिंद अर्जुन फंड**
अध्यक्ष



**श्री विलासराव रामचंद्र घुमरे (सर)**
सचिव



**डॉ. एल. बी. पाटील**
प्राचार्य



**प्रा. डॉ. अनिल साळुंखे**
उपप्राचार्य
वरीष्ठ विभाग



**श्री. संभाजी लक्ष्मण किर्दाक**
उपप्राचार्य
कनिष्ठ विभाग

# * उपलब्धी व सेवानिवृत्ती *



प्रा. अभिमन्यू माने
इंग्रजी विभाग
विद्यावाचस्पती पदवी



प्रा. कृष्णा कांबळे
अर्थशास्त्र विभाग
करीअर कट्टा तालुका समन्वयक
पदी निवड



प्रा. नितीन तळपाडे
सहा. प्राध्यापक, मराठी
राज्यस्तरीय आदिवासी समाज
भूषण पुरस्कार



प्रा. डॉ. अंकुश करपे
सहा. प्रध्यापक, अर्थशास्त्र
राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार



प्रा. सुधीर मुळीक
राष्ट्रीय पात्रता परीक्षा
उत्तीर्ण



प्रा. हर्षद जाधव
सहा. प्राध्यापक, वाणिज्य
राज्य पात्रता परीक्षा उत्तीर्ण



प्रा. सुजाता भोरे
सहशिक्षिका
राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका
पुरस्कार



प्रा. विष्णू शिंदे
सहा. प्राध्यापक, भौतिकशास्त्र
यशकल्याणी
समाज गौरव पुरस्कार



प्रा. विजय वारुळे
जिल्हा स्तरीय
कृतिशील प्राध्यापक
पुरस्कार



कॅप्टन डॉ. विजया गायकवाड
एन. सी. सी. उजळणी
वर्ग उपस्थिती



श्री. चंद्रकांत पाटील
सेवानिवृत्त
दि. ३१ मे, २०२५



श्री. विक्रम सूर्यवंशी
सेवानिवृत्त
दि. ३१ जुलै, २०२५

# ✻ विद्यार्थी यशोगाथा ✻

## विज्ञान विभाग


कु. भक्ती कोंडलकर
७३.६७%


कु. सिद्धी व्हरे
७३.५०%


चि. विक्रमादित्य कोळेकर
७३.१७%

## वाणिज्य विभाग


कु. मानसी वासानी
९०.६७%



कु. अमृता सांगळे
८७.१७%


कु. अनुष्का चौगुले
८५.५०%

## कला विभाग


कु. संजना मारडकर
८८.००%


कु. पुजा गोरे
८६.५०%


कु. शेख गुलनाज
८२.३३%

## ✻ पोलिस पदी निवड झालेले विद्यार्थी ✻


ज्योति मुसळे


तनिषा भिसे


विठ्ठल गिरी


सायली नीळ
अविष्कार स्पर्धेसाठी सहभाग
वालचंद महाविद्यालय, सोलापूर


ऋषिकेश राऊत


विठ्ठल निमगिरे


समाधान जाधव


नवलेखक शिबिरासाठी उपस्थित
अमित सरवदे
(हिंदी विभाग)

# अविस्मरणीय क्षण



कु. आश्लेषा बागडे
'यशवंत श्री' पुरस्काराने सन्मानित
करताना मा. विलासराव घुमरे सर




आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा
पारितोषिक वितरण समारंभ



एकनाथ स्वाभिमानी सेना महाराष्ट्र यांच्या
वतीने राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार
स्वीकारताना मा. संभाजी किर्दाक



'२००० नंतरची ग्रामीण कविता'
या राष्ट्रीय चर्चासत्र प्रसंगी विचार व्यक्त
करताना मा. विलासराव घुमरे सर



महाविद्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली.




राज्यशास्त्र विभाग अभ्यास दौरा

विद्या विकास मंडळाचे

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय

करमाळा, जि. सोलापूर पिन कोड ४१३२०३

फोन नं. : (०२१८२) २२०५५२ Email : ycmkarmala@gmail.com

(नॅक मानांकन बी+ सी. जी. पी. ए. २.७१)


## संपादक मंडळ

**अध्यक्ष**

**डॉ. एल. बी. पाटील**

प्राचार्य

**संपादक मंडळ**

**श्री. नितीन तळपाडे**

**संपादन समिती सदस्य**

प्रा. डॉ. अनिल साळुंखे

प्रा. डॉ. अभिमन्यू माने

प्रा. कृष्णा कांबळे

प्रा. डॉ. विजया गायकवाड


प्रा. हनुमंत भोंग

प्रा. सुजाता भोरे

**मुद्रक**

**अंजिश प्रिंटर्स**

'यशोरंग,' लक्ष्मीपुरी, कोल्हपूर.




नवीन शैक्षणिक धोरणाविषयी मुखपृष्ठ संकल्पना

**कु. काजल काशीनाथ गावडे**

बी. ए. भाग २

या अंकात प्रकाशित झालेले लेख, कविता यांतील मते संबंधित लेखक, कवींची आहेत.
त्यांतील मतांशी संपादक मंडळ, महाविद्यालय वा संस्था सहमत असेलच असे नाही.

विद्या विकास मंडळाचे

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय

करमाळा, जि. सोलापूर पिन कोड ४१३२०३
फोन नं. : (०२१८२) २२०५५२ Email : ycmkarmala@gmail.com
(नॅक मानांकन बी+ सी. जी. पी. ए. २.७१)


## यशवंत - वार्षिक नियतकालिक (२०२४-२५)

नियम क्र. ८, तक्ता क्र. ८ नुसार तपशील


| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर |
| **प्रकाशन काळ** | : | वार्षिक |
| **प्रकाशकाचे नाव** | : | प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | विद्यानगर, करमाळा, जि. सोलापूर |
| **संपादकाचे नाव** | : | प्रा. नितीन तळपाडे |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | शाहूनगर, करमाळा, जि. सोलापूर |
| **मुद्रकाचे नाव** | : | श्री. आनंद पांडुरंग उरुणकर |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | अंजिश प्रिंटर्स, १५०४/६-७, 'यशोरंग', जनता कंझ्युमर्स गल्ली, लक्ष्मीपूरी, कोल्हापूर ४१६००८. |
| **मालकी** | : | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा. |


**मी, प्राचार्य डॉ. लक्ष्मण बी. पाटील जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरी आहे.**

(फक्त खासगी वितरणासाठी)

प्राचार्य
**डॉ. एल. बी. पाटील**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर

# यशवंत परिवाराचे आधारस्तंभ
# मा. श्री. विलासरावजी घुमरे (सर) यांचे मनोगत



विद्या विकास मंडळ, करमाळा, जि. सोलापूर संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या यशवंत या वार्षिक अंकाच्या माध्यमातून आजी-माजी विद्यार्थी पालक यांच्याशी संवाद साधताना मनात समाधानाची भावना आहे. कै. नामदेवरावजी जगताप यांनी १९६६ - ६७ मध्ये विद्या विकास मंडळाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली.

**इवलेसे रोप लावियेले द्वारी ।**
**त्याचा वेलू गेला गगनावरी ।।**

या उक्ती प्रमाणे महाविद्यालयाचे एका वटवृक्षात रूपांतर झाले आहे. करमाळा तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी या महाविद्यालयामुळे प्राप्त झाली. या महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत याचा सार्थ अभिमान मला आहे. महाविद्यालयातील कनिष्ठ,वरिष्ठ विभागांमध्ये कला वाणिज्य आणि विज्ञान शाखांमधून ३५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थिनींसाठी वसतिगृह, क्रीडांगण, शूटिंग रेंज हॉल,सांस्कृतिक विभाग इत्यादींच्या माध्यमातून आमचे विद्यार्थी कला क्रीडा साहित्य चित्रपट या वेगवेगळ्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत आहेत. विद्या विकास मंडळ ही करमाळा तालुक्यातील एक मोठी संस्था आहे. या संस्थेची धुरा गेली ३८ वर्षे मी सांभाळत आहे. संस्थेच्या विकासामध्ये महाराष्ट्र राज्याचे माजी सामाजिक न्याय राज्यमंत्री कै. दिगंबररावजी बागल (मामा ) यांचे योगदानही खूप महत्त्वपूर्ण आहे. भविष्यामध्ये या महाविद्यालयाचा विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेईल यात तीळ मात्र शंका नाही. विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी आम्ही सर्वतोपरी तत्पर आहोत.

**विलासराव घुमरे,**
**सचिव**
विद्या विकास मंडळ, करमाळा

विद्या विकास मंडळाचे

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय


करमाळा, जि. सोलापूर पिन कोड ४१३२०३

## महाविद्यालय विकास समिती

College Development Committee (C. D. C.)

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री. मिलिंद अर्जुन फंड | अध्यक्ष |
| २ | मा. श्री. विलासराव रामचंद्र घुमरे | संस्था सचिव |
| ३ | श्री. कृष्णा बुवाजी कांबळे | सदस्य |
| ४ | डॉ. विजया हरिदास गायकवाड | सदस्य |
| ५ | श्री. प्रमोद दत्तात्रय शेटे | सदस्य |
| ६ | श्री. सुधीर दिनकर मुळीक | सदस्य |
| ७ | सौ. अनिता वसंतराव देशमुख | सदस्य |
| ८ | डॉ. मीरा चंद्रशेखर रामनवमीवाले | सदस्य |
| ९ | ॲड. श्री. विक्रांत विलास घुमरे | सदस्य |
| १० | डॉ. अनंत बाळू शिंगाडे | सदस्य |
| ११ | श्री. चंद्रशेखर गौरीशंकर शीलवंत | सदस्य |
| १२ | डॉ. अंकुश तुकाराम करपे | सदस्य |
| १३ | कु. प्रियांका किरण देसाई | सदस्य |
| १४ | कु. काजल साहेबराव भोई | सदस्य |
| १५ | प्राचार्य डॉ. लक्ष्मण बाबासाहेब पाटील | प्राचार्य तथा सचिव |

# * प्राचार्यांचे मनोगत *



प्रिय विद्यार्थी, पालक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालय व यशवंत परिवाराचे शुभचिंतक हो, नमस्कार!

महाविद्यालयाचा '**यशवंत**' हा वार्षिक अंक आपल्या हाती सुपूर्द करताना मला सार्थ अभिमान व आनंद वाटत आहे. कारण या वार्षिक अंकामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सळसळणाऱ्या उत्साहाचे, पराक्रमाचे, कठोर परिश्रमाचे, तसेच सर्व कर्मचाऱ्यांची महाविद्यालयाप्रती असलेली निष्ठा आणि समर्पणाची भावना यांचे प्रतिबिंब उमटले आहे.

उच्च शिक्षणाच्या संधी नसताना सर्वात प्रथम १९६६ साली सुरू झालेल्या या अग्रगण्य महाविद्यालयाविषयी आपणा सर्वांची तळमळ, आस्था आणि प्रोत्साहन यामुळेच आम्हाला विद्यार्थ्यांना ज्ञानदानाबरोबरच सह-शैक्षणिक उपक्रमासाठी प्रेरणा व उत्साह मिळत असतो. कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही पारंपरिक ज्ञानशाखांचा उच्च माध्यमिक ते पदवी पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी इथे मिळते. तसेच या ज्ञानमंदिरात त्यांना आपल्या भवितव्याची जाणीव निर्माण होते. महाविद्यालयामध्ये सतत वर्षभर विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, व्याख्याने, थोरामोठ्यांच्या जयंती व पुण्यतिथी, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन, मा. घुमरे सरांच्या वाढदिवसानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन साप्ताह, बक्षीस वितरण समारंभ इत्यादी कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा समृद्ध सांस्कृतिक पर्यावरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचे आकलन होते व भविष्याचा वेध घेता येतो.

नजीकच्या काळात पेट्रोल, डिझेलच्या वाहनांची जागा बॅटरीवर चालणारी वाहने घेतील. हा भविष्याचा वेध घेऊन यशवंत परिवाराचे आधारस्तंभ आदरणीय श्री. घुमरे सर यांच्या प्रयत्नाने महाविद्यालयात सन २०२५- २०२६ पासून **Electric Vehicle Workshop** सुरू केले जात आहे. करमाळा तालुक्यातील १८ वर्षे पूर्ण केलेल्या व महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ करून घेता येईल. भविष्यात विद्या विकास मंडळ, करमाळा सर्व Electronic Vehicle ची Dealership घेणार आहे.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणारा '**करिअर कट्टा**' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अखंड कार्यरत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना व्यवसाय व स्वयं रोजगाराविषयी मार्गदर्शन केले जाते.

महाविद्यालयात सर्व विभाग विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी अनेक प्रकारचे सामंजस्य करार करत असते; त्याद्वारे अनेक प्रकारच्या गरजांचे आदान-प्रदान होत असते.

महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणजे डॉ. ए. पी. माने यांनी इंग्रजी विषयात विद्यावाचस्पती ही पदवी मिळवली. कु. काजल गायकवाड हिला अर्थशास्त्र विषयात विद्यापीठाचे सुवर्ण पदक मिळाले. श्री. शिवम राजेंद्र चिखले याने शालेय राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये रिकर्व्ह या प्रकारात महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत सांघिक मध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तसेच भागलपूर बिहार येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये त्याची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे संघटनेच्या विविध स्पर्धेच्या गुणांकनांच्या आधारावर आर्मी इन्स्टिट्यूट पुणे येथे जागतिक धनुर्विद्या युवा अजिंक्यपद स्पर्धा व आशियाई धनुर्विद्या स्पर्धेसाठी घेण्यात येणाऱ्या निवड चाचणीसाठी निवड झाली. कु. आश्लेषा बागडे हिचा आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर द्वितीय क्रमांक प्राप्त केला. त्याचबरोबर आश्लेषाने या वर्षात उत्तराखंड येथे झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. त्याचबरोबर कर्नाटक राज्यातील बंगलोर येथे झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये रौप्यपदक प्राप्त केले. तिची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली. श्री. मच्छिंद्र लोंढे याने मल्लखांब स्पर्धेत राज्यपातळीवर रौप्य पदक मिळविले. तर श्री. गोरख लोंढे याने विद्यापीठातर्फे भोपाळ येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मल्लखांब स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर सहभाग नोंदविला. श्री. अमित सरवदे याच्या 'यशवंत' या वार्षिक अंकातील कथेला विद्यापीठात तृतीय क्रमांक मिळाला.

आदरणीय विलावराव घुमरे सर यांच्या संकल्पनेतुन विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी महाविद्यालयातील दिला जाणारा सर्वोच्च '**यशवंत श्री २०२५**' हा पुरस्कार **आश्लेषा बागडे** हिने क्रीडा क्षेत्रामध्ये केलेल्या कामगिरीच्या आधारावर देण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप म्हणजे रोख रक्कम रुपये ५१,०००/- व सन्मान चिन्ह देऊन करण्यात येतो.

महाविद्यालयात अनेक सकारात्मक गोष्टी घडत आहेत परंतु आम्हाला अजूनही बरेच काही साध्य करायचे आहे. कुसुमाग्रज यांच्या कोलंबसाचे गर्वगीतातील '**अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला!**' या उक्तीप्रमाणे आम्ही इप्सित साध्य करण्यासाठी निरलसपणे झटत राहू.

प्राचार्य

**डॉ. एल. बी. पाटील**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर

# संपादकीय मनोगत



यशवंत परिवाराचे आधारस्तंभ आणि विद्या विकास मंडळाचे सचिव मा. विलासराव घुमरे सर यांच्या प्रेरणेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल बी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सहभागाने पूर्णत्वास आलेला **'यशवंत'** हा वार्षिक अंक आपल्या सर्वांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी या अंकाची निर्मिती करण्यात आली आहे. महाविद्यालयाच्या वतीने वार्षिक अंक काढण्यात येणार आहे. ही सूचना विद्यार्थ्यांपर्यंत गेली आणि त्यांनी वेगवेगळ्या विषयावर लेखन करण्यास सुरुवात केली. आपल्या नावावर अंकामध्ये कविता, कथा, वैचारिक लेख असे काहीतरी छापून येईल याचा मनस्वी आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

प्रस्तुत अंकाचे मुखपृष्ठ कु. काजल गावडे बी. ए. भाग २च्या विद्यार्थीनीने केले आहे. जावेद मुलाणी, अर्पिता गायकवाड, अमृता आरणे, आम्रपाली कांबळे, अबूतालीब शेख, या विद्यार्थ्यांनी या अंक निर्मितीसाठी विशेष परिश्रम घेतले आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांच्या सहभागाशिवाय हा अंक पूर्णत्वास आलाच नसता. विद्यार्थी, महाविद्यालयातील सहकारी, प्राध्यापक, बंधू-भगिनी या सर्वांच्या सहाय्यामुळे हा अंक साकार होतो आहे. या सर्वांचे खूप खूप आभार.

संपादकीय कामामध्ये वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य, डॉ. संभाजी किर्दाक, प्रा. डॉ. वंदना भाग्यवंत, विष्णू शिंदे आणि अंतर्गत गुणवत्ता निर्धारण समितीचे प्रमुख डॉ. अंकुश करपे यांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प पूर्णत्त्वास गेला. या सर्वांना धन्यवाद देण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणेच अधिक कृतज्ञतेचे होईल. संस्थेचे अध्यक्ष मा. मिलिंद फंड सर आणि सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी यांचे मनापासून आभार.

**'यशवंत'** हा वार्षिक अंक होईल तितका अचूक करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे या प्रयत्नात प्रतिरूप मुद्रणाची जबाबदारी घेतलेले अंजीश प्रिंटर्सचे श्री. आनंद पांडूरंग ऊरुणकर यांचा मोठा वाटा आहे. अंकातील जे चांगले असेल ते मोठ्या मनाने आपण स्वीकाराल आणि चुकून काही उणीवा राहिल्या असेल, तर संपादक म्हणून माझी असेल. तेव्हा त्रुटींबद्दल क्षमा मागून संपादकीय मनोगतास पूर्ण विराम देतो.

**प्रा. नितीन तळपाडे**

# * अनुक्रमणिका *


| लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| **मराठी विभाग (गद्य)** | | |
| एन. सी. सी. व्यक्तिमत्त्व घडवणारी संधी | सार्जंट सुमित राजेंद्र घाडगे | ९ |
| अमृतवेल | श्री. अमित शिवाजी सरवदे | १० |
| भौगोलिक संकल्पना | कु. अर्पित अर्पिता गायकवाड | १२ |
| स्त्री | कु. शिवांजली दिगंबर कुदळे | १३ |
| रंगनाथ पठारे | कु. काजल गावडे | १४ |
| न कळलेले बाबा | कु. शिवानी हरिदास कानगुडे | १५ |
| एक होता कार्व्हर... | अम्रपाली कांबळे | १६ |
| न बदलणारं नातं... | कु. राणी क्षीरसागर | १८ |
| आई | कु. सानिका कदम | १९ |
| गुरु-शिष्य | कु. वनिता दादाराव पवार | २० |
| यत धारयति तत् धर्म | कु. धनश्री क्षीरसागर | २१ |
| भारत : एक महासत्ता | समाधान दामोटरे | २२ |
| गाडगेबाबा आणि सामाजिक कार्ये | कु. दीपली कालिदास शिंदे | २४ |
| ओढ लावणारं घर... | कु. वैष्णवी अंकुश पाटील | २५ |
| महात्मा फुले यांचे जीवन व कार्य | कु. शुभांगी हनुमंत वाघ | २७ |
| माझी सहल | कु. रोहित जगताप | २९ |
| छायाचित्रीकरण | कु. अमृता आरणे | ३० |
| ताणतणाव व्यवस्थापन | प्रा. दीपक सोनवणे | ३१ |
| शेतकरी : जगाचा पोशिंदा | सानिका कदम | ३३ |
| कृत्रिम बुद्धिमत्तेचे संभाव्य धोके | डॉ. अंकुश तु. करपे | ३४ |
| मुली वाचवा...! | शिवांजली कुदळे | ३६ |
| स्त्री-पुरुष समानता | रोहीत जगताप | ३८ |
| सावित्रीबाई फुले यांचे लेखन साहित्य आणि मोलाचे योगदान | डॉ. सपनाराणी रामटेके | ३९ |
| स्त्रीभ्रूण हत्या | सायली नीळ | ४२ |
| ग्रामीण कवितेचे स्वरुप | प्रा. प्रमोद दत्तात्रय शेटे | ४३ |
| सिझर कर म्हणतेय मातीतील पर्यावरण जाणीवा | प्रा. डॉ. वंदना भाग्यवंत | ४९ |
| वाणिज्य शिक्षण : आजची गरज आणि उद्याची दिशा | हर्षद अनिता बळीराम जाधव | ५१ |

मराठी विभाग (पद्य)


| | | |
|---|---|---|
| आजची स्त्री | कु. साक्षी आवटे | ५२ |
| वडील | प्रियांका संतोष ढेरे | ५२ |
| सांग ना | रोहित जगताप | ५३ |
| शाळा | प्रा. आनंद शेळके | ५४ |
| मैत्रिचा विश्वास | कु. शिवांजली कुदळे | ५५ |
| कणा | कु. काजल काशीनाथ गावडे | ५६ |
| मैत्री | नाजिया समीर तांबोळी | ५६ |
| जन्माला आले | कु. साक्षी बरडे | ५७ |
| लळा | तुषार जाधव | ५८ |
| पाणी | प्रगती सुरवसे | ५९ |
| कॉलेज गारवा | कु. गायत्री गौतम येंगडे | ६० |
| निसर्ग | आफ्रिन आघाडीवाले | ६० |
| हवा होता बाबा तुमचा हात | कु. गायत्री गौतम येंगडे | ६१ |
| अनमोल जीवन | कु. शुभम देशमाने | ६२ |
| मैत्री | कु. जाधव राजश्री हनुमंत | ६२ |
| आई वडील आले माझ्या वाट्याला | कु. गायत्री गौतम येंगडे | ६३ |
| बाबा | रोहित राजेंद्र पवार | ६४ |
| जीवन एक : संघर्ष | कु. गायत्री गौतम येंगडे | ६४ |
| आयुष्य - एक सुंदर प्रवास | विठ्ठल माधव नलवडे | ६५ |
| एक नातं | प्रियांका संतोष ढेरे | ६५ |
| मैत्री | नाजिया समीर तांबोळी | ६६ |
| जगणं | प्रा. डॉ. चारू देवकर | ६७ |
| सुख दुःख | प्रा. डॉ. चारू देवकर | ६७ |
| मैत्री | धनश्री गपाट | ६८ |


हिंदी विभाग (गद्य)


| | | |
|---|---|---|
| श्याम की माँ | कोमल संजय वायदंडे | ७० |
| शिक्षक दिवस | सृष्टी योगेश शहा | ७१ |
| हर घर की बेटी | मुस्ताक इम्तियाज शेख | ७३ |

**हिंदी विभाग (पद्य)**

| | | |
|---|---|---|
| दोस्ती | सृष्टी योगेश शहा | ७५ |
| स्वतंत्रता का भ्रम | अमित शिवाजी सरवदे | ७६ |

**इंग्रजी विभाग (गद्य)**

| | | |
|---|---|---|
| Friendship | Srushti Shaha | 78 |
| William Shakespeare | Abutalib Shaikh | 79 |
| Geoffrey Chaucer | Kalpesh Bhoj | 81 |

**इंग्रजी विभाग (पद्य)**

| | | |
|---|---|---|
| College Days | Sanika Dharak | 82 |
| Poem on Life | Akanksha Dain | 83 |
| Friendship | Sakshi Jagtap | 84 |

**अहवाल विभाग**

| | |
|---|---|
| कार्यालय विभाग | ८६ |
| मराठी विभाग | ९१ |
| इतिहास विभाग | ९२ |
| अंतर्गत तक्रार निवारण समिती | ९३ |
| भूगोल विभाग | ९३ |
| अर्थशास्त्र विभाग | ९४ |
| एन. सी. सी. विभाग | ९५ |
| सांस्कृतिक विभाग | ९६ |
| वाणिज्य विभाग | ९७ |
| Department of Physical Education & Sport Report | ९८ |
| ग्रंथालय विभाग | १०१ |
| इंग्रजी विभाग | १०२ |
| विज्ञान विभाग | १०६ |
| हिंदी विभाग | १०७ |
| एन. एस. एस. विभाग | १०८ |

# * मराठी विभाग *

०१

# एनसीसी व्यक्तिमत्त्व घडवणारी संधी

**एन. सी. सी**. ही विद्यार्थ्यांसाठी शिस्त, नेतृत्त्वगुण आणि राष्ट्रसेवी शिकवणारी एक अद्भुत संधी आहे. एन. सी. सी.मध्ये सहभागी होण्याचा निर्णय माझ्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. ३ वर्षे एन. सी. सी.चा भाग होऊन मला स्वतःमध्ये अनेक सकारात्मक बदल जाणवले.

मी एन. सी. सी.मध्ये सहभागी झालो तेव्हा मला काय शिकायला मिळेल, याची उत्सुकता होती. सुरुवातीला सकाळी लवकर उठून परेड करणे आणि कठोर शिस्त पाळणे थोडे कठीण वाटले. पण त्यातून खूप शिकायला मिळाले.

एन. सी. सी.मध्ये मला शिस्त, वेळेचे व्यवस्थापन, समूहकार्य आणि नेतृत्वगुण शिकविले. एन. सी. सी.मध्ये घेतल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांमुळे समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळाली.

**'एक भारत, श्रेष्ठ भारत'** हा केरळ येथील कॅम्पला जाणे माझ्यासाठी आयुष्यातील एक अवि-स्मरणीय अनुभव होता. आम्हाला जाण्यासाठी लागलेला दोन दिवसाचा रेल्वे प्रवास तर निसर्गाची ओळख करून देणारा होता. मी एन. सी. सी.मुळे पहिल्यांदा महाराष्ट्राच्या बाहेर गेलो. कँपमध्ये सकाळी उठून केलेली पी. टी., वेगवेगळे खेळ, रिफ्रेशमेंट, तेथील मित्रमंडळी, वातावरण आणि संध्याकाळच्या रोल कॉलने त्या दिवसांना खास बनविले.

एन. सी. सी.मध्ये **'ज्यूनिअर अंडर ऑफिसर'** हे पद मिळवणे माझ्यासाठी अभिमानाचा क्षण होता. या पदामुळे माझ्यात नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन करणे यासारखे गुण आले. मी माझ्या ३ वर्षांच्या एनसीसीमध्ये ५ कॅम्प केले. त्यात ३ कॅम्प मध्ये मी सीनिअर होतो. मला मिळालेली वेगवेगळी सर्टिफिकेटस् आणि मेडल्स, ट्रॉफी माझ्यासाठी एन. सी. सी.ची आठवण आहे.

मी सायन्सला असल्यामुळे बोर्डचा अभ्यास आणि एनसीसीची जबाबदारी सांभाळणे सुरुवातीला अवघड वाटले; पण नियोजनशक्ती व चिकाटी यामुळे मी दोन्ही गोष्टी यशस्वीरीत्या पार पाडल्या. साहसी क्रिया, क्रीडा यांसाठी मानसिक आणि शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी मी नियमित व्यायाम सुरू केला. यातून मला शारीरिक आणि मानसिक ताकद निर्माण झाली.

एन. सी. सी.ने मला माझ्या जीवनात शिस्त आणि नेतृत्वगुणांचे महत्त्व शिकवले. यामुळे माझे व्यक्तिमत्व घडले आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव निर्माण झाली. एन. सी. सी.मुळेच मला इंडियन आर्मी बद्दल प्रेम व त्यामध्ये सहभाग घेण्याची इच्छा निर्माण झाली.

एन. सी. सी.च्या सर्व अनुभवांसाठी मी खूप कृतज्ञ आहे.

**सार्जंट सुमित राजेंद्र घाडगे**
बी. ए. भाग ३

०२

# अमृतवेल

**वि. स. खांडेकर**

**(अमृतवेल या कादंबरीचा धार्मिक सारांश)**

**वि.** स. खांडेकर लिखित या कादंबरीचा प्रकाशन काळ १९६७ असला तरी २०२५ सालीसुद्धा 'अमृतवेल'चे गारुड मराठी रसिकांवर कायम आहे. वि. स. खांडेकरांना भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार '**ज्ञानपीठ**' याने सन्मानित करण्यात आले आहे. सुंदर रीतीने केलेली पात्रांची गुंफण, सकस दर्जेदार कथा, दुःखावर मात करून आयुष्य कसे जगावे हे सांगणारे प्रसंग; यामुळे 'अमृतवेल' आपल्या मनाचा ठाव घेते.

पाच वर्षांपूर्वी जेव्हा मृत्यूच्या जाळ्यातून झेप घेतली आणि नव्याने आयुष्याची सुरवात केली. तेव्हा मराठी साहित्यामधील 'अमृतवेल' ही पहिलीच कादंबरी वाचण्याची संधी मिळाली. परंतु 'अमृतवेल' समजण्याचे वय आणि वैचारिक पात्रता त्यावेळेला नव्हती. हिंदी साहित्यामध्ये एम. ए. पास झाल्यावर नेट-सेटची तयारी करीत असताना जेव्हा नव्याने 'अमृतवेल' वाचायला घेतली तेव्हा त्यातील खोली समजली.

कादंबरीतील अनेक पात्र आपल्या अवतीभवती जगत आहेत, याचा साक्षात्कार आपल्याला वाचताना होतो. मानवी स्वभावाचे वेगवेगळे पैलू आणि त्यानुसार माणसामाणसातील बदलत जाणारे नाते आणि त्या नात्यातील वाढत जाणारा वृक्षपणा अथवा स्नेहभाव अचूक टिपला आहे. लेखकांनी सुरुवातीला अल्लड असणारे कथेचे मध्यवर्ती पात्र 'नंदा' क्रमाक्रमाने विविध कडू - गोड जीवनानुभव घेतल्यावर तटस्थपणे जीवनाकडे बघायला शिकते. ही कथा आहे उच्चशीक्षित संवेदनशील नंदाची.

नंदा तिच्या प्रियकरासोबत म्हणजे 'शेखर-सोबत' सोनेरी आयुष्याची स्वप्न रंगवत असताना आकस्मिक त्याचे निधन होते. या स्वप्नभंगातून सावरून पुढील नवे स्वप्न पाहण्याचा निर्धार करीत नंदा जीवनाच्या कुशीत शिरते. ज्या प्रकारे नंदा स्वतःला सावरते, प्रीतीचा, आयुष्याचा खरा अर्थ काय याचा शोध घेते. त्याचीच ही कथा म्हणजे 'अमृतवेल'.

दादा आणि माई नंदाच्या जीवन प्रवासातील पालक, आधारस्तंभ आणि मार्गदर्शकही. आधुनिक विचारसरणीचे दादा आयुष्याच्या सुखा-दुःखात, नाजूक क्षणात दीपस्तंभप्रमाणे भासतात. दासबाबू अनुभवी-प्रसंगी नंदाला वास्तवाची जाणीव करून देणारे तिचे गुरु दासबाबू तिला सल्ला देतात की पी. एच. डी. करण्याआधी नंदाने पाच-सहा महिने घराबाहेर फिरून जग पहावं. विविध अनुभव घ्यावे याची एक संधी तिला चालून येते. ती म्हणजे विलासपूरची एक जहागिरदारीण वसुंधरा व ती एक स्त्री कंपॅनिअनच्या शोधात असते. वसुंधरा नंदाच्या मधुर आवाजाची मोहिनी नंदावर कॉलेज जीवनापासूनच असते.

नंदा विलासपूरला जायला तयार होते. देवदत्त हे वसुंधराचे पती. देवदत्ताच्या आयुष्यावर परिणाम करणारी तीन महत्वाची पात्रे म्हणजे त्यांची आई, वडील व वसुंधरा. देवदत्ताचा दृष्टिकोन बदलणारी नंदा, हेमिंग्वे व विवेकानंदाचे एकत्रित चित्र हेही त्याच्या विचारांच्या द्वंद्वाचं प्रतीक असल्याचे आढळतं. जीवन हे समुद्राएवढे विशाल आहे. चित्र-विचित्र आहे. जितकं सुंदर तितकचं भयंकर आहे. पण त्याला ना ऐलतीर, ना पैलतीर. या समुद्रात माणसाचं भक्ष्य असणारी मासळी भरपूर आहे. मात्र माणूस ज्याचं भक्ष्य बनू शकतो असे शार्क मासे ही त्यात थोडके नाहीत. लेखकांच हे तत्वज्ञान आजच्या जीवनात किती प्रासंगिक वाटते. दुःख माणसाला अंतर्मुख करतं हेच खरं. ते दुसऱ्या माणसाशी असलेले आपले नाते अधिक दृढ आणि स्पष्ट करते. नंदाला समजवण्यासाठी, दुःखातून बाहेर काढण्यासाठी लेखक आपल्याला दादांच्या मुखातून मानवी मनाचा धर्म समजवतात.

भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आलेला नाही !

मानवाचे मन केवळ भूतकाळाच्या साखळ-दंडांनी करकचून बांधून ठेवता येत नाही !

त्याला भविष्याच्या गरुडपंखांचं वरदानही लाभलेलं आहे.

एखाद स्वप्न पाहणं, ते फुलविणं, ते सत्य-सृष्टीत उतरावं म्हणून धडपडण,

त्या धडपडीतला आनंद लुटण आणि दुर्दैवानं ते स्वप्न भंग पावलं,

तरी त्याच्या तुकड्यावरून रक्तावलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नांमागंनं धावण, हा मानवी मनाचा धर्म आहे.

मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो, तो यामुळं [१]

'प्रीती म्हणजे केवळ यौवनाच्या प्रेरणेतूत उद्भवणारी वासना नव्हे ! जेव्हा या

वासनेला खोल भावनेची जोड मिळते, तेव्हाच प्रीतीची ही अमृतवेल ठरते.'[२] पण हीच प्रीती नुसती आत्मकेंद्रीत झाली. आत्मपुजेशिवाय सुचेनासं झालं म्हणजे, मनुष्य केवळ इतरांचा शत्रू होत नाही; तो स्वतःचाही वैरी बनतो. या दासबाबूच्या मार्गदर्शणातूण नंदा बाहेरचे जग बघण्यासाठी घराबाहेर पडते. देवदत्त आणि वसुंधरा हे दाम्पत्य आत्मकेंद्रित झालेले, स्वतःच्या दुःखाच्या डोहात एवढं बुडालंय की संसारात एकमेकांना जपायचं असतं, फुलवायचं असतं हे साफ विसरून गेलं.

'कुणीही मनुष्य असो, जेव्हा त्याला मृत्यू आणि व्यसनं मित्र वाटू लागतात, तेव्हा त्याच्या जवळ असणाऱ्या दुसऱ्या माणसाने आपल्या मायेने त्याला मागे ओढले पाहिजे. माणसाचे माणसाशी असलेले हे सर्वांत जवळचे नाते आहे.'[३] नंदाच्या मुखातून लेखक आपल्याला जीवनातील महत्वाची सत्ये सर्वांना सांगत आहेत. बापूंच्या रूपात लेखकानं एक सज्जन सद्गुरु गृहस्यांचे पात्र रेखाटले. बापूंच्या मुखातून लेखक या व्यवहारवादी जगाचे वास्तव सांगतात. या जगात सॉक्रेटिसला विषाचा प्याला प्यावा लागतो व गांधीजींना बंदुकीच्या गोळ्या खाव्या लागतात तिथे इतरांची कथा काय? नंदाच्या स्वगतातून लेखक आपल्याला जीवनाचा सोपा अर्थ समजवतात. 'जीवनचक्राच्या या अखंड भ्रमंतीत माणसाला एकच गोष्ट करता येण्यासारखी आहे. दुसऱ्या माणसाशी जडलेले आपले नाते न विसरणे, त्याचे जीवन फुलावे म्हणून त्याच्यासाठी जे जे करता येईल ते ते करणे.[४]

देवदत्तच्या मुखातून लेखक आपल्याला जगातील माणसांचे दोन प्रकार समजावतात. मुर्दाड मनाची माणसं जी अष्टोप्रहर जगण्याची केविलवाणी धडपड करीत राहतात. ती कुणाच्याही लाथा खातील. सोम्यागोम्या पुढे लोटांगण घालतील. उकिरड्यावरील अण्णांनी पोट भरतील. तथापि मनस्वी मनाची माणंस धुंदीत जगतील, मस्तीत जगतील; पण दुसऱ्याला शरण जाणार नाहीत. ईश्वराशीसुद्धा तडजोड करणार नाही. देवदत्त बालवयापासून चुकीच्या माणसांच्या संगतीत वाढले. आई-वडिलांच्या चुकीच्या वागण्याचा मनस्वी देवदत्त वर परिणाम होतो. तो व्यसनी बनतो. आत्मकेंद्रित असलेली वसुंधरा त्याची सहचारिणी बनते. परंतु दुःख व व्यसनाच्या गर्तेत अडकलेल्या देवदत्ताला ती बाहेर काढू शकली नाही. पतीच्या सुखदुःखाशी ती एकरूप होऊ शकली नाही. उत्कटतेने त्याला व्यसनांपासून दुरावू शकली नाही. सावित्रीने सत्यभानावर प्रेम केले ते स्वतःला पूर्णपणे विसरून आत्मप्रेमाच्या श्रृंखला तोडून, हॅम्लेटच्या आईला ते जमलं नाही. लेखक म्हणतात, 'माणसाच्या विवेकशक्तीपेक्षा त्याचे मनोविकार बलवंत असतात. माणूस कितीही दुःखी असो, रोगी असो, दरिद्री असो त्याचं खरं प्रेम असतं एका गोष्टीवर...

**' जगण्यावर'**

लेखक देवदत्तच्या आईच्या मुखातून वदवतात की, 'माणसांन आयुष्यात फुलायचं असतं; जळायचं असतं; पण मात्र कुजायच नसत.'[५] व्यसनी दुःखाच्या गर्तेत अडकलेल्या देवदत्तच्या मनात आत्महत्येचे विचार घोळत असतात. नंदा देवदत्तच्या दुःखाशी समरस होते. त्या दुःखाच्या एकाकी गर्तेतून बाहेर पडण्यासाठी त्याला हात देते. लेखक नंदाच्या मुखातून जीवनविषयक सकारात्मक विचार आपल्यापर्यंत पोहोचवतात.

लेखक म्हणतात, 'तुमची व्यसनं तुमच्या स्वभावाच्या उत्कटतेतून निर्माण झाली आहेत. म्हणूनच या उत्कटतेला उदात्ततेची जोड द्या. दुःखातून, व्यसनातून, संकटातून बाहेर पडाल. माणसाच्या उद्धार मनोविकारांना उत्कट करुणेची जोड मिळायला हवी. ही करुणा नसेल तर मनुष्य पशु होईल. माणसाचं मन बदलले पाहिजे तरच हे जग बदलेल. इतरांची अश्रू पुसणारी माणसं या जगात थोडी असतील; पण त्यांचा आनंद अलौकिक असला पाहिजे.

सर्वस्वाच्या समर्पणाची धुंदी, मानवतेवरील प्रेमाची धुंदी या धुंदीत अद्भुत आनंद आहे. माणसाचं छोटसं दुःख जगाच्या मोठ्या दुःखात मिसळून गेलं की त्याला सुखाची चव येते. देवदत्त स्वतःच्या शोधात बाहेर पडतो. त्याच्या मनातील आत्महत्येचे विचार, व्यसने दूर पळतात. देवदत्त दुःखी, कष्टी लोकांचं दुःख हलकं करण्यासाठी ते वाटून घेण्यासाठी, घराच्या बाहेर पडतो. आपणही जीवनावर प्रामाणिकपणे प्रेम करावं. सर्वस्व विसरून आपल्या सान्निध्यात येणाऱ्या सर्वांच जीवन फुलवायचा, उमलवायचा प्रयत्न करावा. 'अमृतवेल' आपल्याला जीवनावर प्रेम करायला शिकवते.

**श्री. अमित शिवाजी सरवदे**
**एम. ए.**

**संदर्भ :**

१. अमृतवेल पृ. २०
२. अमृतवेल पृ. २७
३. अमृतवेल पृ. ६३
४. अमृतवेल पृ. ६९
५. अमृतवेल पृ. १३५

०३

# भौगोलिक संकल्पना

## १) आखात

तिन्ही बाजूंनी जमिनीने आणि एकाच बाजूने पाण्याने वेढलेल्या जलीय रचनेच्या भागास '**आखात**' असे म्हणतात. उदा. : इराणचे आखात / पर्शियन आखात.

**२) उपसागर**

तिन्हीबाजूंनी जमीन असलेल्या समुद्राच्या विशाल जलाशयाला '**उपसागर**' असे म्हणतात. जलाचा मोठा विस्तार असल्याने त्या आखातास 'उपसागर' असेही म्हटले जाते. उदा. : बंगालचा उपसागर

**३) द्वीपकल्प**

द्वीपकल्प म्हणजे तिन्हीबाजूंनी समुद्र आणि एका बाजूला जमिनीचा विशाल तुकडा असणारा प्रदेश होय. उदा. भारतीय द्वीपकल्प. या प्रदेशाच्या शेवटच्या टोकाला '**भूशिर**' म्हणतात.

**४) पुळण**

समुद्राच्या धडकणाऱ्या लाटांमुळे निर्माण झालेला समुद्रकाठचा भाग म्हणजे 'पुळण' होय. लाटांमुळे वाळू, गारगोट्या, शंख-शिंपले दगड इत्यादींचे किनारी भागात संचयन होऊन 'पुळण' निर्माण होते. समुद्राला भरती येते त्या वेळी पाण्याची वरची मर्यादा व ओहोटीच्या वेळची खालची मर्यादा या दोन्ही मधील पट्टा म्हणजे 'पुळण' होय.

**५) खारकच्छ किंवा खाजण**

समुद्रकिनारा व त्यापासून थोड्या अंतरावर वाळूचे संचयन होऊन निर्माण झालेले वाळूचे दांडे किंवा बांध या दोन्हीमधील खाऱ्या पाण्याचा पट्टा अथवा सरोवर यांस '**खाजण**' असे म्हणतात.

**६) खाडी**

नदी जेथे समुद्राला जाऊन मिळते. तेथील पाण्याच्या साठ्याला '**खाडी**' असे म्हणतात. कधीकधी किनाऱ्याचा सखल भूभाग खचून किंवा समुद्राच्या पाण्याची पातळी वाढल्यानेसुद्धा समुद्रखाडी तयार होते. खाडी जर बऱ्यापैकी मोठी असेल तर तिला '**आखात**' असे म्हणतात.

**७) सामुद्रधुनी**

दोन मोठ्या जलाशयांना जोडणाच्या नैसर्गिक कालव्यासमान असलेल्या पाण्याच्या प्रवाहाला '**समुद्रधुनी**' म्हणतात.

**८) त्रिभूज प्रदेश**

नदीच्या मुखाजवळ नदीने वाहून आणलेल्या गाळामुळे निर्माण झालेला '**त्रिभूज प्रदेश**' होय.

**९) पठार**

पर्वतावर असलेला साधारणतः सपाट प्रदेश म्हणजे पठार होय. त्याची निर्मिती ज्वालामुखी, लाव्हारस, पाण्याद्वारे व हिमनगाद्वारे होणारी झीज अशांसारख्या भौगोलिक घडामोडींमुळे होते.

**१०) मैदान**

भूगोलातील या संज्ञेचा अर्थ सामान्यतः सखल सपाट व विस्तीर्ण भूप्रदेश असा होतो. ही लक्षणे अगदी काटेकोर नाहीत. समुद्रसपाटीपासून सुमारे २०० की. मी. पर्यंत उंचीचा प्रदेश म्हणजे '**मैदान**' होय.

**११) पर्वत**

नैसर्गिक इतर भूस्खलन उंच असलेल्या भौगोलिक रचनेसाठी '**पर्वत**' हे नाव वापरले जाते. समुद्रसपाटीपासून उंचीनुसार टेकड्या, डोंगर, पर्वत, ही भूमिस्वरूपे पाहावयास मिळतात.

**१२) बेट अथवा द्वीप**

पृथ्वीवरील जमिनीचा असा भाग आहे, जो चारही दिशांनी पाण्याने वेढला गेला आहे. त्यास '**बेट**' असे म्हणतात. बेट हे नदी, सरोवर, समुद्र कोणत्याही पाण्याच्या अंगामध्ये असू शकते. ते नैसर्गिक व मानवनिर्मित असते. भौगोलिक रीत्या समान व जवळजवळ असणाऱ्या बेटांच्या गटाला '**द्वीपसमूह**' असे म्हटले जाते.

**अर्पिता गायकवाड**

बी. ए. भाग ३

०४

# स्त्री

**स्त्री** म्हणजे आदिमाया, आदिशक्ती, महाकाली, विघ्नेश्वेरी; जिला कितीही नावांनी तारलं तरी कमीच. स्त्री ही प्रत्येक घराला आनंद देणारी देवी आहे. तिच्यामुळे घराला घरपण असते. जीवनाला आनंद असतो. मुलांच्या शिक्षणाला वेग असतो आणि आई-वडिलांच्या काठीला आधार असतो. तिच्यामुळेच घर आनंदी असते. स्त्री म्हणजे कोणाची आई आणि कोणाची ताई, कोणाची सून, कोणाची बायको तर कोणाची मैत्रीण असते. सगळ्या नात्यांना सांभाळून नेण्याचं काम ती करीत असते. सगळ्यांना आनंदी ठेवत असते. सगळ्यांच्या गरजा भागवत असते आणि ती मात्र नाखुश असते.

घरच्यांच्या आनंदातच तिचा आनंद असतो पण स्वतःला स्वतःचा वेळ न मिळाल्यामुळे ती उदास आहे, असते. पण का कोणास ठाऊक; तिच दु:ख आणि तिचा आनंद कोणाला दिसत नाही. तिलाही वाटते की, आपणही आनंदात सामील व्हावे, काम थोडं बाजूला ठेवावं; पण काय करणार? जमत तर नाही ना, तू स्त्री आहेस! तुला हे केलंच पाहिजे, तुला हे करावंच लागेल असा समज होऊन बसलेला आहे.

आपला भारत देश चंद्रावर, मंगळावर पोहोचला; पण स्त्रीला आदर कसा द्यावा कोणाला कळेना. कोणी आलं की हे कर ते कर यातच तिचा वेळ गेला. ना ती उडू शकली, ना झेप घेऊ शकली तिचे पंख तुटले आणि कायमचे गळूनच गेले. ती स्त्री आहे. तिलाही समजून घ्येणाचा प्रयत्न करा.

भारत देश हा विकसनशील देश आहे; परंतु आजही आपण पाहतोय, वर्तमानपत्रात बातमी दिसतेय की अमुक अमुक मुलीवर बलात्कार झाला पण अशी बातमी दिसत नाही की बलात्कार करणाऱ्या व्यक्तीस तात्काळ शिक्षा मिळाली म्हणजेच भारत देश किती जरी पुढे गेला तरी स्त्रीच्या संरक्षणाबाबत मागेच राहिला. स्त्री म्हणजे कोणत्याच प्रकारचं खेळणं किंवा वस्तू नसून ती एक माता आहे. आपण म्हणतो ना कि **'भारत माता की जय'** पण त्याच भारतातील मातेचा विजय नाही तर पराजय होत असेल तर स्त्रीला आपण काय आणि कसा मान देताय याचं आत्मपरिक्षण करण्याची गरज आपल्यालाच आहे.

प्रत्येक स्त्रीच्या शरीरात एनर्जी असते. ही एनर्जी पालन पोषण करणारी, प्रेम आणि मायेने जोपासणारी एनर्जी आहे. ही एनर्जी घरात असल्याने घरात स्नेह, ओलावा, चैतन्य, उत्साह आणि सौंदर्य येतं परंतु आजच्या युगामध्येसुद्धा स्त्रीला समाजामध्ये दुय्यम स्थान आहे, तिच्या जन्मासंबंधी अनेक पारंपारीक विचार आहेत. स्त्री हे परक्याचं धन आहे, असे आजही काही घरांमध्ये मानले जाते. परंतु स्त्री सुद्धा मनुष्य आहे आणि तिला तिचे आयुष्य आहे. तिला तिच्या विचाराने जगुन दिल पाहिजे कारण आपणास माहित आहे कि आजच्या काळात. स्त्री एक राष्ट्रपती आहे, डॉक्टर आहे, पोलीस आहे, कलेक्टर आहे इ. क्षेत्रात कार्यरत आहे. मग ज्या घरांमध्ये स्त्रीयांबाबत जरा कमकुवत विचार आहे त्यांनी तिचा विचार करावा, तिला पंख फुटु द्यावे, भरारी घेऊ द्यावे आणि आत्मनिर्भर बनु द्यावे.

**तूच काली, तूच जननी**
**तूच आहे रणरागिनी**
**तूच देवी, तूच माई**
**तूच आहे या जगताची आई**
**स्त्रीच आहे पण भवानी आहे**
**स्त्रीच आहे पण अंतराळवीरणी आहे**
**तूच काली, तूच जननी**
**तूच रणरागिनी आहे**

**कु. शिवांजली दिगंबर कुदळे**
वर्ग ११ तु. अ

# ०५ रंगनाथ पठारे

## रंगनाथ गबाजी पठारे

**जन्म** : जवळे-पारनेर तालुका, २० जुलै, १९५० हयात. हे मराठी कथालेखक, कादंबरीकार आणि समीक्षक आहेत. कथारचनेच्या विविध शक्यतांशी खेळणे हा रंगनाथ पठारे यांचा स्वभाव आहे.

मराठीत खूप कमी लेखकांनी कथेच्या रचनेच्या अंगाने तिच्याशी संवाद साधल्याचे दिसते.

कथा म्हणजे एक सत्त्वशोध आणि समकालीन वास्तवाला दिलेली तीव्र प्रतिक्रिया किंवा स्वतःत चाललेली जीवघेणी घालमेल असते. रंगनाथ पठारे यांच्या प्रत्येक कथेत ही घालमेल प्रत्ययाला येते. ही घालमेल वाचकाला खूप आतआत आवर्तात घेऊन जाते. ते मराठी लघुकथेला कथेच्या मूळ स्वरूपाकडे घेऊन जातात. रूढ पारंपरिक कथासमीक्षादृष्टीस हा प्रकार आकळणे थोडे कठीणच. पण पन्नास वर्षांनंतर जो वाचक **'शंखातील माणूस'** या कादंबरीत **'गांधीजी अकरा सप्टेंबर २००९'** ही गोष्ट वाचेल तेव्हा या लेखकाच्या असाधारण प्रतिभाशक्तीची प्रगल्भता जाणवू शकेल.

रंगनाथ पठारे यांनी मौखिक परंपरेतील ज्ञानसंक्रमण साधन म्हणून निर्मित झालेल्या कथापरंपरेस पचवून येथील मातीत कथा रचल्या आहेत.

**जीवन** : त्यांचा जन्म २० जुलै, १९५० रोजी जवळे नावाच्या गावी झाला. त्यांचे आईवडील पुण्याजवळ कोथरूड या गावी रहात. दुसऱ्या महायुद्धात लढून आलेले त्यांचे वडील ट्रक चालवत असत. वयाच्या सोळाव्या वर्षांपर्यंत रंगनाथ पठारे गावी राहिले, तिथेच मॅट्रिक झाले. नंतर शिक्षणासाठी चार वर्षे नगरला, तीन वर्षे पुण्यात आणि त्यांची त्यानंतरचे त्यांचे वास्तव्य संगमनेरात आहे.

ते संगमनेरच्या संगमनेर महाविद्यालयात भौतिकशास्त्रचे ३७ वर्षे प्राध्यापक होते.

**रंगनाथ पठारे यांचे प्रकाशित साहित्य**

- अनुभव विकणे आहे (कथासंग्रह - १९८३)
- आजची कादंबरी नोंदी आणि निरीक्षणे (वैचारिक)
- एका आरंभाचे प्रास्ताविक (लेखसंग्रह)
- कुठेचा लोलक (कादंबरी २००६)
- कोंभालगतचा प्रवास
- गाभाऱ्यातील प्रकाश
- चित्रमय चतकोर
- पोषक फलोद्यान
- जागतिकीकरण आणि देशीवाद
- टोकदार सावलीचे वर्तमान
- ताम्रपट
- तीव्र कोमल दुःखाचे प्रकरण
- तडजोड दिवस (पहिली कादंबरी).

**संकलन : कु. काजल गावडे**
बी. ए. भाग २



# ०६ न कळलेले बाबा

**मित्रांनो** मला थोडं बोलायचंय. कधीच न बोललेल्या गोष्टी आज सांगायच्यात. मनात आलेल्या काही भावना ओठांवर आणायच्यात. आजही बाबा आपले जुने फोटो पाहून चेहऱ्यावर हास्य येते. प्रत्येक फोटोत तर अगदी चिकटून आहे. तुम्हाला पण आज का कुणास ठाऊक, एक मिठी मारायचीही लाज वाटते, तुम्ही केलेले लाड कधीच विसरू शकणार नाही. मैत्रिणीबरोबर फार वेळ घालवणे. पण तुमच्यासोबत निवांत गप्पा मारायला लाजच वाटते. बाबा पुन्हा हात धरून चालायला शिकवाल का?, किती उशीर झाला गं वेडे म्हणून शाळेत सोडवायला याल का?, वडील, पप्पा, डॅडी बोलायला किती छान वाटतं ना पण आपण कधी कधी जाणूनबुजून बाप म्हणतो, आज अशाच एका बापाची कहाणी सांगणार आहे. आई घराच मांगल्य तर वडील घराच अस्तित्व असतात. पण या अस्तित्त्वाला महत्त्व असूनही त्याविषयी फारस काही बोलत जात नाही, समाजात आपण केलेल्या चुकीला समजून घेणारे बाबाच असतात. काही लोकांनी बाप रेखाटला पण तो ही तापट व्यसनी मारझोड करणाराच समाजात एक-दोन टक्के असें बाप असतीलही पण चांगल्या वडिलांबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात; पण बापांकडे संयमाचे घाट असतात. ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना! पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहत. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते; पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही सहज विसरून जातो.

आई रडते; पण वडिलांना रडता येत नाही. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलाकडे बघितले की त्यांच प्रेम कळते. त्यांचे फाटके बनियन बघितल की कळते आमच्या नशिबाची भोक त्यांच्या बनियनला पडलीत. दाढी वाढलेला चेहरा, त्यांची काटकसर दाखवतो. मुलीला गाउन घेतील, मुलाला शर्ट घेतील, पण स्वत: मात्र जुनी पँटच वापरतील. ऐपत नसते तरीही मुलाला मेडीकल इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण सहन करून मुलाला दर महिन्याला पैसे पाठवले जातात.

ज्या घरात बाप आहे त्या घराकडे वाईट नजरेनं कोणीही बघू शकत नाही; कारण घरातला कर्ता जिवंत असतो तो जरी काहीही करत नसला तरीही तो त्या पदावर असतो आणि घरच्यांच कर्म बघत असतो, सांभाळत असतो. कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते. ती जवळ घेते, कवटाळते, कौतूक करते; पण गुपचुप जाऊन पेढ्यांचा पुढा आणणारा बाप कोणाच्याच लक्षात राहत नाही. आजारातील आईची माया चुप आठवते; पण हॉस्पिटलच्या आवारात आणि औषधाच्या दुकानात अस्वस्थपणे वावरणाऱ्या बापाची कोणीही दखल घेत नाहीत.

चटका बसला, ठेच लागली, फटका बसला 'तर आई गं!' हा शब्द बाहेर पडतो, पण रस्ता पार करताना एखादा ट्रक जवळ येऊन ब्रेक दाबतो तेव्हा 'बापरे!' हाच शब्द बाहेर पडतो. छोट्या संकटांसाठी आई चालते पण मोठमोठी वादळे पेलताना बापच आठवतो. काय पटतंय ना?

कोणत्याही मंगल प्रसंगी घरातील सर्वजण जातात; पण मयताच्या प्रसंगी बापालाच जावे लागते. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जात नसतो; पण गरीब लेकीच्या घरी उभ्या उभ्या का होईना चक्कर मारतो. तरुण मुलगा उशिरा घरी येतो; तेव्हा बाप जागा असतो. मुलांच्या नोकरीसाठी साहेबांसमोर लाचार होणारा बाप... मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप, घरच्यांसाठी स्वतःच्या व्यथा दडपणारा बाप... खरंच किती ग्रेट असतोना... वडिलांचे महत्त्व, जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात. त्यांना एका-एका वस्तूसाठी तरसावं लागतं. वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती म्हणजे त्या घरातील मुलगी. सासरी गेलेल्या अथवा घरापासून दूर असलेल्या बापाशी बोलताना बापाचा बदललेला आवाज एका क्षणात कळतो.

ती अनेक प्रश्न विचारते. कोणतीही मुलगी स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून बाप म्हणेल तेव्हा विवाहाच्या बोहल्यावर चढते. ती मुलगी बापाला जाणते. इतरांनीसुद्धा असेच आपल्याला जाणावे हीच... अपूर्ण मॅटर

**कु. शिवानी हरिदास कानगुडे**
बी. ए. भाग २

०७

# एक होता कार्व्हर...

नमस्कार रसिक हो...

**शेंगदाणे** म्हटले की काय आठवते खारे दाणे, शेंगदाण्याचे लाडु, चक्की हो ना? आता आपल्यापैकी बऱ्याच जणांच्या तोंडाला पाणीही सुटल असेल; पण तुम्हाला हे माहीत आहे का की, शेंगदाण्यापासून रंग, खत, साखर, शाई, दूध, लोणी, कागद, चीज, प्लास्टिक, सौंदर्यप्रसाधने यांसारख्या मानवी जीवनास आवश्यक असणाऱ्या बऱ्याच गोष्टी तयार होऊ शकतात. बहुतांश लोकांना माहीत नसेल; हे पुस्तक वाचण्याआधी मलाही माहीत नव्हते.

मित्रांनो मी बोलतेय वीणा गवाणकर यांनी लिहिलेल्या 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाविषयी. या पुस्तकामध्ये जॉर्ज वॉशिंग्टन या गुलामगिरीत वाढलेल्या आणि आपल्या प्रगल्भ बुद्धिमत्तेच्या जोरावर आपल्या निग्रो बांधवांसाठी अविरत कार्यरत राहिलेल्या कृषि तज्ज्ञाच्या, शास्त्रज्ञाच्या जीवनकार्याविषयी. या पुस्तकात लेखिका वीणा गवाणकर यांनी खुपच उपयुक्त माहिती दिलेली आहे.

**'पीनट मॅन'** म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांनी शेंगदाण्यावर प्रक्रिया करून त्यापासून ३०० विविध वस्तु तयार केल्या.

रसिक हो, या पुस्तकात पहिला मुद्दा दिलेला आहे जो आहे **'मेरीचं पोर'**. मेरी म्हणजे डॉ. कार्व्हर यांची आई. अमेरिकेतील मिझुरी राज्यातील डायमंड ग्रोव्ह पाड्यावर मोझेस कार्व्हर आणि त्यांच्या पत्नी सुझन राहत होत्या. त्यांनी मेरी नावाच्या निग्रो स्त्रीला ७०० डॉलर्सना आपल्या पत्नीच्या मदतीसाठी गुलाम म्हणुन विकत घेतले होते.

सन १८६०-१८६२ च्या काळात गुलामांना विकून पैसे मिळवण्याचा तेजीचा धंदा चालु होता. अशाच एक टोळीने मेरीला व तिच्या मुलाला पळवून नेले. मोझेसबाबांनी त्या लोकांना आपला उमदा घोडा दिला; परंतु त्या बदल्यात त्यांना मेरीच २ महिन्यांच मरणोन्मुख बाळच मिळाल; पण मेरी नाही मिळाली. या बाळाला सुझनबाईंनी सांभाळले, उपचार केले आणि त्या बाळाला जगवले. मित्रांनो मेरीच हे बाळ म्हणजेच डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर.

आता हा छोटा जॉर्ज निसर्गात रमत असे. बागकाम करण त्याला आवडत होते. झाडा-प्राण्यांच्या संगतीत तो तासनतास रमुन जाई. जॉर्ज थोडा मोठा होऊ लागला आणि त्याला प्रश्न पडू लागले की गवत हिरवे का? टोळ उड्या का मारू शकतो? आणि असे प्रश्न विचारून तो मोझेसबाबांना सतावीत असे. पुढे शेतीतज्ज्ञ गायबर यांच्या मार्गदर्शनाखाली जॉर्जच्या मदतीने बोझेसबाबांनी द्राक्षांची लागवड केली.

जॉर्जने लिहायला वाचायला शिकावे म्हणून मोझेसबाबांनी त्याला निओशो गावातील निग्रोंच्या शाळेत घातले आणि तिथुन सुरु झाला जॉर्जचा शिक्षणप्रवास. या छोट्या जॉर्जचा शिक्षण प्रवाह कसा होता हे जाणून घेण्यासाठी **'ज्ञानासाठी दाही दिशा'** हे प्रकरण नक्की वाचा.

प्राथमिक शिक्षण - निरोशी
माध्यमिक शिक्षण - कॅन्झस
कॉलेज शिक्षण - सिप्सन, आयोवा
1894 - B. S.
1896 - Agricultural and Bacterial Botony

या विषयाची उच्च पदवीही संपादन केली. हा शिक्षण प्रवाह नक्कीच सहज सोपा नव्हता.

इ. स. १८६५ मधील डिसेंबर महिन्यात निग्रोंच्या स्वातंत्र्याला अधिकृत मान्यता देण्यात आली. अमेरिकेतील गुलामगिरी नष्ट झाल्याचे घोषीत करण्यात आले, परंतु आजपर्यंत गुलामगिरीत आयुष्य काढलेल्या या नवमुक्त समाजापुढे अनेक प्रश्न होते. राहत्या घराचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न असे एक ना अनेक प्रश्न होते. अशा निग्रो लोकांसाठी पुढे शाळा तयार करण्यात आली. बुकर टी. वॉशिंग्टन यांनी या शाळेची जबाबदारी घेतली. विपन्न ॲलाबॅमाला सुस्थितीत आणण्यासाठी बुकर वॉशिंग्टन यांनी कार्व्हर यांना पत्र लिहून ॲलाबॅमात बोलावुन घेतले. कार्व्हर यांचे कार्य जाणुन घेण्यासाठी रसिक हो, **'गंगा आली रे अंगणी'** हे प्रकरण नक्की वाचा.

सन १८९९ साली पहिल्या फिरत्या कृषी विद्यालयाचा जन्म झाला. डॉ. कार्व्हर हे कृषी विद्यालय घेऊन गावोगावी जाऊन माहिती देत. यामध्ये ते जमीनीची मशागत कशी करावी?, ती खोलवरच का करावी?, बियाणे कसे निवडावे? हे सांगत. चौरस आहाराच्या अभावी त्या काळात समाजाला पेलाग्र व स्कर्व्ही रोगांनी पछाडले होते. चौरस आहारासाठी कार्व्हर यांनी समाजाला हिरव्या भाज्या व टोमॅटॉसारखी फळ खायला शिकवले. हळहळू त्यांनी दक्षिणेतील लोकांच्या आहाराच्या सवयी बदलल्या. अडचणीच्या काळात वापरण्यासाठी मांस कसे टिकवावे, भाजीपाला उन्हात सुकवुन त्यांची बेगमी कशी करावी याची प्रात्यक्षिके दिली. यातुन त्यांनी समाजाचा जिवनमान उंचावण्याचा आणि समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. एवढेच काय शारीरिक स्वच्छता बालसंवर्धन, पशुसंगोपन, कुक्कुट-पालन, मातीपासून रंग बनवुन घर कशी रंगवावीत हेसुद्धा कार्व्हर यांनी लोकांना शिकवले.

सन १९१७ सालच्या पहिल्या सैन्याला महायुद्धाच्या काळात अमेरिकन गव्हाचा साठा अपुरा पडला. त्यावेळी डॉ. कार्व्हर यांच्यामुळे अमेरिकन सैन्याची उपासमार टळली होती. डॉ. कार्व्हर यांनी रताळ्यापासुन सुमारे सव्वाशे वस्तु बनवल्या होत्या. पीठ, स्टार्च, खाद्यपदार्थ, इ.

१९१६ - रॉयल सोसायटी ऑफ इंग्लंडचे सन्माननीय सभासदत्व मिळाले.

१९३९ - रूझवेल्ट मेडल.

१९२८ - सिंप्सन कॉलेजकडुन डॉक्टरेट

१९४८ - युनिव्हर्सिटी ऑफ रॉचेस्टरकडुन डॉक्टरेट बहाल करण्यात आली.

विज्ञान विषयात गती असणाऱ्या मुलांना प्रगत अभ्यासक्रमात प्रयोगशाळेची उणीव भासू नये म्हणुन आपल्या आयुष्यभराची साठवण खर्च करून उभारले कार्व्हर प्रतिष्ठान त्यांनी टस्किगीला अर्पण केल.

अशा निर्मोही, थोर समाजसेवकाने टस्कि-गीमध्ये दि. ५ जानेवारी, १९४३ रोजी अखेरचा श्वास घेतला...

**प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे**
**मुखपृष्ठ आणि आतील चित्रे : सतीश देशपांडे**
**लेखिका : वीणा गवाणकर**

**आम्रपाली कांबळे**
बी. ए. भाग. ३

०८

# न बदलणारं नातं...

**जीवनाच्या प्रत्येक वळणावर**
**आठवण येत राहील,**
**एकत्र नसलो तरी**
**सुगंध मैत्रीचा दरवळत राहील.**
**कितीही दुर जरी गेलो तरी**
**मैत्रीचे हे नाते आहे तसेच उद्या पण राहील.**

अशी इच्छा असली तरी माझा माझ्या मित्रावर विश्वास आहे. ज्या व्यक्तिशी आपण मनापासुन मैत्री करतो ना, त्या व्यक्तीने आपल्याला कितीही दुखावलं तरी, पुन्हा त्याच व्यक्तीशी बोलावसं वाटतं म्हणजेच निःस्वार्थ मैत्री असते. त्याने मला दुःख दिलेले असलं तरी मला समजतयं की माझा मित्र असा नाहीये; कारण तो मला नेहमीच वेळ देत अलेला आहे. जेव्हा तो माझ्या मागेपुढे करत होता, तेव्हा वाटलंच नाही की, तो दिवस असा उजाडल मग काय तो निघुन गेला. माझ्यापासुन, आई-वडिलांपासून, गावांपासुन, नतेवाईकांपासून खूप खूप लांब गेला आहे. लांब गेला याचा अर्थ असा नाही की, तो सोडुन गेलाय. आपले स्वप्न पूर्णपणे जगून घेतोय. म्हणजे तो एक फौजी आहे. तुम्हा-आम्हांला तर माहीतच आहे कि, एका फौजीचं आयुष्य कसं असतं. माझा तो एक चांगला मित्रच नाही तर एक चांगला व्यक्ति देखील आहे. वेळ न देण्याचं कारण एवढचं आहे की, त्याला मला देण्यासाठी वेळ नाही.

विश्वासाची एक-एक पायरी चढत जाऊन, तयार होणारं अतुट नातं म्हणजे मैत्री. आयुष्याला आकार देणारं, मनाला मनाशी जोडुन ठेवणारं नातं असत मैत्रीचं. सुखाच्या आणि दुःखाच्या काळात कायम सोबत उभं राहून आधाराचा हात हातात देते ती मैत्री असते. भेट नाही, बोलणं नाही तरी तो किंवा ती विसरणार नाही, ही खात्री मनात ठेवते ती मैत्री असते. आपल्याला आपल्यापेक्षा जास्त समजुन घेत, जिवाला जिव लावते ती मैत्री असते. प्रेमाच्या नात्यापेक्षाही सर्वात जिव्हाळ्याचं, कधी हट्टी तरी कधी एकदम रागाचं, पण कायमस्वरूपी सोबत हवं असणारं हक्काचं घर असते. ती मैत्री असते.

माझं माझ्या मित्राला एवढच सांगणे आहे कि तुला वेळ भेटला नाही तरी चालेल पण विसरून मात्र जाऊ नको. कारण, आयुष्यात एखादी व्यक्ति बदलायला वेळ लागत नाही. कधीही मला जर तुझी हक्काने गरज लागली तर माझ्यासोबत मित्र आहे, याची आठवण मला पहिल्यांदा येईल. कारण मला तुझा वेळ आणि तुझ्यासोबत होणारं बोलणं नको असंच वाटतयं, हवी आहे तर ती तुझी फक्त साथ हवी आहे. नेहमी अडचणीच्या काळात सहज एकदा विचारणारा तरी पाहीजे ना आयुष्यात. त्यामुळे तर मला तुझी मैत्री हवी आहे...

माझ्या मनात नेहमी येणारी तुझ्या विषयीची ही भावना आहे. ती अशी,

पार्टी नकोय मित्रा तुझी येवुन फक्त भेटत जा, काय चाललयं मनात तुझ्या भेटून फक्त बोलत जा. मोकळे सोड स्वतःला जरा, कधीतरी मोकळं होत जा. हलकं वाटेल तुझचं तुला मन रिकामं करत जा, जुन्या आठवणी गप्पा, गोष्टी आमच्यातसुद्धा रमत जा. आलेच कधी वाईट विचार बिनधास्त फोन करत जा. काय आहे आयुष्य अजुन. निदान मनातले वाटत जा. पहा किती फरक पडतो आनंद तेवढा लुटत जा. संपर्कात तेवढं राहात जा. काय हवं काय नको तुला कोणाला तरी सांगत जा. मित्र असतात कशासाठी मैत्री तेवढी जपत जा. आम्ही फक्त मस्त जगतो तसाच मस्त जगत जा, पैसा नाही लागत त्याला मनातले मात्र सांगत जा, एवढचं सांगायचं आहे की, किती पण संकटे येऊ द्या मात्र मैत्रीचं नातं कधी विसरू नका. म्हणुन तर हे 'न बदलणारं नातं...'

**कु. राणी क्षीरसागर**
बी. ए. भाग २

०९

# आई..

**माझी** आई, माझ्या अस्तित्वाचा धागा! तिचे माझ्या विषयी असलेले प्रेम, त्याग हे माझ्या जीवनात असलेले अतुलनीय आधार आहेत. तिची पालनपोषण करणारी उपस्थिती ही जीवनातील वादळांमध्ये असलेला आरामाचा दिवा आहे तिच्या कोमल स्पर्शाने आणि सुखदायक शब्दांद्वारे तिने अस्तित्वाची जडणघडण लवचिकता आणि करुणेच्या धाग्यांनी बांधली आहे. तिच्या प्रेमाला सीमा नाही. माझी आई, तिच्या प्रेमळ शब्दांनी आणि अटळ पाठिंब्याने माझी सर्वांत कट्टर सहकारी, माझी सर्वांत जवळची विश्वासू आहे. अर्थातच सांगायचे झालेच तर माझी आई ही माझी सर्वात जवळची मैत्रीण आहे. माझी सर्वात जवळची व्यक्ती आहे. मी माझ्या आईसोबत अगदी हसूनखेळून राहत असते. ती रोज माझ्यासाठी लवकर उठून डबा बनवते. घरातील सर्वांची काळजी घेते. अगदी घरातील कामे केल्याशिवाय आराम मात्र करत नाही; परंतु घरातील कुणीही आजारी असेल तर मात्र तिला त्याच व्यक्तीची चिंता असते.

माझ्या बाल्यावस्थेचा सुरुवातीच्या क्षणांपासून ते आजपर्यंत तिचे प्रेम एक स्थिर, अविचल शक्ती आहे. तिच्या डोळ्यांत मला अमर्याद करुणा दिसते. शक्तीचा साठज्याला सीमा नाही. तिच्या त्याग आणि निःस्वार्थतेने मला प्रेमाचा खरा अर्थ शिकविला. एक प्रेम जे वेळ आणि स्थानाच्या अडथळ्यांच्या पलीकडे आहे. एक प्रेम जे विश्वाइतकेच विशाल आहे. आयुष्याच्या चक्रव्यूहातून प्रवास करताना तिने दिलेले धडे, तिने रुजवलेली मूल्ये मी माझ्यासोबत घेऊन जाते. तिचे प्रेम जे विश्वाइतकेच विशाल आहे. तिचे प्रेम म्हणजे होकायंत्र आहे, जे मला माझ्या स्वप्नांच्या दिशेने निर्देशित करते. जी फक्त आई ती माझे सर्वस्व आहे. माझ्या अस्तित्त्वांचे सार आहे आणि त्यासाठी मी सदैव कृतज्ञ आहे.

अनुभव आणि भावनांच्या धाग्यांनी विणलेल्या माझ्या आयुष्याच्या वाटेवरील एक व्यक्तीमत्व आहे. ज्याची उपस्थिती मी श्वास घेत असलेल्या हवेइतकीच आवश्यक आहे. माझी आई तिचा प्रभाव कौटुंबिक संबंधाच्या पलीकडे पसरलेला आहे; ती एक अमूल्य जीवनाचा भाग आहे, जिच्यावर माझे जीवन बांधले आहे. प्रेम त्याग आणि अतूट शक्तीचे रूप अशी माझी प्रेमळ आई आहे.

माझ्या जन्माच्या क्षणापासून माझी आई माझी संरक्षक देवदूत आहे, माझ्यावर इतक्या शुद्ध आणि बिनशर्त प्रेमाने पाहत आहे, की ते वर्णनापलीकडे आहे, तिचा कोमल स्पर्श, तिचे सुखदायक शब्द, संकटाच्या वेळी माझा आश्रय अशी ही माझी प्रेमळ आई. आई पण केवळ तिचे प्रेमच तिची व्याख्या करत नाही, तिने केलेले त्याग, निःस्वार्थीपणाच्या अगणित कृत्यांनी माझे चरित्र घडविले आणि माझे नशीब घडवले. दैनंदिन जीवनातील सांसारिक कार्यापासून ते आम्ही एकत्रितपणे तोंड देत असलेल्या महत्तवाच्या आव्हानांपर्यंत तिने लवचिकतेने ओझे उचलेले आहे. माझ्या गरजा नेहमी तिच्या स्वतःच्या वर ठेवल्या आहेत. माझ्या आईने माझे जीवन ज्या अगणित मार्गांनी समृद्ध केले आहे. त्याबद्दल मी विचार करीत असताना, मी कृतज्ञतेच्या जबरदस्त भावनेने भरुन जाते. आई घर स्वच्छ करते. आमच्यासाठी चवदार जेवण बनवते. घरातील कुणी आजारी पडले तर, तिला चैन पडत नाही परंतु स्वतः आजारी असुनही कुटुंबाची काळजी घेते. आईच्या भूमिकेच्या पलीकडे ती अमर्यादित प्रतिभा आणि आवड असलेली स्त्री आहे. ती आमच्या कंटुंबाच्या गरजा पूर्ण करीत असते. स्वतःच्या आवडीनिवडी आणि महत्त्वाकांक्षा यांना प्राधान्य देते आणि हे तिचे उदार भावनेचे एक रूप आहे. तिच्या करूणेला काही मर्यादा नाही. तिची दयाळूवृत्ती एक आशेचा किरण आहे.

मला जीवनातील परिक्षांना सामोरे जाण्याची प्रेरणा माझी आई देते. अनेक वर्षांच्या अनुभवातून आणि कष्टातून मिळालेली तिची बुद्धी हा एक मार्गदर्शक प्रकाशक आहे, जो माझा मार्ग प्रकाशित करतो. मला आत्मविश्वास आणि कृपेने जगाच्या गुंतागुंतीकडे सकारात्मक विचार करण्यास मदत करतो.

शेवटी, माझी आई फक्त पालकापेक्षा जास्त आहे; ती माझ्यासाठी माझा देव आहे. माझी मार्गदर्शक तारा आहे, माझ्या प्रेमाचा आणि प्रेरणांचा सर्वात मोठा स्त्रोत आहे. तिचा प्रभाव माझ्या अस्तित्वाच्या प्रत्येक पैलूवर पसरतो. कृपा, नम्रता आणि अटल भक्तीने ती मला जीवनाच्या प्रवासात मार्गदर्शन करत असते. त्यासाठी मी सदैव कृतज्ञ आहे आणि तिच्या सहवासात घालविलेला प्रत्येक क्षण हा माझ्यासाठी अविस्मरणीय आहे.

**कु. सानिका कदम**
बी. ए. भाग २

# १० गुरू–शिष्य

**गुरु गोविंद दोऊ खडे**

**काके लागू पाय**

**बलिहारी गुरु आपने**

**गोविंद दियो बताय**

आपल्या या दोह्यात संत तुलसीदास म्हणतात की, साक्षात गुरू आणि भगवंत दोघेही समोर उभे राहिले आणि मनात प्रश्न आला की, प्रथम कोणाच्या पाया पडू? उत्तर मिळालं गुरू! कारण गुरुवर्य आपणच तर आम्हाला भगवंत दाखवून दिलात.

भारतात प्राचीन काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आलेली आहे. अगदी द्रोणाचार्य-अर्जुन यांच्यापासून ते स्वामी रामकृष्ण परमहंस-विवेकानंद अशी कितीतरी उदाहरणे आहेत.

संस्कृतमधील एक श्लोक आठवतो :

**अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाजनशलाकया।**

**चक्षुरून्मीलितं येन तस्मै श्री गुरवे नमः।।**

याचा अर्थ असा की, अज्ञानाच्या अंधकाराने आंधळ्या झालेल्या डोळ्यांत ज्ञानरूपी अंजन घालणाऱ्या गुरूंच्या चरणी माझा नमस्कार असो. गुरू ज्ञानाच्या प्रकाशाने शिष्याचे जीवन प्रकाशमान करून टाकतात. एखादया शिष्याच्या जीवनात गुरूंचे नेमके महत्त्व काय हे सांगणारी एक कथा सांगावीशी वाटते.

एकदा स्वामी रामकृष्ण परमहंस आपल्या शिष्यासमवेत नदीच्या काठी फेरफटका मारायला गेले होते तेंव्हा शिष्याने सहज त्यांना एक प्रश्न विचारला की, गुरुवर्य, शिष्याच्या जीवनात गुरूंचे नेमके स्थान काय?

तेव्हा स्वामीजींनी समोरुन येणारी एक छोटी होडी दाखविली आणि शिष्याला विचारले, 'या होडीला कलकत्त्याला पोहोचायला किती वेळ लागेल? शिष्याने थोडा विचार केला आणि म्हणाला, 'पाच तास लागतील.' तेव्हा गुरुजींनी आणखी एक प्रश्न विचारला, 'जर ही छोटी होडी मोठ्या जहाजाला बांधली, तर किती वेळात पोहोचेल?' तेव्हा शिष्य म्हणाला, 'खूप लवकर, दोन तासांत पोहोचेल.'

तेव्हा स्वामीजी म्हणाले, हेच तर शिष्याच्या जीवनातील गुरूंचं महत्त्व आहे. जी गोष्ट, जे ज्ञान मिळण्यासाठी शिष्याला कठोर तपश्चर्या, कठीण साधना करावी लागते, ती गुरूंच्या मदतीने सोपी होते, सहजसाध्य होते. या गोष्टीवरून समजते की गुरूचे महत्त्व आपल्या जीवनात किती आहे.

**जो जो जयाचा देखील गुण ।**

**तो तो म्या गुरू केला जाण ।।**

**गुरूसी आले अगाधपण ।**

**जगी सर्वत्र गुरू दिसे ।।**

गुरू दत्तात्रेयांनी तर ज्याचा एखादा गुण पाहिला त्याला त्या बाबतीत गुरू बनविले. प्रत्येकाकडून कोणता ना कोणता गुण घेण्यासारखा असतो. छोट्याशा मूंगीला तिच्या कामसू वृत्तीसाठी, तर झाडांना त्यांच्या परोप-कारासाठी गुरू बनवता येईल.

तात्पर्य एवढेच की एखाद्याला गुरू बनवा. त्याच्याकडून जेवढे शिकता येईल तेवढे शिका. जितके ज्ञान आत्मसात करता येईल तेवढा करा आणि खुप खुप मोठे व्हा; हीच गुरुचरणी खरी गुरुदक्षिणा...!

**कु. वनिता दादाराव पवार**

बी. एस्सी. भाग १

११

# यत धारयति तत् धर्म

**धर्म** आणि राजकारण म्हटलं की कशात काय असायला हवे, हा प्रश्न पडतो परंतु धर्म आणि राजकारण या गोष्टी पूर्णतः वेगळ्या आहेत. धर्माला आणि राजकारणाला एकाच साच्यात बसविणे हे कोणत्याही दृष्टीने योग्य ठरणार नाहीत. उलट दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या पद्धतीने विचारात घ्यायची गरज आहे. धर्माचा विचार केला असता, धर्म ही विशिष्ट व्यक्तीपुरती एखाद्या समुहापुरती मर्यादित गोष्ट आहे; पण राजकारण हे भूगोलाशी आणि त्या ठिकाणी राहणाऱ्या माणसांच्या उत्पादन व्यवस्थेशी, अर्थ-व्यवस्थेशी, संस्कृतीशी आणि संरक्षण व्यवस्थेशी संबंधीत असते.

गतकाळात धर्म आणि राजकारण या दोन्ही गोष्टी एकच होत्या. धर्मानेच साऱ्यांचे जीवन व्यापले होते. धर्म आणि राजकारण या गोष्टी एकच असल्याने या दोघांमध्ये संघर्षाची परिस्थिती कधी उद्भवली नाही; परंतु जसेजसे लोक आधुनिक होत गेले. आधुनिक विचारांचा हळूहळू प्रसार होऊ लागला, यामध्येच विविध मूल्यांचा उदय होत गेला. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे डोके वर काढू लागली. लोकशाही व्यवस्थेची कल्पना पुढे येऊ लागली. तसेतसे धर्म आणि राजकारणाच्या वेगळेपणाबद्दल दोन्हीमधल्या तफावती-बाबत विचार पुढे येऊ लागले. धर्म आणि राजकारणाकडे दोन वेगळ्या गोष्टी म्हणून पाहण्यास सुरुवात झाली.

धर्म ही हिंदू राजकीय विचारांच्या व्यवस्थेची मध्यवर्ती संकल्पना आहे. पूर्वी धर्म हा कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे, असे मानले जायचे.

मॅकिव्हली हा आधुनिक युगाचा जनक मानला जातो. एक वास्तववादी विचारवंत 'प्रिन्स' नावाचा ग्रंथ यामध्ये मनुष्यस्वभाव, धर्म आणि राजकारण नीतिमत्ता आणि राजकारण या बाबतींत आधुनिक विचार मांडला. तत्कालीन इटलीमध्ये पोप आणि चर्च यांचे वर्चस्व वाढत होते. राज्यव्यवस्था अत्यंत दुबळी बनली होती. धर्मगुरू राज्याचा वापर आपल्या स्वार्थासाठी, आपल्या हितासाठी करीत होते ऐषाआरामाचे जीवन त्या ठिकाणी ते जगत होते. यामुळेच इटलीचे गतवैभव नष्ट झाले होते. असे मॅकिव्हलीला वाटले. म्हणून मॅकिव्हलीने आपल्या 'प्रिन्स' या ग्रंथात धर्म आणि राजकारण वेगळे करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्लेटो आणि अरिस्टॉटलने नीतिशास्त्र आणि राजकारण यांची सांगड घालव्याचा प्रयत्न केला. प्लेटोने राजकारणाला नीतिशास्त्र बनविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर केलेला आपल्याला दिसून येतो. महात्मा गांधीनीही धर्म आणि राजकारण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला दिसून येतो. धर्माशिवाय राजकारण अनैतिक मानले. धर्म आणि राजकारण यांचा समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न महात्मा गांधींनी केलेला आपल्याला दिसून येतो; परंतु मॅकिव्हली धर्म आणि राजकारण यांमध्ये फारकत करतो. धर्म, चर्च आणि पोप यांचे महत्त्व अत्यंत वाढले होते आणि त्यामुळे समाजव्यवस्थेमध्ये राज्यव्यवस्थेपेक्षा धर्माला श्रेष्ठ मानले गेले आणि धर्मगुरू हे अनैतिकपणे वागत होते. वर वर जरी धार्मिक कार्य चांगले वाटत असले तरी धर्म आतुन पोखरला गेला होता. तो नैतिक दृष्ट्या अधोगती आला होता. त्यामुळे मॅकिव्हलीने धर्मनिरपेक्ष राज्य बनविण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला दिसून येतो. मॅकिव्हलीने धर्माचे दोन प्रकार पाडून धर्माला आणि राजकारणाला वेगळे केले आहे. व्यक्तिगत धर्म आणि राजधर्म असे धर्माचे दोन प्रकार सांगितले आहेत. राज्याच्या हितासाठी धर्माचा वापर करणे, वास्तविक जीवन जगत असताना कोणत्याही धर्माचा विचार न करणे यामुळेच मॅकव्हिलीला 'आधुनिक जगाचा जनक' मानले जाते.

**कु. धनश्री आण्णासाहेब क्षीरसागर**
बी. एस्सी. भाग १

# १२ भारत : एक महासत्ता

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून भारत हा एक संस्कृती आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने एक प्रमुख देश आहे १७ व्या शतकात भारत जगातील सर्वांत श्रीमंत देश होता. परंतु वारंवार परकीय आक्रमण व ब्रिटिश राजवटीमुळे भारत देशाचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे.

पण आताच्या काळात भारत देश विकासाच्या मार्गावर आहे आणि सातत्याने त्याची प्रगती होत आहे. एक महासत्ता होण्यासाठी जी वैशिष्ट्ये एखाद्या देशाला पाहिजे असतात, ती सर्व भारत देशाच्या संदर्भात दिसून येतात. म्हणूनच भारत देश हा येत्या काही काळात महासत्ता होऊ शकतो.

**महासत्तेची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**

**१. नैसर्गिक साधनसंपत्ती**

भारतात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. या नैसर्गिक संपत्तीचा देशाच्या प्रगतीमध्ये उपयोग होतो. यामध्ये खनिजे, लोखंड व त्याचे मिश्रधातू, मौल्यवान धातू, सौरऊर्जा, पवनऊर्जा, पाणी, जमीन, सोने-चांदीच्या खाणी, शेतीयुक्त जमीन, पशुपालन, कुक्कुटपालन यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. भारत हा जगातील सर्वांत मोठा सातवा देश आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ३२,८७,२६३ कि. मी. आणि समुद्रकिनारा ७,५१७ कि. मी. आहे.

**२.धोरणात्मक साधन**

धोरणात्मक साधनामध्ये देशाची संस्कृती, परदेशीय संबंध, देशाची प्रतिष्ठा यांसारख्या वैशिष्ट्यांचा समावेश होतो.

भारतीय संस्कृती : भारताची प्राचीन सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि सभ्यता, त्यात नृत्यप्रकार, साहित्य, स्पर्धा, खेळ; उा. : क्रिकेट, हॉकी, कबड्डी, फुटबॉल, कुस्ती, अध्यात्मवाद, आयुर्वेद यांचा समावेश होतो.

अलीकडील काळात बॉलिवूड क्षेत्रामुळेही भारताला नवीन ओळख मिळाली आहे. भारतीय चित्रपट संपूर्ण आशियामध्ये लोकप्रिय आहेत आणि भारताची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

**भारतीय सांस्कृतिक संबंध केंद्र (ICCR) :**

आयसीसीआर ची जगभरात विविध शहरांमध्ये ३७ सांस्कृतिक केंद्रे आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना भारतात शिक्षण घेण्यासाठी सुविधा आणि प्रोत्साहन प्रदान करतात.

भारतातील संविधानिक मूल्ये जसे धर्म-निरपेक्षता, सर्वसमावेशकता, समानता, न्याय, लोकशाही राज्य ही मुल्ये महत्त्वाला ठरतात.

यामुळे संपूर्ण जगात देशाची प्रतिष्ठा वाढत आहे. विशेषत: भारताचे शेजारी देश, जागतिक घडामोडींवर नियंत्रण ठेवण्यासाठी, उदा. हवामान बदल, मानवाधिकार, लोकशाही यांसारख्या मुद्द्यांवर जागतिक नियमांवर प्रभाव टाकण्यासाठी भारत (धोरणात्मक साधन (Soft Power) चा उपयोग करू शकतो.

**३. सैन्यशक्ती**

ग्लोबल फायर पॉवर इंडेक्सनुसार भारताचे सैन्य जगातील चौथ्या क्रमांकाचे शक्तिशाली सैन्य मानले जाते. भारतात १.४ दशलक्षाहून अधिक सक्रिय कर्मचारी आहेत. ज्यामुळे ते जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सैन्यदल बनले आहे. भारताला जगातील तिसरे सर्वांत मोठे संरक्षण बजेट आहे. २०२३-२४ मध्ये भारताने आपल्या संरक्षण बजेटमध्ये ७३.९ अब्जांची तरतूद केली आहे. आपल्या भारताचा आण्विक संशोधनामध्ये मोठा वाटा आहे. भारत देशातील विविध संशोधकांनी विविध क्षेपणास्त्रे बनविले आहेत. जी काहीच मिनिटांमध्ये शेकडो ते हजारो किलोमीटरचा टप्पा गाठून शत्रुराष्ट्राच्या हल्ल्याला उत्तर देऊ शकतात. आण्विक संशोधनामुळे भारत जमीन, हवा आणि समुद्रातून अण्वस्त्रे प्रक्षेपित करू शकतो. उदा. : अग्नी-ब्रम्होस, पृथ्वी-शौर्य, अस्त्र निर्भय इत्यादी.

**४. औद्योगिक विकास**

स्वातंत्र्यापूर्वी भारताचा आर्थिक विकास झपाट्याने घटत होता. विकासाचा

मार्ग टिकवून ठेवण्यासाठी देशाला गंभीर आव्हानांचा सामना करावा लागला. अशा काळात या पार्श्वभूमीवर 'मेड इन इंडिया'ची रचना करण्यात आली. भारताची गुंतवणूक सुलभ करणे, नवनिर्मितीला प्रोत्साहन देणे आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा विकसित करणे ही त्याची मुख्य उद्दिष्टे आहेत. व्होकल फॉर लोकल या अग्रगण्य उपक्रमांपैकी एक म्हणून भारताच्या उत्पादन क्षमतांना चालना देण्यासाठी नव्हे, तर जागतिक स्तरावर आपली औद्योगिक क्षमता प्रदर्शित करण्याचा प्रयत्न भारत देश करीत आहे. एक मजबूत उत्पादन क्षेत्र विकसित करण्यावर देश भर देतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गरिबीचे प्रमाण बरेच घटत आहे. जागतिक क्षेत्रांमध्ये भारताचे स्थान एक प्रमुख स्पर्धक म्हणून बळकट होत आहे.

**५. लोकसंख्या**

भारत देशातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या १४२.८६ कोटी इतकी आहे. यात ८ ते ३५ वर्षांच्या नागरिकांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे भारत हा देश जगात 'तरुणांचा देश' म्हणून ओळखला जातो. जागतिकीकरणामुळे इंटरनेटच्या वापरामुळे भारताला एक नवी ओळख मिळाली आहे. परकीय संबंधामुळे देशातील नागरिकांना रोजगाराची संधी मिळत आहे. देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी भारत सरकारने प्रशिक्षित शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे.

**६. आर्थिक विकास**

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापड गिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन तृतीयांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीची संबंधित व्यवसायांशी चालतो; पण आधुनिक काळात याचे प्रमाण कमीकमी होत आहे. औद्योगिकीकरण व प्रशिक्षित शिक्षणामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. अलीकडील काही वर्षांत भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरुण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्त्रोतांच्या सेवा करणारा (Out Sourcing) देश म्हणून नावारूपाला आला आहे. भारत हा कुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वांत मोठा निर्यातक आहे.

याचबरोबर उत्पादन, औषध निर्माण, जैव-तंत्रज्ञान, दूरसंचार, जहाज निर्माण, विमान निर्माण आणि पर्यटन या क्षेत्रांमधील भारताची क्षमता ही वेगाने वाढताना दिसत आहे. यामुळे गरिबीचे प्रमाण घटत असल्याचे दिसत आहे व भारत देशाचा आर्थिक विकास होत आहे.

**समाधान दामोटरे**
बी. ए. भाग ३
अर्थशास्त्र

१३

# गाडगेबाबा आणि सामाजिक कार्ये

**आधुनिक** महाराष्ट्राच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टिने कार्य करणाऱ्या ज्या अनेक व्यक्ती, महात्मे व संत होऊन गेले, त्यांत संत गाडगे महाराजांचा क्रम वरचा आहे. कोणताही गाजवाजा, गुरुशिष्यांचा गोतावळा किंवा स्वतंत्र संस्थान निर्माण न करता केवळ आपल्या आचरणाने, कीर्तनाने सर्वसामान्य माध्यमांद्वारे समाजसुधारणा घडविण्याचा प्रयत्न गाडगे महाराजांनी केला. समाजातील अज्ञान, अयोग्य व घातक सवयी, अनिष्ट, सामाजिक व धार्मिक परंपरा आघात करण्याचे कार्ये आणि अशी अनेक कार्य गाडगेबाबांनी कीर्तनातून केले.

अखंड परिश्रमाद्वारे दीनदुबळ्यांना, गोरगरिबांना मदत केली. आपल्या कृतीने समाजासमोर असामान्य त्यागाचे चित्र उभे केले. विचारांचा गोंधळ न करता सरळ पद्धतीने नीतिविचार समजावून देणारे आणि तो विचार आचरणात आणणारे गाडगे महाराज हे अलौकिक व्यक्तीमत्त्व होते. धर्म सांगायचा नसतो, जीवनात जगायचा असतो, धर्म ग्रंथात नसतो, जीवनात असतो. असे सांगणारे ते थोर संत होते. गाडगे महाराज धर्माचे सार सांगताना ते म्हणतात, भुकेल्या जिवाला अन्न द्या, तहाणलेल्याला पाणी द्या, जे विद्यास्त्र आहेत त्यांना वस्त्र द्या, बेहरांमाना आसरा द्या, बेकारांना नोकरी द्या, जे रोगी आहेत त्यांना औषधोपचार करा, जे दु:खी व निराश आहेत, त्यांना जगण्याची हिंमत द्या, मुला-मूलींना शिक्षण द्या, कर्ज काढू नका, चैन करू नका. कष्ट केल्याशिवाय भाकरी करू नका. सातत्याने उद्योग करीत रहा. सतत पन्नास वर्षे जिवाच्या आकांताने जनसामान्याचे प्रबोधन करणारे हे लोकोत्तर महापुरुष होते.

**गाडगे महाराजांचा अल्पपरिचय**

वऱ्हाड प्रांतात अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शिवगाव येथे दि. २३ फेब्रुवारी, १८७६ रोजी गाडगे महाराजांचा परीट घराण्यात जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी व आईचे नाव सखुबाई होते. त्यांचे वडील जाणोरकर होते. त्यांची घरची परिस्थिती चांगली होती. शेणगाव हे शहरापासून दूर असल्यामूळे सुधारणांचा अभाव होता. मात्र सर्वांत जास्त दिसणाऱ्या दारूच्या व्यवसायाचा सर्वत्र प्रसार झाला होता. परीट समाज हा फार मोठ्या प्रमाणात सुधारलेला नव्हता. लोकांचे कपडे धुवावेत व त्याबद्दल मिळणाऱ्या मोबदल्यात त्यांनी आपला चरितार्थ चालवला. त्यातच कर्ज काढून सण साजरे करावेत, मुलाच्या जन्मावेळी किंवा कोणाच्या मृत्यूच्या वेळी देवाला बकरे कापावे, दारू प्यावी आणि कर्ज फेडण्यात पुढील आयुष्य घालवावे हीच सर्वत्र परंपरा होती.

झिंगराजींची आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे ते दारूच्या व्यसनाधीन झाले. सर्व जमीन, घर सावकाराच्या ताब्यात होते. नवऱ्याच्या व्यसनामुळे सखूबाईंना मोलमजुरी करावी लागली. सखुबाईचे बंधू चंद्रभानजी यांनी तिचा मुलगा डेबू याला दापुरे येथे आणले.

लहानपणापासून गाडगे महाराजांना भजनाची आवड होती. संतश्रेष्ठ तुकारामांचे अनेक अभंग त्यांना पाठ होते. बारा वर्षांच्या थोर तपश्चर्येनंतर करण्यास सुरुवात केली. जेथे जातील तेथे लोकांसमोर कीर्तनांद्वारे ते आपले विचार मांडत असत. बाबांनी कीर्तन हे समाज प्रबोधनाचे साधन बनविले. त्यांनी **'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला'** या नामसंकीर्तनाने सुज्ञ करण्याचा प्रयत्न केला. समाजसुधारणा व लोकशिक्षणासाठी त्यांनी कीर्तन माध्यमाचा उपयोग केला. बांबांनी आपल्या कीर्तनातून भुकेलेल्यांना जेवण, तहानलेल्यांना पाणी, मुलामुलींना शिक्षणासाठी मदत, अंध, पंगू रोग्यांचा औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी, मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुणीचे दु:खी व निराशांना हिंमत हा संदेश दिला. बाबा निरक्षर असले तरी लोकशिक्षणासाठी व समाजाच्या सुधारणेसाठी अतिशय उपयुक्त असलेले अभंग तें चटकण सांगू शकत.

गाडगे महाराजांचे कीर्तन हा एक लोक-विलक्षण अनुभव असे. त्यांचे कीर्तन म्हणजे श्रोत्यांशी चाललेला सुसंवाद असे. ते कीर्तनात श्रोत्यांना प्रश्न विचारून त्यांना त्यांचे अज्ञान, दुर्गुण व दोष यांची जाणीव करून देत.

**कु. दीपली कालिदास शिंदे**
बी. ए. भाग २

# १४ ओढ लावणारं घर...

**'घर'** हा शब्दच एवढा सुखद, आल्हाद-दायक आणि मनाला चेतना देणारा आहे. की तो सर्वांना तत्काळ प्रेम, वात्सल्य या भावनांची जाणीव करून देतो. घर हा शब्दोच्चार कानावर पडला तरी, प्रत्येकाच्या दृष्टिपटलावर घरातील आठवणींची क्षणचित्रे उभी राहतात. मूलभूत गरजांपैकी निवारा ही गरज भागवते ते घर, दगडाच्या भिंतींनाही बोलके करते ते घर, निर्जीव असूनही सर्वांना प्रेमाच्या बंधनात बांधून ठेवते ते घर. आपलेपणा कर्तव्य, जबाबदारी यांची जाणीव करून देते ते एक जीवनातील घर हे संपत्ती किंवा साधन नसून परमोच्च आनंदाचे साध्य आहे. मोठे मोठे बंगले, साध्य मोठे-मोठे गगनचुंबी इमारती आपण पाहतो. परंतु त्याठिकाणी प्रेमाचा, आपुलकीचा लवलेशही दिसून येत नाही, त्याला घर म्हणावे कसे? घर शब्दचं मुळी प्रेमाचं प्रतीक आहे. घर या शब्दात आपलेपणा, सहानुभूती व प्रेमाची भावना दडलेली आहे. प्रेमाचा निवास म्हणजे घर. ज्या ठिकाणी पैसा, संपत्ती मुबलक आहे; परंतु सुख, समाधान नाही, एकमेकांविषयी सहृदयता नाही, ते घर नसून दुःखाचे उगमस्थान मानले जाते.

कितीही धनाढ्य व्यक्ती असू द्या, बक्कळ पैसा, कमवू द्या, परंतू त्याच्या चेहऱ्यावर घरी आल्यावर जो आनंद ओसंडून वाहत असतो ना, तो इतर कुठल्याही ठिकाणी गेल्यावर दिसून येत नाही. घर म्हणजे प्रेम, आपुलकीचे माहेर. घरी आल्यावर आई-वडील, बायको-मुलांना पाहून जे समाधान मिळतं, ते स्वर्गसुखालाही लाजवेल अशा प्रकारचं असतं. पृथ्वीवर असा एकही मनुष्य नसेल की, ज्याला स्वतःचं घर असावं वाटत नाही. कित्येकांची तर उभी हयात जाते; परंतु स्वतःचं घर मात्र त्यांच्याकडून बांधणं होत नाही. संपूर्ण आयुष्य एखाद्या झोपडीत किंवा बांबूच्या तंबूमध्ये व्यतीत करताना मनातला विचार मनातच दाबून काही समाज-बांधव अखेरचा श्वास होतात. काहींना नशिबाने जन्मतःच अगदी चांगल्या प्रकारच्या घरामध्ये निगस मिळतो. परंतु काहींना मात्र आश्रितासारखं एखादया ठिकाणी इच्छेविरुद्ध जगून स्वतःचा स्वाभिमान गहाण ठेवून संपूर्ण जीवन व्यतीत करावं लागतं. काहीजणांचं पहिलं आणि शेवटचं स्वप्न घर हेच असतं. घर झालं म्हणजे जीवनात सर्व काही झालं, ही इच्छा उरी बाळगून ते सदैव **'घर'** या स्वप्नाचा पाठलाग करीत असतात. ते तडीस गेलं म्हणजे जिवाचा घोर संपला.

दोन दिवस कुठे गावाला, तीर्थयात्रेला किंवा विरंगुळा म्हणून फिरायला गेलेल्या व्यक्तीला घराची आठवण मात्र क्षणोक्षणी सतावत असते. **'भेटी लागे जिवा लागलीसे आस'** या उक्तीप्रमाणे कधी एकदा घरी जातोय आणि घरदार पाहून जीव समाधानी पावतोय, असे त्यांच्या जिवाला झालेलं असतं. घर हे प्रेम आणि वात्सल्याचं मूर्तिमंत उदाहरण आहे. घरापासूद दूर, बाहेरगावी राहणाऱ्याला घराची आठवण येऊन डोळ्यांतून आसवे गाळताना कैकवेळा आपण पाहत आलो आहोत. छोटंसं घर असेल तर भावडांमध्ये बसण्याच्या, झोपण्याच्या जागेवरून झालेले वाद-विवाद, भांडण-तंटे यांची मोठे झाल्यावर आठवण येऊन त्यांचे गहिवरून येतं. कारण तेथे प्रेमाची नाळ जोडलेली असते. जोपर्यंत घरातून झऱ्याप्रमाणे प्रेम झिरपत असते, तोपर्यंत आपली प्रेमाची तहान भागविण्यासाठी सगळ्यांनाच घराची ओढ सतावत असते. दिवसभर मनमुरादपणे भ्रमंती करण्याऱ्यांचे पाय तिन्हीसांज झाल्यावर आपसुकच घराकडे ओढले जातात.

आपल्या घरापासून इतरत्र बाहेर शहरात, जिल्ह्यात अथवा राज्यात तात्पुरत्या स्वरूपात वास्तव्य करण्यासाठी किंवा नोकरी, व्यवसायानिमित्त गेलेल्या, भाडेकरूच्या रूपानं राहणाऱ्या लोकांना सुट्टीच्या काळात गावी येऊन घर आणि घरातील सगळ्या माणसांना भेटण्याची जी ओढ असते, ती अगदी शब्दात वर्णन न करण्यासारखी त्यांचा आनंद गगनात मावेनासा असतो. कधी एकदा घरी येतो आणि घरातील सगळ्यांना डोळे भरून पाहतोय असे त्यांना होऊन जाते. वाळलेल्या झाडाला वसंत ऋतूत पालवी फुटावी तसं त्यांच्या मनाला आनंदाची पालवी फुटत असते. आपले घर, शेत-शिवार यांची प्रत्येकाला जी आस असते, ती जिवाला कासावीस करणारी असते.

अहो, घरून शाळेत गेलेलं पोरगंसुद्धा सहा तास शाळेत थांबताना त्याला अनेकदा घराची आठवण होत असते. कधी घरी जातोय आणि घराच्या अंगणात खेळाच डाव मांडतोय. हे त्याच्या मनात सदोदित घोळत असते. शाळेत असताना घराची आठवण आली, मन बेचैन झाले तर पोरांचं ठरलेलं वाक्य, **'सर, माझ्या पोटात खूप दुखतंय, मी घरी जाऊ का?'** म्हणजे घरी जाण्यासाठी नाना प्रकारचे बहाणे लहान मुलेच नव्हे तर अगदी मोठी माणसेही करताना आपण पाहिलेली आहेत. घरी आल्यावर पोटच काय, पण सगळे विकार क्षणात होत्याचे नव्हते होत. एवढी घराच्या प्रेमात, भेटीत शक्ती आहे.

खेड्यातील घराची संकल्पना तर फारचं छान असते. गोठ्यातील गाई अन् घरातील बाईशिवाय घराला घरपण नाही, असं आवर्जून खेड्यांत म्हटलं जातं. घर हा शब्दच मुळी व्यापक अर्थाने वापरला जातो. घर म्हणजे फक्त मुक्कामाचे ठिकाण किंवा चार भिंती नव्हे तर, त्या भिंतीमध्ये जिवंतपणा असणं हे घराचे लक्षण आहे. बंगला हवेली हे फक्त आकाराने मोठे, मात्र प्रेम, आपुलकीनं मोठ ते घर. पैसा किंवा मोठमोठ्या वस्तू हे घराचे अलंकार नसून घराला घरपण येतं ते आपल्या माणसांच्या वास्तव्यानं. अवाढव्य परंतु माणूसपण हरवलेल्या चार भिंती वा इमारतीला घर म्हणता येणार नाही. सर्व गोष्टी विपुल प्रमाणात असूनही जिथं माणसं येण्यासही कच खातात जिथं माणसं सोडून निर्जीव वस्तूंचचं जास्त वास्तव्य, ते घर नव्हेतर चार भिंतींची इमारत म्हणता येईल.

एकत्र कुटुंब विभक्त झाल्यानंतर एकत्रपणातील घराच्या आठवणी मात्र त्यांच्या डोळ्यांतून टीपं गाळताना दिसतात आता घरांचा आकार वाढला, मात्र प्रेम कमी झाले, भिंती उंचावल्या, परंतू माणूसकीचा पाया मात्र खचला आहे. पूर्वी घरी आल्यावर सगळ्यांच्या प्रेमाचं मोरपीस सर्वांगावरून फिरवल्यावर हायसं वाटायचं, तेच आता पैशाच्या लोभापाची वेगळे झालेले घर एकत्र पणाच्या आठवणींना स्मरून गळ्यात गळा घालून रडत आहे. पूर्वीचे घर छोटे, विचार मात्र मोठे. आज घराचा आकार मोठा किंवा वाढला मात्र विचार तेवढेच तोकडे झाले. पूर्वीच्या काळी घर कितीही छोटे असले तरी जेवण करताना दाटीवाटीने, रेटारेटी करून एकत्रीतपणे जेवण करत, त्यातच आपलेपणा होता. घर लहान असले तरी आई-बाबांचा दबदबा मात्र मोठा होता. त्या छोट्या घरात पाहिलेले स्वप्न आज सत्यात उतरले; पण ते पाहण्यास मात्र आता घर विखुरले. आज धनधान्य भरपूर आहे. मात्र आनंद व समाधान गमावले आहे. घराचा एकोपा विस्कटला आहे. बापाचा धाक, आईची माया, भावाची साथ आणि बहिणींचे प्रेम या सर्वांची ओढ लावणारं घर आता क्वचितच उरलं आहे.

**कु. वैष्णवी अंकुश पाटील**
बी. ए. भाग २

# १५ महात्मा फुले यांचे जीवन व कार्य

## जीवन

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल, १८२७ रोजी झाला. त्याच्या पूर्वजांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याचे पणजोबा कटगुणचे चौगुले होत; परंतु गावातील कुलकर्ण्यांशी त्यांचे भांडण झाले असल्याने त्यांनी ते गाव सोडले आणि पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील खानपंडी या गावी येऊन स्थायिक झाले. गोविंद याचे लग्न चिमणाबाईशी झाले होते. या दाम्पत्याला पुत्र राजाराम व जोतिबा ही दोन मुले होती. जोती म्हणजे जोतिबा पुढे '**महात्मा जोतिबा फुले**' या नावाने विख्यात झाले. जोतिबा एक वर्षाचे असतानाच त्यांची आई चिमणाबाई मरण पावली. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी गोविंदराव यांच्यावर येऊन पडली. ती त्यांनी अतिशय व्यवस्थिपणे पार पाडली.

आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे, असे गोविंदरावांना वाटत होते. त्यामुळे वयाच्या ७व्या वर्षीच त्यांचे नाव शाळेत दाखल केले. तेथे संस्कृत, व्याकरण, ज्योतिष, वेदान्त, धर्मशास्त्र यांसाख्या विषयांतील शिक्षण दिले जाई. त्यामुळे त्या वेळचे वातावरण विद्याभ्यासाला पोषक नव्हते. शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटलेले नव्हते. गोविंदरावांचा बुद्धीभ्रम झाला. परिणामी दोन-तीन वर्षांतच जोतिबांना शाळेतून काढण्यात आले. तरीही शिक्षणात खंड पडला नाही, फावल्या वेळेत ते वाचन करीत असत. जोतिबा बाग कामाल लक्ष घालून वडीलांना मदत करू लागले होते. जोतिबांचे शिक्षण थांबले असले तरी सुदैवाने ते पुढे चालू राहण्याचा योग आला. जोतिबांची चिंतनशीलता पाहून त्यांच्या शेजारी राहणारे उर्दू शिक्षक गफार बैग मुन्शी व धर्मोपदेशक लिजिट साहेब यांनी त्यांचे शिक्षण पुन्हा चालू करावे, असा आग्रह गोविंदरावांकडे धरला. त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जोतिबांनी सरकारी नोकरी करण्याचा विचार केला नाही. आपले संपूर्ण जीवन त्यांनी लोकसेवेत वाहून घेतले.

**कार्ये**

**१) स्त्री-उद्धाराचे कार्य**

महात्मा फुले यांच्या काळात भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट होती. आपल्या समाजाने स्त्रियांना सर्व प्रकारचे हक्क नाकारले होते. भारतीय स्त्रीशिक्षणाचा आभाव ही गोष्ट महात्मा फुले यांनी अचूक ओळखली होती. त्यांच्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे धर्मबाह्यच आहे, अशी पक्की समजूत होती; पण स्त्रियांना शिक्षण मिळाल्याखेरीज त्यांचा उद्धार शक्य नाही, असा जोतिबांचा ठाम विश्वास होता.

**२) स्त्री-शिक्षण**

स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करावयाची असेल तर त्यांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून दिले पाहिजेत, हे ओळखून जोतिबा फुले यांनी प्रथम स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. त्या काळी पुण्यात स्त्रियांच्या शिक्षणाची अजिबात सोय नव्हती.

ऑगस्ट १८४८ मध्ये जोतिबा फुले यांनी पुण्यात बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलीची पहिली शाळा सुरु केली. या शाळेत महार, मांग, चांभार, इत्यादी अस्पृश्य समाजातील मुलींना शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतिबा स्वतः शिक्षक म्हणून शिकवीत होते.

**३) विधवा पुनर्विवाह**

त्या काळात समाजात बालविवाहाची प्रथा सर्रास रूढ होती. जरठ-कुमारी विवाहदेखील होत असत. त्यामुळे साहजिकच समाजात विधवांची संख्या मोठी होती. त्यांची स्थिती शोचनीय होती. हे पाहून त्यांचे मन अस्वस्थ झाले. स्त्रियांचे हाल थांबावेत, त्यांच्या जीवनाला चांगले वळण लागावे म्हणून जोतिबांनी विधवा पुनर्विवाहाचा धडाडीने पुरस्कार केला. विविध लेख लिहून व भाषणे करून विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीस सक्रीय पाठींबा दिला. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन पुण्याच्या गोखले बागेत १८६४ मध्ये एक पुनर्विवाह घडवून आणला.

**४) अस्पृश्यांसाठी शिक्षणप्रसाराचे कार्य**

महात्मा फुले हे सामाजिक समतोल

समतेच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक होते. अस्पृश्यांची समाजातील ही स्थिती पाहून जोतिबांचे अंतःकरण हेलावून जाई. अस्पृश्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी कार्य करण्याचा त्यांनी निश्चय केला. त्याकरिता अस्पृथ्यांना प्रथम शिक्षण देऊन त्यांच्यातील अज्ञान दूर केले पाहिजे. याची त्यांना जाणीव झाली. अस्पृश्यांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी म्हणून त्यांना शिक्षणाकडे आपले लक्ष केंद्रीत केले. अस्पृश्य समाजाला शिक्षण देण्याइतके अधिक महत्त्वाचे आणि आधिक हिताचे काम दुसरे कोणते ही नाही अशी त्यांची श्रद्धा होती.

**५) शेतकऱ्यांसाठी केलेल कार्ये**

भारत हा शेती प्रधान देश आहे. देशाची समृद्धी व भरभराट शेतकऱ्यावर असते. असे असले तरी भारतातील शेतकरी सुखी व समाधानी नव्हता. सावकाराकडून त्यांचे शोषण होत होते. मागासालेपणा, अज्ञान, कर्जबाजारीपणा, दारिद्र्य या मुळे भारतीय शेतकरी पिचलेला होता. जोतिबांनी शेतकऱ्यांच्या हलाखीचे सूक्ष्म अवलोकन केले होते. अशा शोषित लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्याचा निश्चय त्यांनी केला.

भारतीय शेतकऱ्यांचे खरेखुरे कैवारी या शब्दांत त्यांचे वर्णन करणे उचित ठरते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य महात्मा फुले यांनीच केले. शेतकऱ्यांच्या दुःख व दारिद्र्याचे मूळ त्यांच्या अज्ञानात आहे, हे स्पष्ट करताना ते म्हणतात :

**विद्येविना मती गेली।**
**मतीविना नीती गेली।**
**नीतीविना गती गेली।**
**गतीविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शुद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।**

**कु. शुभांगी हनुमंत वाघ**
बी. ए. भाग २

१६

# माझी सहल

**बघता**-बघता दिवस ठरला. नको-नको म्हणणारे पण तयार झाले. लगबग सुरू झाली. कुठे जायचे हे ठरले. उत्सुकता वाढली. तारीख व वेळ ठरली. गाडी ठरली. सर्व नियोजन ठरले व कॉलेज जीवणातील मित्र-मैत्रिणींबरोबरची शेवटची सहल निघाली...

तसे सहलीचे ठिकाण निसर्गरम्य होते व ऐतिहासिकपण होते. म्हणजेच महाबळेश्वर व प्रतापगड ही दोन मुख्य ठिकाणे होती. दिनांक २५ मार्च, २०२५, वेळ होती पहाटे ४ वाजता. तसा आम्हाला उशीरच झाला. कोण लवकर तर कोण उशीरा आले. प्रवासाला सुरवात झाली. भक्तीमय गीत ऐकत प्रवासाला सुरवात झाली. सहलीतील पहिले पर्यटनस्थळ हे धार्मिक म्हणजे वाईचा कृष्णाघाट. नदीकिनारी असलेला वाई या गावाचे ग्रामदैवत अर्थात ढोल्या गणपतीचे मंदिर. या मंदिराची स्थापना सरदार रास्ते यांनी केली. सन १७६२ मध्ये एकाच दगडातून घडविलेली ही गणरायाची मूर्ती होय.

पुन्हा आम्ही पुढचा प्रवास सुरू केला. तो म्हणजे प्रतापगड. प्रतापगडाकडे जाताना लागणारा तो परसणी घाट हा डोळे फिरविणारा घाट आहे. या घाटमाथ्यावरून दिसणारे घनदाट असे जंगल, तसेच मनाला भुरळ पाडणारी हिरवीगार अशी झाडे. असेच गाणी, गप्पा, गोष्टी, चेष्टा करीत पोहोचलो प्रताप-गडावर. प्रतापगडचे ते निसर्गसौंदर्य व ऐतिहासिक गोष्टी पाहून मन भाराऊन गेले. आम्ही किल्ल्यावर महादरवाजा, झेंडा बुरूज, भवानी मंदिर, केदारेश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, ऐतिहासिक विहीर असे सर्व ठिकाणे पाहून पुढील प्रवासासाठी प्रतापगडाचा निरोप घेतला आणि महाबळेश्वरकडे रवाना झालो.

महाबळेश्वर हे पश्चिम महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण होय. महाबळेश्वर सहल म्हणजे शब्दांत व्यक्त न करता येणारा अविस्मरणीय अनुभव आहे. विशेष म्हणजे आपल्याला आकर्षित करणारी स्ट्रॉबेरी ही फक्त महाबळेश्वरमध्ये मिळते. आम्ही ऑर्थर सीट पॉइंट, विल्सन पॉइंट पाहिले. या सर्व पॉइंटची उंची तशी समुद्र सपाटीपासून ४५०० मीटरइतकी होती. ही सर्व ठिकाणे पाहतपाहत आम्ही रात्री महाबळेश्वर मंदिरात पोहोचलो. हे महादेवाचे मंदिर तेराव्या शतकातील आहे. अफझलखानच्या तंबूवरील कापून आणलेले सोन्याचे कळस छत्रपती शिवाजी महाराजांनी या महाबळेश्वर मंदिरास अर्पण केले होते. असे तेथील मंदिरातील काही लोकांनी आम्हांला सांगितले.
महाबळेश्वर परिसरातील बाजारपेठ पाहून झाल्यावर आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

तसे पाहता सहलीमुळे फक्त मज्जा, मस्ती नव्हे तर त्या पर्यटन क्षेत्राचा अभ्यास व तेथील जीवन निसर्गरम्य वातावरण, नवनवीन गोष्टी शिकता येतात. प्रवासात येणारी ती मज्जा, ती गाणी, त्या सर्व आठवणी या स्मरणात राहणाऱ्या असतात. सहलीमुळे ज्यांना कधी आपण ओळखत नव्हतो, कधी बोलत नव्हतो. अशा मित्रांबरोबर मैत्रिणींबरोबर ओळख होते. गप्पागोष्टी होतात, स्वभाव कळतात. आयुष्यात नवीन मित्रांची तसेच मैत्रिणींची भर पडते. सहल हा एक आयुष्यातील महत्त्वाचा भाग असतो. सहलीला शिस्त लावणाऱ्या गायकवाड मॅडम व सर्वांची काळजी करणारे व सर्वांना सोबत घेऊन चालणारे बनकर सर कायम आठवणीत राहतील. असे शिक्षक व मित्रमैत्रिणी एक आठवणीचा भाग राहतील. पुढे कधी मित्र-मैत्रिणींबरोबर सहल होईल की नाही माहीत नाही; पण ही सहल कायम आठवणीत राहील...

**कु. रोहित जगताप**
बी. ए. भाग ३

१७

# छायाचित्रीकरण

**वीस** वर्षांपूर्वी रोलच्या कॅमेऱ्यातून टिपलेले छायाचित्र हातात पडण्यासाठी पंधरा दिवस वाट पाहावी लागत होती. डिजिटल कॅमेरा आणि मोबाईलमुळे काळ बदलला. छायाचित्रीकरणाची माध्यमेही बदलत चालली आहेत. डिजिटल कॅमेरा आणि मोबइलमध्ये टिपलेले छायाचित्र काही सेकंदांत येऊ लागले. आत्ताही छायाचित्रीकरण या कलेतली रोचकता मात्र कायम राहिली आहे. फोटो काढण्यासाठी एक्साइटमेंट तशीच आहे.

हजार शब्दांत जे सांगता येणार नाही ते एक छायाचित्र सांगते असे म्हणतात. छायाचित्रामधील एखादी व्यक्ती, वस्तू व घटनेची टिपलेली प्रतिमा यातून ंहे दिसते. छायाचित्रणाचा शोध कोणत्याही एका शास्त्रज्ञाने लावलेला आहे, असे म्हणता येणार नाही. या कलेमध्ये रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, गणित या विषयांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील शास्त्रज्ञांचे यात योगदान आहे.

चौदाव्या शतकात कॅमेरा आबस्कुरा किंवा कॅमेरा ल्युसिडा हा कॅमेरा लिओनार्दो-दा-विंची यांनी वापरला. हे सर्वज्ञात आहे. पुढे अठराव्या शतकात कॅमेरा आबस्कुराचा उपयोग त्यावेळचे चित्रकार देखावे चित्रित करण्यासाठी करीत असत. या कॅमेऱ्यात सुधारणा करून, कागदावर रासायनिक प्रक्रिया करून चित्र उमटवण्याची कल्पना पुढे आली. कला, हस्तकला, विज्ञान आणि छायाचित्रणाच्या इतिहासाला हे समर्पित आहे.

१९ ऑगस्ट हा 'जागतिक छायाचित्र दिवस' च्या रूपात साजरा करतात. हा दिवस त्या छायाचित्रकारांच्या कामाला प्रोत्साहित करण्यासाठी साजरा करतात. ज्यांनी आपले अनमोल क्षण छायाचित्रीकरणाच्या रूपात कैद केले. त्यांना नेहमीसाठी स्मरणात ठेवले, तसेच या दिवशी ज्यांनी इतरांना हे कौशल्य स्वीकारण्यास प्रेरित केले त्यांच्या योगदानासाठी त्यांचे स्मरण केले जाते. जागरूकता निर्माण करणे, कल्पना सामायिक करणे आणि या क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन देणे हे जागतिक छायाचित्रण दिनाचे महत्त्व आहे.

प्रकाश-संवेदी वस्तूद्वारे प्रकाश किंवा विद्युत चुंबकीय उत्सार यांची नोंद करून टिकाऊ प्रतिमा निर्माण करण्याच्या पद्धतीला 'छायाचित्रण' असे म्हणतात. छायाचित्रण ही कला आणि शास्त्र आहे. छायाचित्रण ही एक कला छायाचित्रणकार व त्याच्या कॅमेरावर अवलंबून असते. सध्या डिजिटल कॅमेरा आणि मोबाईलमधील कॅमेरे जास्त लोकप्रिय आहेत. तसेच उद्योगव्यवसाय, जाहिराती, उत्पादन, कला, मनोरंजन, बहुसंवाद यांसाठी छायाचित्रणाचा वापर होतो. छायाचित्रीकरण ही आपला इतिहास जपून ठेवणारी एक अजरामर कला आहे. आपण छायाचित्रीकरण कॅमेऱ्याची योग्य निवड आपल्या वापरानुसार व आवश्यकतेनुसार करावी, फोटोग्राफीसाठी प्रामुख्याने प्रकाशाचा स्त्रोत खूप महत्त्वाचा असतो.

पोर्ट्रेट, लँडस्केप, वन्यजीवन, माहितीपट, पर्यावरण असे छायाचित्रणाचे प्रकार आहेत. सध्याच्या काळात छायाचित्रीकरण हा एक आवडीचा विषय बनलेला आहे. छायाचित्रीकरण ही अशी एक कला आहे. ज्यामूळे आपल्या डोळ्यांना चांगले पाहण्याची एक वेगळी नजर विकसित होते. छायाचित्र हे नेहमी बोलके असते आपणास छायाचित्र पाहून त्याच्याशी संवाद करता आला पाहिजे.

एक छायाचित्र आख्या संपूर्ण घडलेला प्रसंग डोळ्यांसमोर उभा करते. छायाचित्र काढतेवेळी ते पुढे कोणास दाखवायचे आहे हे महत्त्वाचे आहे.

आजकालच्या काळात जनरेटेड, गीबली कार्टून सोशल मीडियावर ट्रेंड होत आहेत. जिथे लोक त्यांच पर्सनल फोटो अपलोड करत आहेत आणि त्यांना एका अनोख्या ॲनिमेशन लुकमध्ये रूपांतरित करत आहेत. तसेच कार्टून ही एक अनोखी ॲनिमेशन शैली आहे.

तसेच सध्या या शैलीत बनलेले आहे. सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहेत. तसेच छायाचित्रीकरणाची ही जादू अजूनही सुरूच आहे आणि भविष्यातही ही आपल्याला नवीन गोष्टी दाखवीत राहिल.

**कु. अमृता भाऊसाहेब आरणे**
बी. ए. भाग ३

# १८ ताणतणाव व्यवस्थापन

## प्रास्ताविक

आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये मानवी जीवन शहरीकरण, आधुनिकीकरण, तांत्रिक विकास, वैज्ञानिक प्रगती, स्पर्धा या मुळे गुंतागुंतीचे तसेच धावपळीचे झाले आहे. याचा सगळ्यांत मोठा परिणाम मानवी जीवनावर झाल्यामुळे ते तणावपूर्ण बनले आहे. या जागतिकीकरणाच्या युगामध्ये जग जवळ आलेले आहे; पण माणसा माणसांमध्ये अंतर वाढलेले आहे. माणूस माणसापासून दूर गेलेला आहे. त्याची जागा या तंत्रज्ञान युगामध्ये लॅपटॉप, मोबाईल, कार, टी. व्ही, इ. अशा अनेक गोष्टींनी घेतली आहे. त्यातून निर्माण झालेल्या समस्यामुळे ताणतणावामध्ये भर पडलेली आहे. बेकारी, दारिद्र्य, महागाई, भ्रष्टाचार, बलात्कार, अशिक्षितपणा, व्यसनाधीनता, कौटुंबिक कलह, वैवाहिक समस्या, मूल्यांचाऱ्हास, संप, मोर्चे, इ. तणावजन्य प्रसंगांना तोंड देणे कठीण होत आहे. त्यामुळे ताणतणावाचे प्रमाण वाढत आहे. व्यक्तीमध्ये नैराश्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. ताणतणावामुळे मेंदू आणि शरीरावर अनेक प्रकारे परिणाम होतात हृदयविकार, मधुमेह, छातीत दुखणे, स्ट्रोक, रक्त गोठणे, लठ्ठपणा, झोप न लागणे, थकवा जाणवणे, भीती वाटणे असे अनेक परिणाम होत असतात; म्हणून म्हटले जाते की, चिंता जिवंतपणी व्यक्तीला जाळते, तर चिता मरणानंतर जाळली जाते.

ताण हे अनेक आजारांचे मूळ कारण आहे. त्यामुळे आपण शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच ताण म्हणजे काय? ताणाचे स्वरूप, ताणाचे प्रकार आणि ताण व्यवस्थापन कसे करता येईल, हे समजून घेणे आवश्यक आहे.

**ताणाचे स्वरूप**

व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात काही घटना, प्रसंग, अडथळे निर्माण होतात. अशावेळी व्यक्तीला परिस्थितीशी समायोजन करताना त्रास होतो, कष्ट सहन करावे लागतात तेव्हा ताण निर्माण होतो. तसेच ती संकल्पना, कधी नकारात्मक अर्थाने किंवा धोकादायक, महाभयंकर असे काहीतरी घडणार या अर्थाने वापरली जाते. तर कधी दीर्घकाळ टिकलेली असमतोल अवस्था असे तिचे वर्णन करण्यात येते. ताण ही संकल्पना मूळची व भौतिकशास्त्रातील आहे. ताण म्हणजे शारीरिक मन:स्थितीला खरा / सूचित संभाव्य धोका होय.

**ताणाचे प्रकार**

**१) तीव्र ताण (Acute Stress)**

हा ताण अचानक येणारा आणि कमी वेळेसाठी टिकतो. बहुतेक लोकांना हा ताण त्यांच्या दैनंदिन जीवनात अनुभवायला मिळतो. उा. : आपण एखादी गाडी खरेदी ऑटोशॉपमध्ये जातो; पण निश्चित तारखेला गाडी मिळत नाही. तेव्हा मात्र आपण निराश होतो. नंतर काही दिवसातच गाडी मिळते आणि आपले नैराश्य विसरून जातो.

**२) वारंवार तीव्र ताण (Episodic Acute Stress)**

जेव्हा एखादी व्यक्ती वारंवार तीवताणाचा अनुभव घेते तेव्हा त्याला वारंवार तीव्र ताण म्हणतात. अशा व्यक्ती नेहमी घाईत आणि तणावाखाली असतात. आरोग्य सेवा पुरविणारे किंवा कायद्याची अंमल-बजावणी करणारे लोक याचा अनुभव घेऊ शकत.

**३) दीर्घकालीन ताण (Chronic Stress)**

हा ताण आठवडे, महिने किंवा वर्षे दीर्घकाळ टिकतो. गरिबी, असमाधानी वैवाहिक जीवन किंवा कामाच्या लोकांना सततच्या समस्यांमुळे हा ताण येऊ शकतो. दीर्घकालीन ताणाचा आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

**ताणाचे परिणाम**

**१) शारीरिक**

पित्ताचा विकार, भूक न लागणे, वजन कमी होणे, हृदयरोग, दमा, रक्तदाब, मधुमहे, यकृत / मुत्रपिंडाचे विकार, रोग-प्रतिकार क्षमता कमी होणे, पचन संस्थेच्या समस्या, ताणतणावामुळे डोकेदुखी, स्नायु-ताण आणि थकवा यांसारख्या समस्या देखील होऊ शकतात.

**२) मानसिक**

अतिरिक्त राग येणे, लगेच दमणे, विकृत व्यक्तीमत्त्व, निरुत्साही, उदासीनता, निद्रानाश, विस्मरण यामुळे बुद्धीगुणांक (IQ Power) कमी होण्याची शक्यता असते. ताणतणावामुळे आपल्या शारीरिक व मानसिक अवस्थांवर मोठा परिणाम होतो. त्यामुळे शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे.

**ताण व्यवस्थापन**

**१) नियमित व्यायाम**

रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी व्यायाम करणे गरजेचे आहे. उत्साह, आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी योग, धावणे, पोहणे, सायकल चालविणे, इ. गोष्टी करणे गरजेचे आहे.

**२) झोप**

दररोज ७-८ तास झोप घेणे आवश्यक आहे. जेणेकरून मेंदू आणि शरीर यांना आराम मिळतो. झोप पूर्ण झाली नाही तर आपला संपूर्ण दिवस वाया जातो. कोणत्याही कामात मन लागत नाही. झोपण्याआगोदर आणि झोपेतून उठल्यानंतर अर्धा तास मोबाईलसारखे उपकरण वापरू नये. यामुळे डोळे व मेंदूला इजा होते. काही वेळा यामुळेही झोप पूर्ण होत नाही.

**३) आहार**

संतुलित आणि पौष्टिक आहार घेणे गरजेचे आहे. यामध्ये गाईचे दूध, फळे, भाज्या आणि प्रथिने, काजू, बदाम, आक्रोड, नारळपाणी, इ. यांचा समावेश होतो.

**४) ध्यान / धारणा**

नियमित ध्यान आणि श्वासोच्छ्वासाचे व्यायाम केल्याने मेंदू शांत होतो. तणाव कमी होतो, तसेच ध्यान केल्याने खूप मोठ्या प्रमाणात ताण कमी होण्यास मदत होते.

**५) सामाजिक संबंध**

मित्र आणि कुटुंबासोबत वेळ घालविणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे ताण कमी होतो आणि सकारात्मक भावना निर्माण होते. एकलकोंड्या व्यक्तींना ताणाला सामोरे जावे लागते. उलट त्यांचा सामाजिक आधार समृद्ध मोठा आहे. अशा व्यक्ती ताणतणावांना यशस्वीपणे सामोऱ्या जातात. आपल्या माणसाजवळ भावना व्यक्त केल्याने मन मोकळे होते. त्याच्याशी सल्लामसलत, चर्चा, वैचारिक देवाण-घेवाण केल्याने संकटांचा सामना करण्याचे धैर्य निर्माण होते. समाजात मिळून-मिसळून राहिल्याने मानसिक तसेच भावनिक आधार मिळतो. आपल्या पाठीशी कोणीतरी आहे असा विश्वास असणे तणावमुक्त व आनंदी जीवन जगण्यासाठी खूप मोठा आधार ठरतो. एकंदरीत जीवनात ताणतणाव, चिंता, यशापयश असणारच; त्यातून मार्ग काढून सुखी-समृद्ध जीवन जगायला शिकले पाहिजे.

**मदत घ्या**

मानसिक आरोग्य व्यावसायिक तुम्हाला ताणतणावाचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकविण्यास मदत करू शकतात. संज्ञानात्मक वर्तणूक थेरपी (CBT) ही एक पद्धत आहे. जी तुम्हाला जीवनातील ताणतणावांना कसा प्रतिसाद देते. हे बदलण्यास मदत करू शकते. उदा. : समुपदेशक.

**ताणतणाव व्यवस्थापन करण्याचा मंत्र**

१३८ चा मंत्र

१) एक तास व्यायाम
(योगा, व्यायाम, ध्यान)

३) तीन वेळा जेवण

८) आठ तास झोप

**प्रा. दीपक सोनवणे**
मानसशास्त्र विभाग

१९

# शेतकरी : जगाचा पोशिंदा

**आपला** भारत देश हा कृषिप्रधान आहे. शेती हा आपल्या देशाचा मुख्य व्यवसाय आहे. शेती हा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. प्रचंड लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा भागवण्यासाठी शेतकरी शेतात राबराब राबत असतो. ताजा भाजीपाला फळे, अन्नधान्य, कडधान्य पिकविणारा शेतकरी रणरणत्या उन्हात, कोसळणाऱ्या पावसात आणि हुडहुडी भरणाऱ्या थंडीत आपल्या बायकोमुलांसह राबत असतो. शेतकरी कष्ट करतो. म्हणून आपल्या भाकरी मिळते. म्हणूनच शेतकऱ्याला सर्वजण आदराने जगाचा पोशिंदा म्हणतात.

**शेतामधी माझी खोप, तिला बोराटीची झाप**
**तेथे राबतो कष्टतो, माझा शेतकरी बाप...**

या ओळी तुम्हाला खूप काही सांगून जातात. सगळ्या जगाला अन्न पुरविणारा शेतकरी अत्यंत हलाखीचे जीवन जगतो. दुष्काळ, पाऊस, खराब हवामान, रोगाचा फैलाव, वादळ व उत्पादनाची अनियमितता यांमुळे शेतकरी अनेक कारणांनी दुःखी असतो. कधी कधी तर त्याने पिकवलेल्या शेतमालास कवडीमोल भाव मिळतो. त्याला इच्छा असूनही आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण देता येत नाही. शेतकऱ्याला बागायतदार म्हणा नाहीतर जिरायतदार; त्याच्यासाठी दुःखाचं धरण भरलेलं. उन्हाळा असो की पावसाळा; शेतकऱ्याचे मरण ठरलेलंच. आज महाराष्ट्रात असंख्य शेतकऱ्यांना नावीक की कर्जबाजारी-पणा व कवडीमोल भावामुळे आत्महत्या करावी लागते. जगाच्या पोशिंद्याला आज गरज आहे. मालाच्या हमीभावाची व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे आपणही माणूस म्हणून शेतकऱ्यांच्या कष्टांचे मोल करायला हवे. त्यांच्या कष्टाचा आदर करून त्यांचे जीवन सुसह्य होईल यासाठी प्रयत्न करायची शेतीतून धान्याचे मोती पिकवणाऱ्याने पुरवलेच नाही तर आपले काय होईल, याची कल्पनाच अंगावर शहारे आणते.

भारतीय शेतकरी बहुतेक अशिक्षित आहे. कर्ज, शेतीविषयक साधने, अनुदान सिंचन आणि खूप सुविधा सरकार शेतकऱ्यांना उपलब्ध करीत आहे. आजकाल भारतीय शेतकऱ्यांची परिस्थिती मागील दिवसांपेक्षा अधिक चांगली आहे. ते संपूर्ण देशासाठी अन्नधान्य उपलब्ध करून देतात. आज भारत व महाराष्ट्र सरकारने शेतीला व शेतमालाला चांगले दिवस येण्यासाठी अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. भारत सरकारने शेती विषयक तीन नवी विधायके मंजूर करून शेतीला व शेतकऱ्यांना पद, प्रतिष्ठा देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. अशा या जगाच्या पोशिंद्याचा आपण आदर करूया.

शेतकऱ्याचे जीवन सुखी होण्यासाठी आपण सर्वांनीच शेतकरी बांधवाचे दुःख जाणून घेतले पाहिजे. आपल्या या शेतकरी बांधवांप्रमाणे शेतकरी सुखी तर जग सुखी. शेतकऱ्याप्रमाणेच आपणही ही धरती सुजलाम् सुफलाम् बनवण्यासाठी आपल्या परिसरात प्रत्येकाने एक तरी झाड लावले पाहिजे, म्हणजेच प्रदुषण रोखण्यास मदत होते.

**पेरणी पेरणी, अवघ्या जगाची कारणी ।**
**ढोराची चारणी, कोटी पोरांची भरणी ।।**

आपला हा शेतकरी बांधव रात्रंदिवस शेतात राबतो म्हणूनच तर '**मेरे देश की धरती सोना उगले, उगले हीरे मोती, मेरे देश की धरती**' यांसारख्या ओळी आपल्याला सहज येतात. '**शेतकरी बांधव सुखी तर देश सुखी**' '**जिथे राबती हात तेथे हरी**' अशी शेतीच्या महतीची वचने आपण नेहमी ऐकतो, बोलतो व कौतुकाने लिहितो; परंतु शाळेतील परिक्षांमधील गुणवंताच्या तोंडुन मी डॉक्टर, मी इंजिनिअर होणार अशा महत्त्वकाक्षा बाहेर पडतात; पण यांपैकी कोणीच म्हणत नाही '**मी एक आदर्श शेतकरी होणार आणि मी माझे जीवन शेतकामामध्ये झोकुन देणार**'.

शेतकरी हा भर उन्हात घाम गाळतो आणि कष्टाने आपल्या शेतात पीक वाढवण्याचे काम करतो. आपल्या मेहनतीने तो शेतात विविध प्रकारची धान्ये, फळे, भाजीपाला, इ. पिकवतो आणि बाजारपेठेत विकतो. स्वतः अधिक कष्ट घेऊन तो ही प्रक्रिया करीत असतो. म्हणून शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हणतात.

**जो पाण्याने अंघोळ करतो**
**तो फक्त पोशाख बदलू शकतो;**
**पण जो घामाने अंघोळ करतो**
**तो इतिहास बदलू शकतो...!**
**- शेतकरी**

**सानिका कदम**
बी. ए. भाग २

# २० कृत्रिम बुद्धिमत्तेचे संभाव्य धोके

'तंत्रज्ञान : शाप की वरदान' हा विषय आजही शाळा-कॉलेजच्या निबंधाच्या विषयात दिलेला असतो. कुठलीही गोष्ट शाप किंवा वरदान असण्यापेक्षा आपण ती शहाणपणाने वापरतो की नाही, हा जास्त महत्त्वाचा मुद्दा आहे. माध्यमविवेक म्हणजेच माध्यमांचा सुयोग्य वापर आपण स्वतःला आणि मुलांना शिकवू शकतो का? यावर कुठलेही तंत्रज्ञान आपल्यासाठी फायद्याचे की तोट्याचे हे अवलंबून आहे. हीच गोष्ट ए. आय. बाबतीतही सत्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक अतिशय शक्तिशाली तंत्रज्ञान आहे. आता बाल्यावस्थेत असलं तरी ते झपाट्याने प्रगत होणारं तंत्रज्ञान आहे. त्यामुळे अर्थातच त्याचा वापरही मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. शाळेतील मुलं आणि महाविद्यालयीन युवकांमध्ये ए. आय. टुल्सचा वापर वाढतो आहे. हे टुल्स पाहिजे ती माहिती सहज उपलब्ध करून देतात. एखादा विषय समजून घेण्यासाठी, एळाद्या विषयाची चांगली मांडणी करण्यासाठी मदत करू शकतात, हे जितकं खरं आहे, तितकंच या माध्यमांचा विवेकाने उपयोग न करता अतिरेक झाला तर माणसाची नैसर्गिक बौद्धिक क्षमता, विचार करण्याची क्षमता, लेखनकौशल्य, कल्पनाशक्ति या आणि अशा विविध कौशल्यांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

**अर्थ /व्याख्या**

ए. आय. म्हणजे संगणकासारख्या उपकरणांना अशी कामे आणि प्रक्रिया करण्यास सक्षम करणे, ज्यासाठी सामान्यतः मानवी पातळीवरील बुद्धिमत्ता आवश्यक असते; जसे की वाचन, समजून घेणे आणि भाषेला प्रतिसाद देणे, डेटाचे विश्लेषण करणे आणि समस्या सोडवणे, शिकणे आणि ते करीत असताना सुधारणा करणे.

**संभाव्य धोके**

**१. कार्यात्मक निरक्षरता :**

ए. आय.चा वापर करून तयार केलेल्या असाइनमेंट्सना मार्क मिळतील; पण त्यातून मुलं शिकतील का? शिकलेलं त्यांना समजलेलं असेल का? समजलेलं लक्षात राहील का? आणि जे शिकलं आहे ते प्रत्यक्ष जीवनात वापरता येईल का? हे प्रश्न अनुत्तरित राहतात. त्यातून एक मोठी गंभीर समस्या निर्माण होते. तिला 'कार्यात्मक निरक्षरता' असे म्हटले जाते. या कार्यात्मक निरक्षरतेचे प्रमाण भारतात अगोदरच ३३ टक्के आहे. यासाठी ए. आय. टुल्सचा वापर सजग व शहाणपणाने करणे गरजेचे आहे.

**२. विचार करण्याची क्षमता मंदावते**

ए. आय. टुल्सचा मदतनीस म्हणून वापर न करता थेट त्यावर उत्तरासाठी अवलंबून राहायला सुरुवात झाली, तर माणसाची विचार करण्याची मूलभूत क्षमता कमी होऊ शकते. बऱ्याच वेळा मुलांना एखादी गोष्ट करायला सांगितली की त्यांच्या मनात पहिला विचार येतो, तो ऑनलाइन जाऊन काहीतरी संदर्भ शोधण्याचा; पण अनेकदा मुलं केवळ संदर्भावर थांबत नाहीत, तर ते कॉपी-पेस्ट करण्याचा विचार त्यांच्या मनात येतो आणि तो सगळ्यांत मोठा धोका आहे. स्वतःची बुद्धी न वापरता गोष्ट करण्याची सवय लागणं हे विद्यार्थ्यांसाठी अतिशय धोकादायक म्हणलं पाहिजे.

**३. सर्जनशीलता कमी होते**

ए. आय. वापरून विद्यार्थ्यांना सहज माहिती उपलब्ध होते; मात्र त्यामुळे त्यांची सर्जनशीलता कमी होऊ शकते. स्वतःच्या बुद्धीचा वापर न करता थेट उत्तर मिळाल्यामुळे त्यांची स्वतःहून नवीन गोष्ट शोधण्याची आणि प्रयोग करण्याची मानसिकता कमकुवत होत जाते. स्क्रीन टाइम कमी करायला सांगितल्यावर आणि ऑनलाईन संदर्भ न शोधता एखादी गोष्ट करण्याचं आव्हान दिल्यावर खूप नव्या गोष्टी सुचू लागतात, असं मुलं अनेकदा नोंदवतात. याचाच अर्थ असाही होतो की, ए. आय.चा सजग वापर केला नाही, तर या तंत्रज्ञानामुळे मेंदूच्या विचार करण्याच्या आणि कल्पना करण्याच्या खिडक्या हळूहळू बंद होऊ शकतात.

**४. स्वतंत्र विचारशक्ती, आत्मविश्वासात घट**

विद्यार्थी सतत ए. आय.वर अवलंबून राहतात, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी

होण्याची शक्यता असते. कायम कुणावर तरी अवलंबून राहण्याची सवय लागल्यावर आणि संदर्भाशिवाय कृतीची सवय मोडली की, आपण आपल्या स्वतःच्या क्षमतेच्या जोरावर एखादी गोष्ट करू शकतो, यावरचा विश्वास कमी होत जातो. एकदा का आत्मविश्वास कमी झाला की, ए. आय.वर अवलंबून राहणं अधिक सोयीस्कर वाटतं. हे अवलंबित्व वाढतही जातं; पण हे सगळं स्वतंत्रपणे विचार करण्याच्या क्षमतेसाठी घातक आहे.

**५. नैराश्य आणि अस्वस्थता**

ए. आय.च्या चुकीच्या व अतिवापरामुळे स्वतः विचार करण्याची सवय मोडू शकते, त्यातून आत्मविश्वास कमी होऊ शकतो. आत्मविश्वास कमी झाला की निराशा व अस्वस्थता यांसारख्या समस्यांची सुरुवात होऊ शकते. अभ्यास आणि परीक्षेच्या तणावापासून सुटका मिळवण्यासाठी काही विद्यार्थी ए. आय.चा वापर करतात; पण त्याची सवय जडल्यास नैराश्य आणि तणाव वाढू शकतो. स्वतः अभ्यास करून यश मिळविण्याच्या आनंदाऐवजी, पटकन उत्तर मिळविण्याच्या प्रवृत्तीमुळे पराभव सहन करण्याची क्षमताही कमी होऊ शकते. तणावाला सामोरे जाण्यासाठी लागणारे मानसिक बळ कमवण्याबाबत विद्यार्थी हलगर्जी होऊ शकतात. परिणामी अस्वस्थतेत वाढ होऊ शकते त्यामुळे जगताना कसलीच प्रेरणा नसणं, आतून कसलाही उल्हास न वाटणं ही दिवसेंदिवस सामान्य समस्या होत आहे. ए. आय.च्या चुकीच्या व अतिवापरामुळे ती वाढू शकते.

**६. संवादकौशल्य व सहकार्याची भावना कमी होणे**

विद्यार्थ्यांनी ए. आय.च्या मदतीने निबंध, प्रोजेक्ट किंवा गृहपाठ पूर्ण करणं ही आज सामान्य बाब झाली आहे. मात्र यामुळे संवादकौशल्य, गटकार्य, सहकार्याची क्षमता कमी होऊ शकते. सगळ्याच गोष्टी ए. आय.कडून करवून घेतल्यावर एक तर स्वतः काही करण्याची गरज वाटेनाशी होऊ शकते आणि दुसरं म्हणजे कुणाची मदत घेण्याची वृत्तीही कमी होऊ शकते. आपल्याला कुणाच्या मदतीची गरज नाही, हे एकदा स्वतःला पटले की, आपणही मग कोणाला मदत करण्याची गरज नाही, ही भावना रुजू शकते. हे धोकादायक आहे, कारण माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे एकमेकांच्या मदतीने आपण जितकं चांगलं आयुष्य जगू शकतो, तितकं एकट्यानं जगू शकत नाही, हेही समजून घेतलं पाहिजे.

**७. नैतिक मूल्यांचा ऱ्हास होण्याचा धोका**

ए. आय.चा अतिरेकी वापर प्रामाणिक-पणावरही परिणाम करू शकतो. कॉपी पेस्ट कल्चर हा खूप मोठा धोका आहे. हे समजून घेतलं पाहिजे. स्वतः मेहनत न घेता उत्तर मिळत असल्यामुळे प्रत्यक्षात किती कष्ट घ्यावे लागतात, याची जाणीव कमी होऊ शकते. परिणामी स्वावलंबन, चिकाटी, गुणवत्ता आणि नैतिकता यांसारखी मूल्य दुर्लक्षित होण्याचा धोका आहे. ए. आय. हे एक प्रभावशाली आणि अतिशय उपयुक्त असे तंत्रज्ञान आहे; पण त्याचा होणारा परिणाम वापर करणाऱ्याच्या हेतूवर ठरतो. त्यामुळे ए. आय. टूल्स आपले मदतनीस आहेत. त्यांना त्याच पद्धतीने वापरले पाहिजे, हे मुलांना शिकविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्यास भाग पाडणे, त्यांचा आत्मविश्वास टिकून राहण्यासाठी प्रयत्न करणे, जे काम करत आहेत त्यांतील गुणवत्तेबाबत ते आग्रही राहतील हे बघणं आणि कॉपी-पेस्ट कल्चरऐवजी मेहनतीला व नीतिमूल्यांना महत्त्व देणारा समाज निर्माण करणं, ही आपली सगळ्यांची नैतिक जबाबदारी आहे.

एकंदरीत कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आपले जगणे अधिक सुखकर होणार असले तरी तिच्या अतिरेक वापरामुळे निर्माण होणारे संभाव्य धोके दुर्लक्षित करून चालणार नाहीत.

**डॉ. अंकुश तु. करपे**
सहयोगी प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग

२१

# मुली वाचवा...!

**आई पाहिजे, बायको पाहिजे,**

**बहीण पाहिजे, मैत्रीण पाहिजे,**

**तर मुलगी का नको?**

संपूर्ण विश्वामध्ये नारीचे स्थान श्रेष्ठ आहे. आई, पत्नी, बहीण, मुलगी यांच्या रूपांत नारीची पुजा केली जाते. नारीशिवाय हे जग अपूर्ण आहे. नारी ही घराची शोभा असते. आपल्या घरात मुलीचा जन्म झाला म्हणून दुःखी होऊ नये. उलट ही मुलगी माझ्या घराची शोभा बनावी, असा विचार बाळगावा. मुलगी लहानांची मोठी होऊन आपले घर आपल्या बुद्धीचातुर्याने चालवील या गोष्टीचा आनंद व्हायला पाहिजे. मुलांना सर्व प्रकारचे शिक्षण देणे त्यांना पराक्रमी व बहादूर बनवणे, नारीचेच आद्य कार्य आहे.

इतिहास या गोष्टीचा साक्षी आहे कि माणसाच्या तीन मूलभूत गरजांपैकी दोन विशेष आहेत. ज्या जीवन जगण्यासाठी साहाय्य करतात. एक म्हणजे आहार आणि दुसरे प्रापंचिक जीवनाचा समतोल ठेवण्यासाठी नारीची सोबत. या दोन्हींपैकी कोणत्याही एकाची उणीव ही आम्हाला जीवनातील सुखापासून वंचित करू शकते. बऱ्याच वेळा पाहतो, की ज्या पुरुषाचा विवाह झालेला नाही, त्याची दुर्दशा त्या छपरावरील पाण्याप्रमाणे झालेली असते. जे हळूहळू झिरपून गळत असतं. अशा व्यक्तींना संसारातील कोणत्याही गोष्टीची खुशी मानता येत नाही. भविष्याची कोणतीही स्वप्ने नाहीत ना कोणताही विचार. जर आई, पत्नी, मुलगी, बहिणीच्या रूपात त्यांच्या जीवनात एखादी सती असती, तर त्यांना दुर्दैवी जीवनाचे असे दृश्य कधी पाहायला मिळाले नसते.

**दिवा लावते दारी,**

**प्रकाश देते दोन्ही घरी**

आता सध्याच्या काळात स्त्रीभृणहत्येचे प्रमाण खूप वाढलेले आहे. हे कोठेतरी थांबवले पाहिजे. मुलींना जन्म घेण्याआधी नष्ट केले जाते. मुलींना कमी लेखलं जातं. 'मुली म्हणजे परक्यांचे धन' असे म्हटले जाते. मुला-मुलींमध्ये इतका भेदभाव का? **'मुलं म्हणजे देवाघरची फुल'** असं मानलं जातं; पण मुलींना मात्र तुच्छ समजलं जातं. आजकाल तर सर्व क्षेत्रांत मुलीच पुढे आहेत. त्या उंच भरारी घेत आहेत. आई-वडिलांचा सांभाळ करतात. मुलगी ही लग्न झाल्यानंतर सासर व माहेर या दोन परिवारांना एकत्र व विश्वासात ठेवण्याचं काम करते. मुलींनी आपल्या कष्टातून व कामगिरीतून आपली कर्तबगारी दाखवून दिली आहे. आयपीएस किरण बेदी, शिक्षण क्षेत्रात उद्योजिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले, अशा कितीतरी स्त्रियांनी उंच भरारी घेतली आहे. तरीही मुली नकोत असे का? जन्माला येणारी मुलगी म्हणते...

तूच माझ्यासारख्या निर्बल, निरपराध, अज्ञानी, असाह्य, निर्दोष, मूक गर्भाची हत्या का करते? तूच सांग मी माझा जीव वाचवण्यासाठी कोणाकडे याचना करू मी तुझी दुसरी मुलगी यात माझी काय चूक? आई तु तुझ्या संमतीनंच मी या जगात आले. मग आता मला मारण्याचा विचार का करतेस? तुला नको असेल तर पुढे मी स्वतः माझे यश, कीर्ती संपादन करीन किंवा मला तू अनाथालयात सोडलेस तरी चालेल. मी आपल्या कुळाला लाजवेल असे कृत्य करणार नाही; पण मला मारू नकोस. मी मुलगी यात माझी काय चूक? आई, स्त्रीभृणहत्या किंवा गर्भपात हे सर्व धर्मांत महापाप आहे, असे मानतात हे तुला माहीत आहे ना? मग तू हे पाप कशासाठी करतेस? मी मुलगी आहे म्हणून का? मी मुलगी आहे, यात माझी काय चूक? तुपण कोणाची तरी, मुलगी आहेस. तुला तुझ्या आईने हे जग दाखवून तुझ्यावर अनंत उपकार केले. तू मुलगी म्हणून तुला मारून टाकले नाही. तुझ्या आईला आठवून तरी बघ आणि माझ्यावर उपकार कर.

**मी अजून कोवळी कळी**

**मला फुलू द्या, उमलू द्या,**

**हे जग पाहू द्या,**

**या जगात मुक्तपणे श्वास घेण्याची**

**संधी द्या...**


म्हणून मुलीचा जन्म होण्याअगोदर किंवा जन्म झाल्यास निराश होऊ नये.

आमच्या भारतीय संस्कृतीत नारीचे स्थान उच्च आहे. नारी ही पुरुषाची जन्मदाती आहे. नारीच्याच उदरी संतमहात्मे, गुरू, पीर-पैगंबर, राजे-महाराजांचा जन्म झाला आहे. म्हणून नारीचा कधीही अपमान करू नये व तिने जन्म घेण्याअगोदर तिचा नाश करू नये. केला तर तो सर्वच विश्वाचा विनाश करून टाकण्यासारखे आहे. स्त्री म्हणजे एक आदिशक्तीचं रूप आहे. पुरुषाच्या जीवनात स्ती कधीही कंटाळा अनुभवायला देत नाही. मोठमोठे प्रसंगही स्त्रीच्या साहसामुळे पुरुष सहन करतो. एक स्त्रीच घराचा आत्मा असते, जी (आत्मा) घरातील सुख-दु:ख आणि सर्व कार्याच्या अंतःकरणापर्यंत उपस्थित असते. एखाद्या घरातील दुर्दशेचा अंदाज स्त्रीच्या मनोदशेवरून लावला जाऊ शकतो.

गुरूची कृपा आणि मनात नम्रतेची भावना, या दोन्हीही गोष्टी आवश्यक आहेत. गुरूची कृपा तेव्हाच होते, जेव्हा आपल्या मनाला आपण श्रेष्ठ बनवू. म्हणून...

**बेटी है तो सबकुछ है**
**नहीं तो और कुछ भी नहीं है**

**शिवांजली कुदळे**
११ वी, तुकडी - अ



# २२ स्त्री–पुरुष समानता
## कागदावरची, जीवनातील

**स्त्रीजन्म** ही तुझी कहाणी, ह्रदयी अमृत, नयनी पाणी'. अशी स्त्रीजीवनाची स्थिती समाजात स्पष्टपणे दिसते आहे. स्त्री-पुरुष समानताचा प्रत्यक्षात सगळीकडे फक्त प्रचार, प्रसार आणि नियम लागू केलेले आहेत. पण प्रत्यक्षात गोष्टी अमलात आणल्या तरच समाजात स्त्री-पुरुष प्रस्थापित होईल.

ताराबाई शिंदे यांनी स्त्रीजीवनाचे चित्रण अगदी स्पष्टपणे मांडले आहे. तसेच त्यांनी सध्याच्या परिस्थीतीत जीवन कशा प्रकारचे आहे, याची स्पष्ट उदाहरणे दिली आहेत. स्त्रीयांना कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य दिले जात नाही. एवढेच नव्हे तर त्यांना स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याचीसुद्धा मोकळीक दिली जात नाही.

त्यांच्यावर आन्याय, अत्याचारही केले जातात. तसेच स्त्रीचे जीवन एका घराच्या उंबरठ्याच्या आत आणि चार भिंतींच्या मध्ये बंदिस्त असल्याचे आजही दिसते. ताराबाई स्पष्ट सांगतात की, पुरुषांना प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक निर्णय घेण्यामध्ये त्यांना स्वातंत्र्य आहे; पण स्त्रीयांना का नाही? पुरुषाची बायको वारली तर तो लगेच दुसऱ्यां लग्नाची तयारी करतो आणि आपल्या मनाप्रमाणे पाहिजे ती गोष्ट मिळवितो; पण स्त्रियांचे तसे नाही, नवरा वारला तर त्या स्त्रीला आगदी दुखद जीवनाचा सामना करावा लागतो. नेहमी टोचके, कुचके बोलणे सहन करावे लागते. स्त्रियांना स्वातंत्र्य द्या असं म्हटले जाते; पण प्रत्यक्षात त्यांना ते मिळत नाही.

भाषण करणारा वक्तादेखील. बोलताना स्त्रियांच्या बाजूने बोलतो; पण तो घरी प्रत्यक्षात तसाच म्हणजे इतर पुरुषांप्रमाणे वागत असतो. तसेच महिलांना पुरुषांच्या बरोबरीने पहिले स्वातंत्र्य महात्मा फुलेंनी दिल्याचे दिसते. तसेच भेदभाव न करता त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाईंना सुशिक्षित करून कित्येक स्त्रियांना सुशिक्षित केले. यांच्या कार्याचे वाचन तसेच केलेले त्यांची आवड असणाऱ्या व्यक्तीसुद्धा प्रत्यक्षात तशा वागलेल्या दिसत नाहीत. पण स्त्रिया सुद्धा पुरुषापेक्षा सगळ्याच गोष्टी सांभाळू शकतात. एवढेच नव्हे तर त्या पुरुषाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात दिसतात. त्यांचे शौर्य, चातुर्य, लोकप्रियता या सगळ्याच बाबतींत त्या पुरुषापेक्षा कुठेही कमी नाहीत. तरीपण त्यांना प्रत्यक्षात पुरुषा-बरोबर समानता दिली जात नाही. एवढेच नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीसुद्धा समाजासाठी मोलाचे कार्य सगळ्याच बाबतीत धर्मासाठी, स्त्रीयांसाठी, पुरुषांसाठी करून स्वातंत्र्य आणि त्यांच्या वर होणाऱ्या दुजेपणाचे त्यांनी निवारण केले. स्त्रीया पुरुषांप्रमाणे सगळ्याच गोष्टी करू शकतात. हे सिद्ध आहे; पण ते मानले जात नाही. स्त्रीया पुरूषांच्या बरोबरीने आहेत हे मात्र नक्कीच.

**बेटा वंश है, तो बेटी अंश है**
**बेटा आन है, तो बेटी शान है**
**बेटा मान है, तो बेटी सम्मान है**
**बेटा संस्कार है, तो बेटी संस्कृती है**
**बेटा दवा है, तो बेटी दुवा है**
**बेटा भाग्य है, तो बेटी विधाता है**
**बेटा शब्द है, तो बेटी अर्थ है**
**बेटा गीत है, तो बेटी संगीत है**
**बेटा प्रेम है, तो बेटी पूजा है.**

खरंच स्त्रीया या पुरुषाच्या समानतेने आहेत. कुठल्याही बाबतीत त्या पुरुषापेक्षा कमी नाहीत. हे स्पष्ट होते. तरीसुद्धा तिला प्राधान्य न देता दुय्यम स्थान दिले जाते. एवढ्या स्त्रिया सक्षम असुनही त्यांना प्राधान्य तर नाहीच दिले जाते; पण या स्त्रियांच्या कर्तृत्वाच्या गोष्टी फक्त वाचणे, लिहिणे, बोलणे इथपतच मर्यादित आहेत. प्रत्यक्षात ते होत नाही. अनेक कृत्यांच्या माध्यमातून त्यांच्यावर होणारी अन्यायाची, फसवे-गीरिची कित्येक उदाहरणे आहेत. त्यांना कसलेही स्वातंत्र्य दिले जातच नाही; पण त्यांच्यावर होणारा अन्याय वाढतच चाललेला दिसतो. काहीतरी प्रयत्न केला तरी या स्त्रियांवरच्या अत्याचाराचा अंधकार संपलेला दिसत नाही.

याला कारण एवढेच की ज्या गोष्टी एक समाजकर्ता सांगतो स्त्रीयांच्या स्वातंत्र्या-बद्दल समानते बदल जे नियम लागू करतात ते फक्त जीवनाती अनुभव कागदावर त्यांच्या कर्तुत्वाचे लेखन करतात. पण या गोष्टी प्रत्यक्षात अमलात आणल्या जातातच असे नाही. स्त्रियांची ही पुरुषाबरोबरची समानता ही फक्त कागदावर लिहीण्याइथपतच मर्यादित असल्याची दिसून येत. एवढेच नव्हे तर सुनीता विल्यमस, इंदिरा गांधी, प्रतीभाताई पाटील यांच्या कर्तृत्ववान महिलांची फक्त कागदावरची स्वातंत्रता आहे पण महीलांना मात्र तसे स्वातंत्र प्रत्यक्षात दिले जात नाही.

**रोहीत जगताप**
बी. ए. भाग ३

# २३ सावित्रीबाई फुले यांचे लेखन साहित्य आणि मोलाचे योगदान

## सारांश

**'वाचाल तर वाचाल'** या म्हणीचा अर्थ आपल्यासमोर स्पष्ट व योग्य तऱ्हेने आपल्या कार्याने सावित्रीबाई फुले यांनी दाखवून दिला आहे व समाजाला एक उत्कृष्ट व नवीन दिशा दाखवून दिली. आपण आज ज्या दिशेने योग्य तऱ्हेने वाटचाल करून आपले ध्येय प्राप्त करत आहोत, त्याचे मोलाचे योगदान योग्य तऱ्हेने पुस्तकरुपात आपल्यासमोर पुस्तकेरुपी ज्ञान उपलब्ध आहे. सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते आणि त्यांचे विचार आपण वाचन करून आत्मसात करायला पाहिजेत. वाचन ही अशी कला आहे की व्यक्ती वाचन करून नवनवीन ज्ञान प्राप्त करू शकतो आपले जीवनमान उंचावण्यात पुस्तकाचे मोठे योगदान आहे, याचे पूर्ण श्रेय सावित्रीबाई फुले यांना जाते. त्यांच्या त्यागरूपी झाडाला लागलेली आपण सर्व यशस्वी फळे आहोत. स्त्री शक्ती उदयास आली सावित्रीबाई फुले यांच्यामुळे त्यांच्या शिक्षित होण्यासाठी ज्योतिबा फुले यांची आठवण केल्याशिवाय फुले यांना त्यांच्या कार्याबद्दल आदरांजली पूर्ण होणार नाही.

सावित्रीबाई फुले यांनी एका तरुण विद्यार्थ्याला स्वत:साठी भेटवस्तूंऐवजी एका पुरस्कार समारंभात शाळेसाठी लायब्ररीची मागणी करण्यास प्रेरित केले होते. तिने तरुण मुलींना चित्रकला, लेखन आणि इतर उपक्रम करायला प्रेरित केले. मुक्ता साळवे या तरुण मुलीने लिहिलेला निबंध त्यावेळी दलित साहित्याचा आणि दलित स्त्रीवादाचा चेहरा बनला होता. पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्यांच्या मुलांना नियमितपणे शाळेत येण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी पालक-शिक्षक बैठक नियमित अंतराने घेण्यात आली.

**''आता निष्क्रिय बसू नका, जा, शिक्षण घ्या**
**अत्याचारित आणि त्यागलेल्यांचे दुःख संपवा,**
**तुम्हाला शिकण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे;**
**तेव्हा शिका आणि जातीच्या साखळ्या तोडा.''**

- सावित्रीबाई फुले

**प्रस्तावना**

सावित्रीबाई फुले ०३ जानेवारी, १८३१ रोजी जन्मलेल्या एक समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि लेखिका होत्या. ज्यांना भारतातील महिला आणि दलितांच्या शिक्षणासाठी त्यांच्या अग्रगण्य योगदानाबद्दल भारतातील **'पहिल्या स्त्रीवादी लेखिका'** म्हणून गौरविले जाते. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सहवासात, सावित्रीबाई फुले यांनी लग्नानंतर स्वतःला शिक्षण दिले, पुण्यातील महारवाड्यात उपेक्षित समाजातील मुलींना शिक्षण देण्याचे काम हाती घेतले आणि पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात भारतातील पहिली सर्व महिलांची शाळा सुरू केली.

अत्याचारांना तोंड देत त्यांनी विविध जातीं-मधील अनेक मुलांना शिक्षण दिले, जातीय दडपशाहीचा प्रतिकार केला आणि ज्योतिराव फुले आणि इतर क्रांतिकारकांसह १८ शाळा स्थापन केल्या. एका समाजसुधारकाव्यतिरिक्त, त्या एक ज्वलंत लेखिका-देखील होत्या, ज्यांच्या लेखनाने भारतातील जाति-विरोधी आणि स्त्रीवादी साहित्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**सावित्रीबाई फुले यांचे लेखन आणि ग्रंथसंपदा**

सावित्रीबाई फुले यांच्या कविता आणि इतर लेखन आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे आणि भारतातील जातिव्यवस्थेविरुद्धच्या संघर्षात ते अग्रेसर आहे. त्यांनी काही अतिशय मौल्यवान लेखन एकत्र केले आहे.

- काव्यफुले - कवितासंग्रह - १८५४
- ज्योतिरावांची भाषणे, सावित्रीबाई फुले यांनी संपादित २५ डिसेंबर - १८५६
- सावित्रीबाईंची ज्योतिरावांना पत्रे
- मातोश्री सावित्रीबाईंची भाषणे - १८९२
- बावनकशी सुबोध रत्नाकर - १८९२

डॉ. एम. जी. माळी यांनी संपादित केलेल्या 'सावित्रीबाई फुले' या १९४ पानांच्या खंडात या कलाकृती एकत्रित केल्या आहेत. खंडाला प्रसिद्ध विचारवंत आणि तत्त्वज्ञ डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांची प्रस्तावना आहे. १८५४ मध्ये प्रकाशित झालेला **'काव्यफुले'** हा सावित्रीबाईंच्या कवितांचा पहिला काव्यसंग्रह होता. यात निसर्ग, सामाजिक समस्या, बोधपर कविता आणि ऐतिहासिक कविता अशा एकूण ४१ कविता आहेत. **'ज्योतिरावांची भाषणे'** हा सावित्रीबाईंनी संपादित केलेला खंड असून त्याचे प्रतिलेखन चार्ल्स जोशी यांनी केले आहे. हे पुस्तक १८५६ मध्ये प्रकाशित झाले असून त्यात ज्योतिरावांची चार भाषणे आहेत.

'सावित्रीबाईंची ज्योतिरावांना पत्रे'मध्ये ओतूर आणि नायगाव येथून एकूण तीन पत्रे आहेत. 'मातोश्री सावित्रीबाईंची

भाषणे'मध्ये सावित्रीबाईंची विविध विषयांवरची भाषणे आहेत; जसे की उद्योग, शिक्षण, चांगले आचरण, व्यसन आणि कर्जे. ती शास्त्री नारो बाबाजी महाधट पानसरे पाटील यांनी संपादित केले आहेत आणि १८९२ मध्ये वत्सल प्रेस, बडोदा यांनी प्रकाशित केली होती. 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा भारताच्या इतिहासाचे वर्णन करणारा काव्यसंग्रह आहे, ज्यामध्ये ज्योतिरावांच्या गद्यातील कार्याचा समावेश आहे. यात ५२ रचना आहेत. १८९१ मध्ये ज्योति-रावांच्या मृत्यूनंतर ही कविता रचली गेली आणि १८९२ मध्ये पुस्तक म्हणून प्रकाशित झाली.

**''जर तुम्हाला ज्ञान नसेल, शिक्षण नसेल,**
**आणि तुम्हाला त्याची इच्छा नाही,**
**तुमच्याकडे बुद्धी आहे; पण त्यावर काम करू नका.**
**मग तुम्हाला माणूस कसा म्हणता येईल?''**

- सावित्रीबाई फुले

**सावित्रीबाई फुले यांची ग्रंथसंपदा**

- सावित्रीबाई फुले - समग्र वांगमय,१९८८
- डॉ. एम. जी. माळी यांचे हे पुस्तक सावित्रीबाई फुले यांच्या काव्यफुले, बावनकाशी सुबोध रत्नाकर, २० वर्षांच्या कालावधीतील ज्योतिराव फुले यांना लिहिलेली पत्रे आणि सावित्रीबाई फुले यांची जात, सामाजिक न्याय, या विषयावरील व्याख्याने यांचा समावेश आहे. रोजगार आणि समाजातील स्त्रीची स्थिती.
- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले
- पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या महात्मा फुले अध्यासनाचे माजी प्रमुख प्रा. हरी नरके यांचा हा निबंध, फुले दाम्पत्याचा भारतातील पहिली महिला शाळा स्थापन करण्यातील प्रवास आणि भारतीय उपखंडातील सामाजिक सुधारणा चळवळीत अग्रणी असलेल्या त्यांच्या योगदानाचा मागोवा घेतो. समाजसुधारक महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याची चर्चा करताना सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष का करता येत नाही, यावरही यात भर देण्यात आला आहे.
- **विसरलेले मुक्तिदाताः** सावित्रीबाई फुले यांचे जीवन आणि काळ
- ब्रज रंजन मणी आणि पामेला सरदार यांनी संपादित केलेला हा निबंधसंग्रह सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील पहिल्या इंग्रजी पुस्तकांपैकी एक होता. त्यात सहा लेखकांच्या निबंधांचा समावेश आहे. ज्यांनी फुले आणि १८व्या आणि १९व्या शतकांतील भारतीय उपखंडातील सामाजिक परिस्थितीत उपेक्षित महिलांच्या जीवनाबद्दल लिहिले आहे. यात सावित्रीबाई फुले यांनी ज्योतिराव फुले यांना लिहिलेली तीन पत्रे आणि फुले यांच्या कवितांच्या अनुवादित आवृत्त्यांचाही समावेश आहे. शिवाय, पुस्तकात एका अध्यायात फुले दाम्पत्याने स्थापन केलेल्या शाळेत शिकत असलेल्या मुक्ताबाई या ११ वर्षांच्या मुलीचे पत्रदेखील समाविष्ट आहे.
- सावित्रीबाई फुले आणि आय
- संगीता मुळ्ये लिखित 'सावित्रीबाई फुले आणि मी' हे भारतीय खेडेगावातील शबरी या तरुण लाजाळू दलित मुलीच्या बालपणात जातीय भेदभाव आणि पूर्वग्रहांना बळी पडलेल्या प्रवासाचा मागोवा घेणारे अर्ध-काल्पनिक पुस्तक आहे. सावित्रीबाई फुले यांच्या लेखनाने प्रेरित होऊन शबरी पुढे स्त्रीवादी आणि कार्यकर्त्या बनल्या. हे पुस्तक तरुण प्रौढांसाठी आहे, ज्यांना भारतीय शाळां-मध्ये बहुजन नेते आणि आयकॉन्सबद्दल क्वचितच शिकवले जाते.
- द रिबेल फ्लेम, सुयोग बनाईत, २०१५
- सावित्रीबाई फुले यांच्या जीवन आणि संघर्षावरील इंग्रजीतील पहिली कादंबरी.
- अग्निफुले - सावित्रीबाई फुले यांची कविता : स्वरूप आणि समीक्षा, डॉ. के. पी. देशपांडे १९८२
- बोधिसत्त्व राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या पुस्तकांचे समीक्षक. त्यात 'काव्यफुले', 'बावनकशी सुबोध रत्नाकर', अर्थव्यवस्था, शिक्षण, संस्कृती, राजकारण या विषयांवर व्याख्यानांचा समावेश आहे.

**सावित्रीबाई फुले यांच्यावर लिहिलेली अन्य ग्रंथ**

- 'हाँ मैं सावित्रीबाई फुले' (हिंदी), (प्रकाशक : अझीम प्रेमजी विद्यापीठ)
- सावित्रीबाई फुले (लेखक : अभय सदावर्ते)
- ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले (लेखिका : उषा पोळ-खंदारे)
- सावित्रीबाई फुले (इंग्रजी,एन.के. घोरपडे)
- कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले (लेखिका : डॉ. किरण नागतोडे)
- सावित्रीबाईचा संघर्ष (के.डी. खुर्द)
- थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले (केतन भानारकर)
- पुण्यश्लोक सावित्रीबाई फुले (गौरी पाटील)
- सावित्रीबाई फुले (लेखक : जी. ए. उगले)
- सावित्रीबाई फुले (लेखक : डी. बी. पाटील )
- जोतिकांता सावित्री (दा. स. गजघाटे)
- सावित्रीबाई फुले (प्रा. झुंबरलाल कांबळे)
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (लेखक : ना. ग. पवार)
- सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व (लेखक : ना. ग. पवार)
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (लेखक : नागेश सुरवसे)
- स्त्री महात्मा सावित्रीबाई फुले (नाना ढाकूलकर)

- मी जोतीबांची सावित्री (नारायण अतिवाडकर)
- सावित्रीबाई फुले (लेखिका : निशा डंके)
- सावित्रीबाई फुले (लेखिका : प्रतिमा इंगोले)
- सावित्रीबाई फुले (प्रमिला मोडक)
- थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले (प्रेमा गोरे)
- साध्वी सावित्रीबाई फुले (लेखिका : फुलवंता झोडगे), चिनार प्रकाशन
- सावित्रीबाई फुले चरित्र (बा. गं. पवार)
- तेजाचा वारसा सावित्रीबाई फुले (लेखिका : प्रा. मंगला गोखले)
- क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले (डॉ. मा.गो. माळी) मॅजेस्टिक प्रकाशन
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (डॉ. मा. गो. माळी), स्नेहवर्धन प्रकाशन
- सावित्रीबाई फुले श्रद्धा (लेखक : मोहम्मद शाकीर)
- सावित्रीबाई फुले (लीला शाह)
- ज्ञान ज्योती माई सावित्री फुले (लेखिका : विजया इंगोले)
- त्या होत्या म्हणून (लेखिका : डॉ. विजया वाड)
- सावित्रीबाई फुले (इंग्रजी, विठ्ठलराय भट)
- युगस्त्री : सावित्रीबाई फुले (विठ्ठल लांजेवार)
- सावित्रीबाई जोतिबा फुले : जीवनकार्य (शांता रानडे)
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (लेखिका : शैलजा मोलक)
- साध्वी सावित्रीबाई फुले (सविता कुलकर्णी) भारतीय विचार साधना प्रकाशन
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (सौ. सुधा पेठे)
- ‘व्हय मी सावित्रीबाई फुले’ (नाटक) (एकपात्री प्रयोगकर्ती आद्य अभिनेत्री : सुषमा देशपांडे) (अन्य सादरकर्त्या डॉ. वैशाली झगडे)
- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले (विद्याविकास) (लेखक : ज्ञानेश्वर धानोरकर)
- शायरा. सावित्रीबाई फुले (उर्दूमध्ये) (लेखिका : डॉ. नसरीन रमजान सय्यद)
- सावित्रीबाई जर्नी ऑफ अ ट्रेलब्लेझर (प्रकाशक : अझीम प्रेमजी विद्यापीठ)

**निष्कर्ष**

सावित्रीबाई फुले यांचे दोन काव्यसंग्रह आहेत काव्यफुले (कवितेची फुले) आणि बावनकाशी सुबोध रत्नाकर (शुद्ध रत्नांचा महासागर). मराठीत लिहिलेला पहिला काव्यसंग्रह, काव्यफुले १८५४ मध्ये प्रकाशित झाला, जेव्हा सावित्रिबाई २३ वर्षांच्या होत्या, तर बावनकाशी सुबोध रत्नाकर (शुद्ध रत्नांचा महासागर) १८९२ मध्ये प्रकाशित झाला. काव्यफुले यांच्या ४१ कविता आहेत. त्यांच्या कवितांमध्ये त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी चळवळीचे नेतृत्व केले आणि इतरांना जाती आणि लिंग आधारित भेदभावाविरुद्ध कार्य करण्यास प्रेरित करताना तिला सामोरे जावे लागलेल्या संघर्षांचा समावेश आहे. या कविता जातीवर स्थापन झालेल्या जुलमी व्यवस्थेमुळे उपेक्षित असलेल्यांना ज्ञान मिळवण्यासाठी, औपचारिक शिक्षण घेण्यासाठी आणि ब्राह्मण शक्तीला उखडून टाकण्याकरीता काम करण्यासाठी, अशा प्रकारे सामाजिक न्यायाचा मार्ग स्थापित करण्यासाठी केलेले आवाहन आहे.

सावित्रीबाईंनी ज्योतिरावांना आयुष्यभर दिलेली साथ, सहकार्य आणि साहचर्य विलक्षण आहे. स्त्री-पुरुष समानता आणि त्यांनी प्रस्थापित केलेला शांततापूर्ण सहवास हा काळ आणि अवकाशाच्या मर्यादा ओलांडणारा आहे. शिक्षण, सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन, पुरोहितशाही निर्मूलन या क्षेत्रांत त्यांनी केलेले पथदर्शी कार्य केवळ भूतकाळच नव्हे तर वर्तमानालाही उजळून टाकते. सध्याच्या काळातही समांतर नसलेले हे योगदान आहे. सावित्रीबाईंचा हा वारसा आपले जीवन सदैव समृद्ध करीत राहील.

**डॉ. सपनाराणी श्रावण रामटेके**
ग्रंथपाल

२४

# स्त्रीभ्रूण हत्या

**आजच्या** काळात स्त्रीभ्रूण हत्या ही खूपच गंभीर समस्या झाली आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो, असे आपण म्हणतो; पण तोच हात अता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. आणि हिच परिस्थिती राहिली तर पांडवांसारखी अवस्था होण्याची शक्यता नाकारता येणार नाहि समाजामध्ये स्त्रभ्रूण हत्या होण्याचे मुख्य कारण म्हणजे हुंडा पद्धती. जोपर्यंत या समाजामध्ये हुंडा घेतला जाणार आहे. तोपर्यंत स्त्रीभ्रूण हत्या या होतच राहणार आहेत. आज आपण घराच्या बाहेर समाजात गेल्यावर म्हणतो की, ''लग्नात हुंडा घेतला नाही पाहिजे. त्याच्यामुळे तर मुलींची संख्या कमी होत आहे'' पण लग्न जमविताना घरामध्ये आपणच हुंडा देतो आणि घेतो. तर आपण फक्त बोलण्यापुरताच या समस्येचा उपयोग न करता स्वत: तिच्यामध्ये सक्रिय झाले पाहिजे. स्त्रीभ्रूण हत्या होण्याचे मुख्य कारण हुंडा असल्यामुळे सरकारने स्त्रीभ्रूण हत्येबाबत विविध कॉलेजांमध्ये, शाळांमध्ये नुसते कार्यक्रम, भाषणे न घेता तसे कडक कायदे केले पाहिजेत आणि फक्त कायदे मोडण्यासाठी असतात असे न करता ते जनतेवर पूर्णपणे लादले गेले पाहिजेत. तुम्हाला वाटेल हुंडा हा स्त्रीभ्रूण हत्या होण्यास जास्त परिणामकारक नाही; पण तुम्हाला एक उदाहारण सांगतो. जास्त लांब नाही प्रत्येकाने आपआपल्या गावातलाच विचार करा. ज्या व्यक्तीला एकापेक्षा जास्त मुली आहेत, तो माणुस आणि ते कुटुंब सुखी नसते. त्यांना फक्त एकच चिंता असते मुलींच्या लग्नाची आणि हुंड्याची. त्याच्यामुळे त्याला मुली नकोशा वाटतात. याविरुद्ध ज्या व्यक्तीला मुलेच आहेत ते लोक मजेत जगतात. कोणत्याही प्रकारचे टेन्शन घेत नाहीत. याचा जरा विचार करा म्हणजे तुम्हाला मी जे काही सांगतोय ते पटेल.

स्त्रीभ्रूण हत्येमध्ये स्त्रीयांपेक्षा पुरुषच जास्त प्रमाणावर जबाबदार आहेत; कारण खेड्यांमध्ये बघितले तर पुरुषांच्याच हातात कारभार आहे; त्यामुळे पुरुष जे म्हणतील तीच पूर्व दिशा मानून जगावे लागते. त्यामुळे स्त्रीभ्रूण हत्येविषयी महिलांना जास्त सांगण्यापेक्षा पुरुषांना समजावले पाहिजे आणि प्रत्येक जोडप्याने एक गोष्ट लक्ष्यात ठेवा 'तुम्ही जे करताल मग तुम्ही चांगले करा अगर वाईट करा त्याचे भोग तुम्हाला येथेच भोगावे लागणार आहेत; तेपण याच जन्मात त्यामुळे मुलगा मुलगी वेगवेगळे न मानता एकच माना. जर दोन-तीन मुलीच झाल्या तर देवाला किंवा नशीबाला दोष देत बसु नका तर त्यांना मुलांपेक्षा चांगली वागणूक द्या आणि एक गोष्ट, ज्यांना वंशाला दिवा पाहिजे अशा अट्टाहासाने स्त्रीभ्रूण हत्या करतात, त्याच्या चितेला आग्नी द्यायलासुद्धा तो वंशाचा दिवा हजर नसणार आहे.

**सायली नीळ**
बी. ए. भाग ३

# २५ ग्रामीण कवितेचे स्वरुप

## प्रस्तावना

१९२० नंतर महाराष्ट्रात म. गांधींच्या ग्रामवादी ववचारांचे वारे वाहू लागले. यातूनच ग्रामीण साहित्य ही संकल्पना निर्माण होत गेली. ग्रामीण कविता म्हणजे काय ? या कवितेचे स्वरूप व या कवितेची सुरूवाती पासून झालेली वाटचाल, भाषाविषयक चर्चा यांचे थोडक्यात विवेचन या विकाणी करणार आहोत.

**ग्रामीण साहित्य व प्रेरणा**

'ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य' अशी व्याख्या नागनाथ कोत्तापल्ले करतात. तर आनंद यादव, 'खेडेगाव तेथील जीवन-पद्धती, तेथील खास रीती, शेती, निसर्ग, मातीशी असलेला मानवीपणा, प्रदेशनिष्ट वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या, इत्यादी गोष्टींनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्ट्ये या सर्वांचा 'ग्रामीण' या कक्षेत समावेश करता येवू शकतो. त्यानुसार

१. ग्रामनिष्ट जाणिवा व्यक्त करणे.

२. कृषिनिष्ट संस्कृतीचा कलात्मक आविष्कार घडववणे.

३. ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या संबंधाचा शोध घेणे.

४. ग्रामीण समाजाची व्यामिश्रता समजून घेणे.

५. बदलत्या खेड्याचा वेध घेणे.

६. आधुनिकतेचे ग्रामीण समाजावर होणारे परीणाम समजून घेणे.

७. ग्रामीण समाज आणि प्रसारमाध्यमे यांचा संबंध समजून घेणे.

८. निवडणुकीचे राजकारण आणि त्याचे ग्रामीण समाजावर होणारे परीणाम समजून घेणे.

९. समग्र समाजवास्तवाच्या संदर्भात ग्रामीण साहित्याचा विचार करणे.

१०. संघर्षाच्या पावित्र्यात असलेल्या ग्रामीण समाजाची मानसिकता समजून घेणे.

**ग्रामीण कविता**

ग्रामीण कविता म्हणजे काय ? हा प्रश्नही मावमाक आहे. कारण खेड्यातील दोन-चार शब्द आले, ग्रामीण वाक्प्रचार वापरले तर ती ग्रामीण कविता म्हणायची का? नाही तर ग्रामीण कविता म्हणजे ग्रामातील (गाव पांढरीतील) अनुभूतींशी समरसलेली कविता ती ग्रामीण कविता म्हणता येईल. ग्रामीण कवितेविषयी काही समीक्षकांची मते पुढीलप्रमाणे

**१) सावेकर कैलास**

ज्या कववतेत ग्रामीण जनजीवनाचे वचत्रण ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले असते. वतला ग्रामीण कविता असे म्हटले आहे. ह्या कववतेत खेडे, खेड्याशी संलग्न असलेले कृषीजीवन, खेड्यातील जनजीवनाचे दुःख, हर्ष, दारीद्र्य, रुढी, परंपरा, संस्कृती या साऱ्यांचा समावेश आहे.

**२) जहागिरदार विश्वास**

ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनशीलतेने घडविलेली कविता.

कलावंताची संवेदनशीलता म्हणजे अनुभव घेण्याची त्याची पद्धती. बाह्य वास्तव, सभोवताली घडणाऱ्या घटनांच्या बल प्रवतविया देणारी संवेदनशीलता, अनुभवाबद्दल विवश जाणिवा निर्माण करीत असते. ग्रामीण कवितेमध्ये बाह्यवास्तव हे खेडे, निसर्ग आणि पारंपारिक मूल्ये यातून घडलेले ग्रामजीवन आहे आणि त्यात आकाररुपाला आलेली संवेदनशीलता त्या जीवनातील अनुभवाविषयीच्या प्रतिक्रया देत असते. अशा कवितेच्या निर्मितीच्या बुडाशी असलेली संवेदनशीलता ही ग्रामीण संवेदनशीलता आहे आणि अशी कविता ग्रामीण आहे, असे स्थूलमानाने म्हणता येईल.

**३) यादव आनंद**

'उत्कट अनुभवांच्या उत्कट आविष्कारापेक्षा, अनुभवातील सौंदर्याच्या कलात्म जाणिवेने केलेला शोधरुप आविष्कार म्हणजे कविता.फ

वरीलप्रमाणे ग्रामीण कवितेच्या संदर्भात मांडलेल्या मताला अनुसरुन आपणास ग्रामीण कविता म्हणजे ग्रामीण संवेदनर्श लतेने लिहिलेली कविता असे म्हणता येईल. कृषिजीवन, कृषिसंस्कृती, निसर्ग, गावपांढरीची संस्कृती, ग्रामवादी विचारसरणी हे प्रमुख विशेष ग्रामीण कवितेत अंतर्भूत होतात.

**ग्रामीण कवितेची सुरुवात**

मराठी साहित्य क्षेत्रात १९२० नंतर

अनेक क्रांतिकारक बदल झाले. १९२० मध्ये अनेक जाणकार साहित्यिकांच्या निधनाने साहित्य क्षेत्रात पोकळी निर्माण होते की काय ? अशी भिती वाटू लागली. त्यातच १९२० मध्ये टिळकांच्या निधनानंतर गांधीपर्व सुरू झाले. हा राजकीय बदलही साहित्यातील बदलास कारणीभूत ठरला. १९२० मध्ये गांधीजींच्या ग्रामवादी विचारांनी ग्रामीण साहित्याची ही संकल्पना निर्माण होऊ लागली. यापूर्वीही मराठी ग्रामीण साहित्याची सुरूवात हरिभाऊ आपटेंच्या **'काळ तर मोठा कठीण आला'** या कथेने केली होती. पण त्याही पूर्वी सत्यशोधक समाजाचे महात्मा फुले, भालेकर यांच्या कविता ग्रामीण जाणीवजागृती करीत होत्या. त्याला जी वैचारिक बैठक होती ती हरिभाऊ व धुनर्धारींच्या गद्यात नाही. १९२० नंतर खऱ्या अर्थाने कत्रितेची सुरूवात झाली ती कवी गिरीशांच्या **'भलरी'** गीतांनी. त्यातूनच १९३५ साली प्रकाशित झालेला **'सुगी'** हा कवितासंग्रह मैलाचा दगड ठरला. ग. ल. ठोकळ यांनी समकालीन कवींच्या कवितांचे संकलन करून पहिल्यांदाच असा प्रयोग करून हा ग्रामीण कवितासंग्रह प्रकाशित केला. यानंतर अनेक ग्रामीण कविता येऊ लागल्या. स्त्री शिक्षणाचे अध्वर्यु महात्मा फुले यांनी १८९० च्या दरम्यान लिहिलेल्या **'अखंड'** १९२७ साली फुले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी 'महात्मा फुले यांचे चरित्र' या ग्रंथात फुले यांची कविता अखंड रचना प्रकाशित केली होती. महात्मा फुल्यांनी अखंड मधून समाजातील वास्तवचित्र रेखाटले होते. ग्रामीण कवितेची सुरुवात कवी चंद्रशेखर यांच्या **'काय हो चमत्कार!'** या खंडकाव्यापासून तर काहीजण भा. रा. तांबे यांच्या **'गुराख्याचे गाणे'** या कवितेपासून झाल्याचे मानतात. मात्र एका किंवा दोन कवितांनी मराठी कवितेची सुरुवात झाली असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

प्रत्यक्षात कवी केशवसुतांच्या कवितेतही ग्रामीण कवितेच्या खुणा (जाणीवा ) आढळतात. 'एक खेडे' (१८८७) किंवा 'गोष्टी घराकडिल वदता गड्या रे' (२२ जुलै १८८७) इ. कवितांतून येत होते. मात्र या कवितेतून केशवसुतांना येणाऱ्या आठवणी ह्या सुखावणाऱ्याच आहेत. वास्तवता खेड्यातील कौटुंबिक चित्रण, दारिद्र्य, दुःख यापासून ही कविता दूर राहिलेली दिसून येते.

चंद्रशेखरांचे **'काय हो चमत्कार!'** हे खंडकाव्य मिल्टनच्या **Suffolk Miracle** या इंग्रजी कवितेचे रुपांतर आहे. तर भा. रा. तांबे यांच्या **'गुराख्याचे गाणे'** (मे १९०७) या कवितेत सुखी, आनंदी, धनिकाच्या पंचपक्वानात समाधानी असलेला गुराखी आहे. खऱ्या अर्थाने ग्रामीण कविता म्हणता येईल ते 'सुगी' या जानपद गीतसंग्रहाला. १९३५ साली प्रसिद्ध झालेल्या या कवितासंग्रहात ३५ कवींच्या ४४ कवितांचा समावेश झालेला आहे. खऱ्या अर्थान ग्रामीण अनुभूतीला यातून हात घातलेला आहे.

**ग्रामीण कवितेची परंपरा**

इंग्रजीतील 'Pastoral Poetry' वरुन मराठीत जानपद गीतांची सुरुवात झाली. इ. स. १९२० पूर्वीच्या तुरळक कविता ग्रामीण कवितालेखन करावे या हेतूने लिहिलेल्या नसून त्यांच्या प्रेरणा ह्या स्वप्नरंजन, 'Pastoral Poetry' चे अनुकरण अशा स्वरुपात आढळतात.

१९३०-३५च्या दरम्यान ग्रामीण कवितेची पहाट झाली. अन शेतात राबणाऱ्या, चिखलात काम करणाऱ्या, शेतकऱ्यांच्या, त्यांच्या संसाराच्या व्यथा, गुणवैष्ट्यांसह साहित्यातून अवतरू लागली. जगाचा पोशिंदा म्हणून त्यांचा गौरव होऊ लागला.

ग्रामीण कवितेची सुरुवात एका कवितेने अथवा एळाद्या कवितासंग्रहाने झाली असे म्हणणे धाडसाचे ठरेल. हरिभाऊ आपटे, धर्नुधारी यांच्याप्रमाणेच महात्मा फुले यांनी १८९० साली लिहिलेल्या **'अखंड'** या कविता १९२७ साली त्यांच्या **'महात्मा फुले यांचे चरित्र'** या ग्रंथात फुले यांची कविता **'अखंड रचना'** प्रकाशित केली होती. महात्मा फुलेंनी आपल्या कवितेतून सामाजिक, राजकीय, विषयांवर समाजप्रबोधन केले आहे. ज्योतीरावांच्या कविता रचनेस **'अखंड'** म्हणतात. त्यांच्या कवितेतून समतेचा, मानवतेचा विचार मांडला आहे. समता, मानवता, सदाचार, विवेक, न्यायप्रियता, सहिष्णुता व नीतीचा विचार त्यांनी प्रखरपणे मांडला आहे. त्यांनी बहुजन समाजाला समजेल अशी सरळ, साधी, सोपी भाषा वापरली आहे. लांबच लांब संस्कृत शब्द त्यांनी वापरलेले नाहीत. त्यांच्या कवितेविषयी राम कांडगे म्हणतात, ''**सामाजिक परिवर्तनाची, विज्ञान दृष्टीची व आधुनिकीकरणाची निकड बहुजनांच्या मनावर बिंबवणे हे काव्यरचनेचे ध्येय होते.**'' त्यांच्या कवितेचा परामर्श घेतला असता या ध्येयाची प्रचिती येते.

कवी केशवसुत यांच्या कवितेतूनही ग्रामीण कवितेच्या जाणिवा प्रकट होतात. उा. : 'एक खेडे', 'गोष्टी घराकडील वदता गड्या रे'. मात्र या कवितेतून केशवसुतांना येणाऱ्या आठवणी या सुखावणाऱ्याच आहेत. वास्तवता, खेडेगावातील कौटुंबिक दारिद्र्य, दुःख यांच्यापासून ही कविता दूर राहिलेली दिसून येते.

माधवानुज यांची कविता ग्रामजीवनाच्या जवळ गेलेली दिसून येते. ते वैद्यकीय व्यवसायात सेवेत असल्याने इ. स. १८९७ साली त्यांची दुष्काळग्रस्त भागात नेमणूक झालेली होती. त्यावेळी त्यांना खेड्यातील दुःख, दारिद्र्य, गरिबी या व्यथा त्यांच्या लक्षात आल्या. त्या 'दुष्काळ', 'दगड ५ फोडताना', 'जात्यावर बसून', 'मुलांचा कोंडवाडा', 'थंडी', 'दुष्काळग्रस्तांचे सुस्कारे', 'पर्जन्याप्रत' अशा काही कवितांतून या व्यथा मांडलेल्या आहेत.

'दुष्काळ' या कवितेत ते म्हणतात,
''गेली शेते सुकुनि सगळी जाहली ठार दैना''

अशा नेमक्या शब्दात ग्रामीण बोलीत पाण्यावाचून शेतीची झालेली दुर्दशा ते व्यक्त करतात. दुष्काळ, दुष्काळामुळे माणसे, जनावरे यांची झालेली दैन्यावस्था ते चितारण्याचा प्रयत्न करतात. 'माधवानुजांना उत्तम कविता साधत' अशी स्तुती भ. श्री. पंडित करतात. (आधुनिक मर ठी कविता पृ. १५७) तर त्याचवेळी 'प्रत्यक्ष दृश्य चितारताना त्यात फारशी सूक्ष्मता किंवा सखोलता जाणवत नाही' असा आक्षेपही अ. ना. देशपांडे करतात. या दोन्ही मतांचा विचार करता तत्कालीन कवितेच्या बोलीची तुलना करता माधवानुज यांची ग्रामीण बोली खेड्याच्या वेदना स्पष्ट करणारी होती. तिची प्रेरणा ग्रामीणतेची नसली तरी ग्रामीण बोली ग्रामीणत्व दर्शविणारी होती, हे लक्षात येते.

**रविकिरण काळातील कविता**

इ. स. १९२० पूर्वी व नंतर अशा सीमारेषेवर कवी चंद्रशेखर व कवी भा. रा. तांबे यांनी कवितालेखन केलेले आहे. चंद्रशेखर यांनी लिहिलेल्या कवितेमध्ये ग्रामीण जीवनावर आधारित खंडकाव्य व स्फुट कविता पुढीलप्रमाणे आहेत. खंडकाव्य - 'काय हो चमत्कार !' (१९११), 'उघड गुपित' १९३३), 'किस्मतपूरचा जमीनदार' (१९३६) स्फूट कविता - धनगर आणि तत्ववेत्ता, घनाभिनंदन, काळ तर मोठा कठीण आला, हिंद वंदना, इत्यादी.

'काय हो चमत्कार!' या खंडकाव्यात ओढे गावच्या धनाजी पाटलाची मुलगी जिऊ आणि त्यांचा कारभारी शिवा यांची साधी, सरळ, सोपी प्रेमकथा आहे. शिवबाचे जिऊवाचून मरण व शिवबाच्या ध्यासाने जिऊ आजारी पडणे व त्यातच तिचा अंत होणे असे कथानक आहे. या खंडकाव्यात चंद्रशेखरांनी ग्रामीण भागातील पार्श्वभूमी, शिवबा व जिऊतील ग्रामीण बोलीतील संवाद, कथानकाचे सहजपणे केलेले निवेदन ही या खंडकाव्याची वैशिष्टये आहेत. मात्र ग्रामीण बोलीच्या हव्यासासाठी उच्चारानुसार लेखन करण्यासाठी जात्वो, मनुक्श, रात्वोरात, क्वोन, स्वोसुन आल्वो, च्योळी, बांदत्वो, इ. अशी विचित्र शब्दरुपे खंडकाव्याला कृतक (कृत्रिम) बनवतात. उदा. : 'त्येबी स्वोसुन आल्वो धावत न्याया तुला भुतावाणी ड्वोक लईच दुत्त्य हो काई ते कसून बांदाया''
अशा प्रकारची रचना त्यांच्या खंडकाव्यातून दिसून येते.

'उघडं गुपीत' हे चंद्रशेखरांचे खंडकाव्य 'सुगी' याग. ल. ठोकळ संपादित जानपद गीतसंग्रहात प्रारंभीच समाविष्ट केलेले आहे.

'धनगर व तत्त्ववेत्ता' ही कविता इंग्रजी कवी गे (Gay) यांच्या एका कवितासंग्रहास असलेल्या प्रस्तावनेचे रुपांतर आहे. एक मेंढपाळ व एक तत्ववेत्ता यांच्यातील सुसंवाद या कवितेत आलेला आहे. या कवितेत मानवी तत्वज्ञानापेक्षा सृष्टी व सृष्टी नियमच श्रेष्ठ असून सृष्टीतील सूक्ष्म अशा गोष्टींमध्येही खूप तत्वज्ञान ठासून भरलेले आहे याचे विवेचन या कवितेत केलेले आहे. या कवितेतही सुभाषितांची पखरण केलेली आहे.

'घनाभिनंदन' या कवितेत निसर्गातील पावसाचे महत्त्व, शेतकऱ्यांला त्याची लागलेली ओढ, पावसाची उपयुक्तता इ. विशेष या ठिकाणी प्रकट केले आहे. पाऊस झाल्यानंतर निसर्गातील बदल, नभोमंडळात झालेल्या घडामोडीचे वर्णन करताना कवी म्हणतात,

**महानादे ज्याच्या सकल हि नभोमंडळ कसे**
**दणाणोनी गेले झडुनि रणवाद्ये रण जसे**
**उडे झंझावाते अपरिमित धूली दशदिशा**
**तयाने त्या जैशा दिसती करिणी कोपविवशा**

अशा बदलांसह पावसाचे चित्रण समर्पक शब्दात कवी चंद्रशेखरांनी केले आहे. पावसाअभावी निसर्ग, शेती व मानव यांची झालेली दुर्दशा पहिल्या भागात तर पावसाने आनंदित झालेला मानव, निसर्ग दुसऱ्या भागात वर्णिलेला आहे.

**१) ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कविता**

'सुखाचे क्षण' (बोरकर), 'खेड्यातील घराकडे' (पाठक), 'खेडेगावातील सकाळ' (जयवंत), 'हिंगणी एक ओसाड खेडे' (ग. ह. पाटील) इ. कवितांमध्ये प्रामुख्याने ग्रामीण जीवन, खेड्यातील प्रसंगांचे वर्णन केलेले आहे. 'हिंगणी एक ओसाड खेडे' ही कविता वगळता इतर कविता कवी केशवसुतांच्या 'एक खेडे' किंवा 'गोष्टी घराकडील वदता गड्या रे' या कवितांच्या प्रेरणेने लिहिलेल्या आहेत. सुखासीन शेतकरी जीवनाचे चित्रण केले आहे.

'ही चोहिकडे पसरली दिसे हिरवळ ते लांब दूरवर नदिचे जल निश्चळ हे कळस, अलीकडे देवीचे देऊळ' किंवा 'डुलवितो समीरण मंद मंद हा मळा पिकलेला दिसतो यांत गहू जोंधळा धनि करिल कापणी घेऊन हाती विळा' अशा प्रकारच्या कवितांमधून निवेदनात्मक कविता आलेल्या आहेत. यामध्ये सभोवतालच्या निसर्गाचे वर्णन करताना कवी रमणीय वर्णन करताना दिसतो.

अस्सल ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी 'हिंगणी एक ओसाड खेडे' ही कविता चिंतनात्मक आहे.
'हा जीर्ण जनक जाहला जराजर्जर गणगोत न जवळी शुश्रूचे तत्पर मायेची त्याची मुले त्यास सोडूनी ती पोटासाठी गेली देशोधडी'

अशाप्रकारे दुष्काळामुळे झालेली बिकट अवस्था व तिचे समर्पक केलेले वर्णन, दिलेल्या उपमा यामुळे ही कविता संस्मरणीय ठरते.

**२) शेतीविषयक कविता**

'कापसाचे शेत' (किशोर चव्हाण), 'भाताच्या मळ्यात' (वि. स. खांडेकर), 'ऊसाच्या मळ्यात' (भ. श्री. पंडीत), 'मळ्यांत जाताना' (सोपानदेव चौधरी) इत्यादी कवितांतून शेतीविषयक वर्णन केलेले आहे. मात्र या कवितांतून शेतीविषयक अज्ञानामुळे बरेच घोटाळे झालेले दिसून येतात. संस्कृत प्रचुर शब्दांचा

वापर, शेतीविषयी अज्ञान हे दोष दिसून येतात. उदा. न्याहरीची वेळ सकाळची असते पण कवी सूर्य डोक्यावर आल्यावर न्याहरीची वेळ ठरवितो तर डोक्यावर पाटी असताना कमरेला खुरपे खोचल्याचे सांगतो असे कृत्रिम प्रसंग रेखाटलेले आहेत.

**३) ग्रामीण स्त्रियांचे दर्शन**

'कुणब्याची राणी', 'शेवंती', 'मंजुळा', 'ही कोण', 'इरलेवाली', 'सुंदरी', 'गुराखीण', 'पाटीवाली' इ. कवितांमधून ग्रामीण स्त्रीचे चित्रण केले आहे. योग्य व समर्पक शब्दात ग्रामीण स्त्रीची व्यक्तिरेखा जिवंत केली आहे.

सुगीच्या दुसऱ्या भागात शेतकऱ्याची समाधानी, आनंदी वृत्ती, शेतातील कामगार, आचार-विचार, आगोट इर्जिक हा प्रवास, प्रणयभाव, ग्रामीण श्रद्धा, अंधश्रद्धा, अशा विषयांवर कविता लिहिलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या ग्रामीण जीवन-दर्शनाच्या या वेगवेगळ्या विषयांच्या कविता आहेत. सुगीतील कविता ढोबळ वर्णना-पलीकडे जात नाहीत. थोडक्यात ती बांधावरुन फिरते म्हटल्यास वावगे ठरणार नाही. घामाचा सुगंध या कवितेला लागला नाही. तपशिलातील घोटाळे हे खूपच ठिकाणी आढळून येतात. ग. ह. पाटील, कवी सुरेश, पां. श्रा. गोरे यांची कविता मात्र वास्तव, अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविते. ना. घ. देशपांडे यांच्या 'सुगी' या कवितेविषयी कैलास सार्वेकर म्हणतात, 'सुगी' कवितेमधील गेयता, रचनेतील सफाई पटकन लक्ष वेधून घेत असली तरी या कवितेतील आशय पाहिला म्हणजे तिच्यातील अपूर्ण आणि चुकीच्या माहितीमुळे या कवितांचा फोलपणा लगेच जाणवतो. '९ यावरुन तत्कालीन कवितेच्या मर्यादा स्पष्ट होतात.

काही कवींनी नागर व ग्रामीण या मिश्र बोलीचा वापर केलेला आहे. कवी सुरेश, ठोकळ यांच्यासारख्या कवींनी ग्रामीण बोलीचा वापर केलेला आहे. अशाप्रकारे मराठीतील पहिल्या जानपद गीतांचे मोल अनमोल आहे. विषयाच्या स्पष्टीकरणासाठी गद्यात्मक वर्णन केलेली कविता असली तरीही ती श्रेष्ठ दर्जाची ठरते.

कवी गिरीश हे रविकिरण मंडळातील एक नावाजलेले कवी. त्यांच्या कवितागायनाने मराठी कवितेला एकवेगळी झळाळी प्राप्त झाली. कवी गिरीशांच्या एकूण कवितांपैकी 'आंबराई' हे खंडकाव्य ग्रामीण जीवनावरील खंडकाव्य आहे. तसेच त्यांच्या असंख्य अस्फुट कवितांपैकी काही ग्रामीण जीवनावरील ही आहेत. त्यापुढीलप्रमाणे 'सुखी संसार' (१९४२), 'सुंदर हिरवे माळ' (१९३३), 'वारे पाऊस' (१९२६), 'भलरी' (१९३४), 'दौल्याची दिवाळी' (१९४०), 'बियाणा' (१९३७), 'शांतिस्थान' (१९२३), 'काढणी' (१९२८), 'सहकार' (१९३८) या सर्व कविता त्यांच्या 'कांचनमेघ' या निवडक कवितासंग्रहात समाविष्ट झालेल्या आहेत.

'आंबराई' बद्दल स्वतः कवी आपल्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हणतात, प्रस्तुत काव्य म्हणजे शेतकरी वर्गाच्या स्थितीवर लिहिलेली एक संसार कथा आहे. विद्यार्जनाच्या काळात घरची शेती भाती पाहण्याचा व त्याच सुमारास मुंबईतील गिरणी मजुरांच्या स्थिती अवलोकन करण्याचा जो योग जुळून आला त्यांच्या दर्शनातून या संस्कारकथेचा जन्म झाला. ङ्ग' (आंबराई - कवी गिरीश - माझे मनोगत, पृ. ८).

आंबराईच्या कथानकात खंडकाव्याचा नायक मुरार व नायिका सगुणा यांचे एकमेकांवर प्रेम असते. मुरारचे वडील रायबा सगुणाच्या वडीलांकडे मानाजीकडे सगुणेची मागणी घालतात. मानाजी चोळी बांगडीसाठी आंबराई सगुणा व मुरारला देतात. पुढे कुमित्रांच्या सहवासाने मुरार स्वैर वागू लागतो. घरातील सर्वसंपत्ती घालवून आंबराईही घालवतो. कंगाल होऊन मुंबईत कामासाठी येतो. गिरणीत कामाला लागतो. क्षुल्लक कारणावरुन कामावरुन कमी केला जातो. हमाली करुन दिवस काढतो. त्यातच तो आजारी पडतो. मानाजीचा मित्र शिलोजी व सगुणा मुंबईत येऊन त्याची शुश्रूषा करून त्याला बरे करतात. परत गावाकडे येऊन आंबराई मिळवण्याचे स्वप्न पाहतो. त्यावेळी शिलोजी ही आंबराई आपलीच असल्याची खात्री देतो असे हे कथानक आहे. अल्पवयात हाती खूप संपत्ती आली आणि कुसंगत लागली की माणूस कसा वाहवत जातो हे या कथेत सांगितले आहे. याबद्दल अ. ना. देशपांडे म्हणतात, 'अवेळी संपत्ती आणि स्वातंत्र्य हाती आल्यामुळे त्यांचे खरे महत्त्व न समजलेल्या अशा एका उमद्या तरुण शेतकऱ्याचा कसा अधःपात होतो व परिस्थितीच्या तडाख्याने पश्चाताप होऊन तो पुन्हा शेतीकडे कसा वळतो याचे चित्रण ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर रंगविलेले आहे. ''१० अशा प्रकारे आंबराईतील शेतकऱ्याच्या जीवनातील ताणतणावांचे दर्शन घडलेले आहे.

प्रस्तुत खंडकाव्यात अस्सल ग्रामीण भाषेने जीवंतपणा आणलेला आहे. ग्रामजीवनातील प्रसंग सूक्ष्म निरीक्षणाने टिपलेले आहेत. संवादासाठी वापरलेली ग्रामीण भाषा खंडकाव्याला जीवंत करते. कवितेततील ग्रामीण वातावरणाच्या निर्मितीसाठी खास ग्रामीण शब्दांचा वापर केला आहे. उदा. : मोगड, बुचाड, आरं, डोरलं, साखरपान, वेळआमोशा इ. या वैशिष्ट्यांबरोबरच गिरिशांनी यमकाचा अट्टाहास पुरविण्यासाठी शब्दांचे घोटाळे ही केले आहेत. उदा. ओझे-चोजे, परानावाणी-येगळावानी, तर काही ठिकाणी जाणीवपूर्वक यमकांच्या निर्मितीसाठी शब्द चमत्कृती साधल्या आहेत. उदा. दाणा - दिवाणा, मोल मातीमोल, काही - लवलाही, आता-माता (आंबराई, पृ. ३६). वरील गुणदोष लक्षात घेऊनही कवी गिरीश यांची कविता श्रेष्ठ दर्जाची ठरते. ती इतरांपेक्षा अस्सल ग्रामजीवन व्यक्त करते. स्वतंत्र कथानक, बोलीभाषेचा चपखल वापर ही वैशिष्टये या

कवितेला लागू पडतात.

इतर कवींप्रमाणेच गिरीशांची स्फुट कविता ग्रामीण जीवनातील, शेतकऱ्यांच्या जीवनातील आबादी - आबाद (आनंदमय वृत्ती) असल्याचे स्पष्ट करते. त्यांच्या कवितांतून खेड्यातील संघर्ष येण्याऐवजी सुखी-समाधानी जीवन आले आहे. 'दौल्याची दिवाळी' या कवितेत दुष्काळ पडलेला आहे. मात्र लगेच सुखाचा पाऊस पडून आनंदमय वृत्ती होते. स्फुट कवितेतही ओढून ताणून यमक साधलेले आहेत. प्रसंग चित्रणात कृत्रिमता दिसून येते. 'दौल्याची दिवाळी' या कवितेत उन्हात राबणाऱ्या दौल्याचे वर्णन करताना 'गाठून ठायी ठायी' 'खालून काळीचे चटके' या ओळी योग्य वाटत नाहीत. काही वेळा कवितेत गद्यात्मक कथन केल्याने कवितेला काव्यपण राहत नाही असे दोषही दिसून येतात.

''किती कहर दुकाळी सांगता न ये हाय पोटचा विकाया गोळा धजली माय ! गोवली कसाबा दावण लावुनि गाय ! घेती जहर डोळे मिटुनी जवळ विहीर करती कोणी'' (बोरकूट, पृ. ८८, ८९)

पोटच्या गोळ्यालाही विकायला जन्मदाती आई मागेपुढे पाहत नाही. डोळे मिटून विष घेण्याइतपत वाईट अवस्था शेतकऱ्यांची झालेली आहे. त्यांच्या या शेतकऱ्यांच्या आत्मीयतेबद्दल वि. भा. कोलते म्हणतात, ''शेतकऱ्यांच्या आयुष्यक्रमाची त्यांनी काढलेली चित्रे अधिक जिव्हाळ्याची वाटतात.' ११ हीच भावना त्यांच्या एकूण साहित्यातून दिसून येते. स्वतः गोरे हे एका शेतकरी कुटुंबात जगले, वावरले. त्यामुळे अधिकाधिक वास्तवदर्शी लेखन हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्टय ठरले.

**गान कोकिळा : बहिणाबाई चौधरी**

'बहिणाईची गाणी' हा बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा संग्रह १९५२ साली प्रसिद्ध झाला. आपल्या अशिक्षित आईच्या कविता, सोपानदेवांनी उतरवून घेतल्या व आचार्य अत्र्यांच्या प्रेरणेने 'बावनकशी सोने' जगासमोर आणले. एखाद्या चित्रकाराने सहज दोन-तीन फटकारे मारावेत अन् एक सुंदर कलाकृती निर्माण व्हावी अशी ही कलाकृती. ज्यांच्या कवितेने साऱ्या महाराष्ट्राला वेड लावले. जी स्त्री एकही इयत्ता न शिकता एवढे आश्चर्यजनक बहुमोल विचार लिहू शकते हे पाहूनच सारेजण अचंबित होतात. त्यांच्या कवितेतील आशय एक प्रकारचे तत्त्वज्ञान सांगत जातो. उदा. : 'मन वढाय वढाय उभ्या पीकातलं ढोर किती हाकला हाकला फिरी येतं पिकांवर' ('बहिणाईची गाणी', पृ. १८) जीवन जगता जगता माणसांचे विविध नमुने त्यांनी पाहिले. माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तींचे सूक्ष्म दर्शन त्यांच्या कवितांतून घडते.

अनेक साधूसंत जीवनाविषयी अनेक मत-मतांतरे व्यक्त करतात पण बहिणाबाई जीवनाची सुरेख व्याख्या करताना म्हणतात,

**आला सास, गेला सास**
**जीवा तुझं रे तंतर**
**अरे जगनं-मरणं**
**एका सासाचं अंतर !**
**(बहिणाईची गाणी, पृ. १३)**

एवढी सुरेख चपखल व्याख्या फक्त त्यांच्या कवितेतच पाहायला मिळते. मराठी वाङ्मयात अमर होतील अशी अनेक सुभाषिते त्यांच्या कवितेतून आढळून येतात. त्यांची 'कशाले काय म्हनू नही?'' या कवितेत तर सुभाषितांची पखरणच घातलेली आहे.

''बिना कपाशीनं उले त्याला बोंड म्हनू नही हरी नामाईना बोले त्याले तोंड म्हणू नही'' (बहिणाईची गाणी, पृ. ९) कापसाशिवाय उगवते त्याला बोंड म्हणू नये तर हरिनामाशिवाय बोले त्याला तोंड म्हणू नये. अशी सुभाषिते त्यांच्या कवितेत येतात. त्यांच्या कवितांविषयी आचार्य अत्रे म्हणतात, 'एखाद्या शेतात मोहरांचा हंडा अचानक सापडावा तसा बहिणाबाईंच्या काव्याचा शोध गेल्या दिवाळीत लागला. त्यांच्या शब्दा-शब्दातून प्रतिभा नुसत झिरपते आहे. असे सरस आणि सोज्वळ काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे आणि मौजही आहे की जुन्यात चमकेल नव्यात झळकेल असे त्यांचे तेज आहे. एका निरक्षर आणि अशिक्षित शेतकरी स्त्रीने हे सारे रचले आहे. हा तर तोंडात बोट घालायला लावील असा चमत्कार आहे.' १५ असा गौरव अत्र्यांनी त्यांच्या कवितांचा केला आहे.

बहिणाबाईंची कविता म्हणजे एक जागेपणी पडलेले स्वप्न आहे. त्यांच्या कवितेविषयी पद्मा लोकूर म्हणतात, ''बहिणाबाईंच्या कवितेचा एक खास रंग आहे. मातीचा, पानाफुलांचा, ग्रामीण जीवनाचा, खानदेशी, वऱ्हाडी भाषेचा घमघमणारा सुवास त्यांच्या कवितेतल्या प्रत्येक ओळीला येतो.

ही कविता फक्त त्यांची, त्यांचीच आहे. कुठल्याही पढीकपणाचा तिला पुसटही स्पर्श नाही.'१६ बहिणाबाईंची कविता ही कुणाचेही अनुकरण न करता स्वतः च्या बोलीने प्रकटलेली आहे.

तिला खानदेशी सुगंध आहे. बहिणाबाईंच्या कवितेत प्रसंगनिष्ठ विनोद, शब्दनिष्ठ विनोद, उपरोधिक विनोद, प्रतिमा, अनुप्रास, शब्दचित्रे, निसर्गप्रतिमा, शब्दकला, चित्रवती भाषाशैली, प्रासादीक गाणी आढळून येतात. खानदेशच्या 'अहिराणी' बोलीमध्ये बहिणाबाईंची गाणी आहेत. ही बोली परिचयाची नसल्याने सुरवातीला अडखळल्या सारखे होते. पण समजावून घेतल्यावर त्यातला गोडवा लक्षात येतो. मराठी प्रमाण भाषेत जिथे 'ळ' आहे तिथे अहिराणीत 'य': 'ण' आहे तिथे 'न'; 'तुला-मला' ऐवजी 'तुले - मले'; जोडून - वाहून ऐवजी 'जोडसन-वाहीसन' असे भाषा बदल झालेले आहेत.

बहिणाबाईंची कविता लक्ष वेधते ते अष्टाक्षरी छंदाने. त्यांची बहुसंख्य कविता

अष्टाक्षारी ओवी छंदात आहे. लोकगीताच्या लयीत ही कविता लिहिलेली असली तरी या कवितेतील शब्दांचा क्रम, शब्दसंख्या, मात्र यात जरासुद्धा फरक नाही. बहिणाबाईंनी कवितेतून जसे दिसले तसे चितारलेले आहे. कोणताही बेगडी संकल्पनेचा अट्टाहास न धरता अस्सल ग्रामीण कवितेला अधिक बोलती केली. पेरणीपासून मळणीपर्यंत, माहेरापासून सासरपर्यंत, समाजातील व्यक्तिचित्रे त्यांनी कवितेतून रेखाटली आहेत. म्हणून आनंद यादव त्यांना ’पहिली मराठी ग्रामीण कवयित्री’ म्हणतात. ते सार्थ ठरते.

अशाप्रकारे त्यांच्या कवितेतून ग्रामजीवनाचा झरा वाहिलेला दिसून येतो. कदाचित बहिणाबाईंची कविता जर त्याकाळी प्रसिद्ध झाली असती तर मराठी ग्रामीण कवितेला 'Pastoral Poetry'चा हात धरून वाटचाल करावी लागली नसती. ती खेड्यापाड्यातून, ओढ्या-नाल्यातून, निसर्ग, शेतीतून उड्या मारत फिरली असती. अशाप्रकारे १९२० पासून प्रकाशित झालेल्या कवितेवर रविकिरण मंडळाचा प्रभाव दिसून येतो. गिरीश, यशवंत, गोरे, नारखेडे यांची कविता पूर्णपणे रविकिरण मंडळाच्या प्रभावाखाली होती. तर ठोकळ ही चाकोरी मोडताना दिसून येतात. बहिणाबाईंच्या कवितेने ग्रामीण विश्व उजळून निघालेले दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**


१. ग्रामीण साहित्य आणि वास्तव संपादक कृष्णा इंगोले स्नेहवर्धन प्रकाशन पुणे

२. मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास कैलास सार्वेकर मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे

३. ग्रामीण साहित्य प्रवाह आणि परिस्थिती डॉक्टर वामन जाधव स्नेहवर्धन प्रकाशन पुणे

४. जागतिकीकरण आणि मराठी ग्रामीण साहित्य - डॉ राजेंद्र हावरे



**प्रा. प्रमोद दत्तात्रय शेटे**

सहायक प्राध्यापक

मराठी विभाग




# २६ सिझर कर म्हणतेय मातीतील पर्यावरण जाणीवा

**ग्रामीण** साहित्य चळवळ १९७० च्या दशकात उदयाला आली. त्या अगोदर ग्रामीण साहित्य हे कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा विविध वाङ् मयीन प्रकारातून निर्माण झाल्याचे दिसत होते. ग्रामीण कविता सकस बनविण्यासाठी अनेक कवी, कवयित्री यांनी मोलाचे योगदान दिले आहे. अलिकडच्या काळातील महत्त्वाचे नाव म्हणजे कल्पना दुधाळ. त्यांच्याकडे समकालीन महत्वाच्या कवयित्री म्हणून पाहता येते. त्यांचे '**धग असतेच आसपास**' आणि '**सिझर कर म्हणतेय माती**' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांची कविता एका कष्टकरी स्त्रीच्या समृध्द अनुभवांवर आधारित असल्याने आशयदृष्टया निराळी ठरते. म्हणजेच त्यांच्या कविता अनुभवाधिष्ठीत आहेत. शेती, शेतकरी, कष्टकरी स्त्रिया आणि एकूणच '**कृषीनिष्ठ स्त्रीवादी पर्यावरणाचा**' वेध घेणारी त्यांची कविता वास्तवदर्शन घडविताना दिसते. तसेच त्यांच्या कवितेची भाषाशैली साधी,सोपी असून ग्रामीण शेती संस्कृतीशी घट्ट नाते सांगणारी आहे.

'**सिझर कर म्हणतेय माती**' हा कवितासंग्रह २०१० साली प्रकाशित झाला. हा कवितासंग्रह कवयित्रीने मातीत आणि मातीसाठी राबणाऱ्या हातांना अर्पण केला आहे. '**सिझर कर म्हणतेय माती**' या शीर्षकाविषयी '**साधना**' या अंकाच्या मुलाखतीत बोलताना कल्पना दुधाळ म्हणतात, '**आत्ताच्या काळात सहज आणि साध्या पध्दतीने काहीच येत नाही. म्हणजे कोणतंही पीक घ्या, फळंभाज्या घ्या, त्यासाठी आता रासायनिक खतं वापरावी लागतात. फवारणी लागते. आत्ताच्या काळात या गोष्टी आपल्याला टाळताच येत नाहीत. आता पूर्वीसारखी घरोघरी जनावरे राहिलेली नाहीत. त्यामुळे शेणखत ही मिळणे अवघड झालेय. सेंद्रिय खत तर रासायनिक खतांपेक्षा खूप महाग आहेत. ते चांगले असले तरी आर्थिक-दृष्ट्या परवडत नाही. त्यामुळे मातीमधलं उगवते; पण आता पहिल्यासारखं नैसर्गिक राहिलेलं नाही; कारण आज माती म्हणतेय की, आता मला नैसर्गिकपणे नाही उगवतं होतं.' आजच्या वास्तव परिस्थितीवर कवयित्रीने भाष्य केले आहे.**

शेती व शेतकरी, हमीभावाचा प्रश्न, दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या शेतकरी आत्महत्या, बदलती जीवनशैली, नात्यांमधील तेढ, दुष्काळ, अवकाळी पाऊस, नापिकी, रासायनिक खतांचा अति वापर, बदलते ग्रामजीवन, निसर्गात वाढणारा मानवी हस्तक्षेप, एकूणच त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम अशा अनेक गोष्टी त्यांच्या कवितांमधून अधोरेखित होतात. शेतकरी जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्यासाठी बाराही महिने शेती पिकवताना दिसतो. त्यामुळे शेतीचा पोत, समतोल बिघडताना दिसून येत आहे. पूर्वी हंगामानुसार केली जाणारी शेती आता बारोमास झाली आहे. याविषयी '**मृदगंध**' या कवितेत कवयित्री म्हणते,

**हरितक्रांतीच्या स्वप्नांनी**
**मातीतल्या माणसांना फुलवलं**
**फळभाज्या पिकांना हंगाम डावलून**
**बारमाही केलं**

हे वास्तव चित्रण आज सगळीकडे पाहायला मिळते. मानवाची स्वार्थी वृत्तीच शेतीतील बदलास, निसर्ग आणि पर्यायाने पर्यावरणाच्या नुकसानीच कारणीभूत ठरताना दिसत आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारे तापमान त्याचेच द्योतक आहे. शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारे दुःख, दैन्य आणि दारिद्रय यांचे चित्रण '**कणसांचे मरणोत्सव**' या कवितेत येते. ही कविता आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडते.आजही एकविसाव्या शतकात हुंडाबळी सारख्या अनेक समस्यांना मुलींना सामोरे जावे लागते. स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार यासारख्या सामाजिक प्रश्नावरही कवयित्रीने प्रकाश टाकला आहे. याविषयी कवयित्री कणसांचे मरणोत्सवमध्ये म्हणते,

**खुडली जातात ढीगभर कणसं**
**टचटचीत दाण्यांची.. लांबसडक दांडयाची**
**विस्तवावर निघतात होरपळून...**
**हुंडाबळीसारख चवदार**
**हुरड्याची पार्टी रंगत जाते**
**पाखरांचे स्वप्न भंगत राहातं**
**तरीही गोफणीतून दगडं सुटत राहतात**
**आरोळयांच आवाज येत राहतात**'.

१९९० नंतर जागतिकीकरणामुळे रोजगाराच्या अनेक संधी विविध क्षेत्रात निर्माण झाल्यामुळे साहजिकच गावातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात शहराकडे आकर्षित झाला. परिणामी शहरे ही पांढरीशुभ्र, गुबगुबीत कापसासारखी दिसू लागली तर गावे ही

कापसाच्या रिकाम्या बोंडासारखी भासू लागली. जागतिकीकरणामुळे ग्रामीण व शहरी जीवनावर पडणाऱ्या प्रभावाचे चित्रण त्यांच्या 'गाव' या कवितेतून दिसून येते. गाव' या कवितेत त्या म्हणतात,

**बोंडातला कापूस पिंजावा**
**तशी जमिनीवर उभी शहरं**
**आणि रिकाम्या बोंडासारखी**
**गावं . पऱ्हाटीला चिकटून**

त्याचबरोबर त्यांची कविता स्त्री विषयक पर्यावरणीय जाणीवा ही व्यक्त करताना दिसते. याविषयी मीना चिरोटे म्हणतात, 'जागतिकीकरणामुळे शोषण होणाऱ्या घटकात स्त्रिया मोठ्या प्रमाणात बळी पडत आहेत. तिचे अवयव आणि मातृत्व यांचे बाजारीकरण होत आहे.गरीब, कष्टकरी वर्गातील स्त्रियांच्या श्रमात वाढ झाली असून असहय दडपणात आपले श्रम अल्प दरात विकण्यास प्रवृत्त केले जात आहे. माणसाच्या नैसर्गिक जगण्याचा भांडवली उत्पादनासाठी विपर्यास करण्यात आला आहे.' २ स्त्रियांवर होणारे अन्याय- अत्याचार, त्यांचे होणारे शोषण, बाजारीकरण याविषयी कवयित्री परखडपणे व्यक्त होताना दिसते. जागतिकीकरणामुळे खेड्यांचे बकालपण, झपाट्याने वाढत जाणारी शहरे, लोकसंख्यावाढ, बेरोजगारी, दुरावलेले नातेसंबंध, शेती व शेतकरी यांचे प्रश्न अशा अनेक समस्यांना त्यांची कविता स्पर्श करताना दिसते. माणसाच्या एकटेपणाविषयी बोलताना कल्पना दुधाळ म्हणतात,

**प्रचंड गर्दीत..... हरवलं माझं**
**गाठोडं निराश झाले... घरी आले**
**दारात गाठोडं... माझ्या आधी पोचलेलं**
**सोडून पाहिलंतर..... जस्सच्या तसं**
**त्यात माझं एकटेपण बांधलेलं (पृ. ३८)**

मानवाने अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली परंतु आजही आधुनिकीकरणाच्या युगात माणूस एकटा आहे. यासाठी त्याची स्वार्थी वृत्तीच कारणीभूत ठरताना दिसते. स्त्रीच्या वाट्याला आलेल्या एकाकीपणावर कवयित्रीने परखड भाष्य केले आहे. तसेच स्त्रियांवर दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या अन्याय अत्याचारा विषयी कवयित्री म्हणते,

**'काळाच्या चारदोन घडया**
**मी उलगडून पाहिल्या**
**प्रत्येक घडीला बाईला**
**परिक्षाच द्यावा लागल्या' (पृ.३७)**

यातून समाजाची स्त्री विषयक मानसिकता दिसून येते. स्त्री प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करीत असून तिने आज अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. तरी सुद्धा समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन म्हणावा तितका बदलला गेला नाही. आज एकविसाव्या शतकात जगत असताना सुद्धा स्त्रीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते .हे वास्तव नाकारता येत नाही. एकूणच त्यांची कविता पाहता शेती, शेती विषयक प्रश्न, कष्टकरी वर्ग, स्त्री, निसर्ग आणि पर्यावरण यांना अधोरेखित करते. त्यांच्या कविता संग्रहाचे 'सिझर कर म्हणतेय माती' हे शीर्षकही अतिशय समर्पक आहे याविषयी त्या म्हणतात,

**मी टाकलेली मेथी आणि कोथिंबीर...**
**मागतेय माझ्याकडे युरियाचा खाऊ...**
**लुसलुशीत व्हायचं स्पेअर**
**रखरखीत झाडाच्या सालीनं**
**मॉइश्चरायझरचा हट्ट धरलाय**
**माती अडून बसलीय,**
**सिझर कर म्हणत**
**मी काय करु?**

या कवितेतून शेत जमीन आणि स्त्री यांचा संबंध कवयित्री ने रेखाटला आहे. एखाद्या स्त्रीचा प्रसुती होण्यासाठीचा कालावधी पूर्ण झाल्यनंतर ही त्या स्त्रीची नैसर्गिक रीतीने प्रसुती होत नसेल तर डॉ. सिझर करुन बाळ आणि आई या दोघांना वाचवतात. आज तसा हट्ट शेत जमीन करताना दिसत आहे. एकेकाळची पारंपारिक शेती नष्ट होऊन तिची जागा आधुनिकतेने घेतली. त्यामुळे रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेती नैसर्गिकपणे उगवणे विसरून गेली . त्यामुळे ती जमीन शेतकऱ्याला सिझर कर म्हणताना दिसत आहे. कवयित्रीने आई आणि काळी आई यांच्यातील नवनिर्मितीतील साम्य दाखवले आहे. तसेच या होणाऱ्या बदलांवर त्यांची कविता उपहासात्मक भाष्य करताना दिसते. कल्पना दुधाळ यांच्या कवितेविषयी डॉ. महेंद्र कदम म्हणतात की, ''पिकांच्या प्रतिमा, त्यांच्या वाढीबरोबर खूप खोलवर जोडलं गेलेलं स्त्रीत्व, भूमीचं बीजारोपण आणि सृजन एका वेगळ्या रुपाने आणि धाडणीने या कवितेत आलेले आहे प्रतिमांचे जगण्याशी आलेले हे एकरुपत्व ही या कवितेची खरी ओळख आहे.'३. शेती आणि त्यात होणारे बदल, त्याचे परिणाम ग्रामीण वास्तव, पारंपारिकता आणि आधुनिकता निसर्ग, बदलते पर्यावरण,जागतिकीकरण, शहरीकरण, दारिद्र्य आणि स्त्री-पुरुष अशा अनेक अंगांना स्पर्श करते. एकूणच त्यांची कविता ही कृषी जाणिवातून निर्माण होताना दिसते. पर्यावरणीय स्त्रीवादाशी नाते सांगणाऱ्या कल्पना दुधाळ या समकालीन सशक्त कवयित्री आहेत.

**संदर्भ टीप :**

१) साधना अंक - २० जानेवारी २०१८ कल्पना दुधाळ यांची मुलाखत
२) 'जागतिकीकरण आणि मराठी कवितेतील स्त्री चित्रण' - मोना चिमोटे, अक्षर वाङ्मय, एप्रिल ते जून २०१३ पृ. क्र.-३८
३) कवितारती (संपा.) - पुरुषोत्तम पाटील दिवाळी अंक २०१६ पृ. क्र. १५२

**प्रा. डॉ. वंदना भाग्यवंत**
**मराठी विभाग**

२७

# वाणिज्य शिक्षण : आजची गरज आणि उद्याची दिशा

**आदरणीय** प्राचार्य, शिक्षकवृंद आणि माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो,महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाच्या निमित्ताने आपल्या सर्वांशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. वाणिज्य विभाग हा नेहमीच शिक्षण आणि रोजगाराच्या संधींच्या केंद्रस्थानी राहिला आहे. आजच्या गतिमान आणि स्पर्धात्मक युगात वाणिज्य शिक्षणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. केवळ पारंपरिक ज्ञान आत्मसात करणे पुरेसे नाही, तर बदलत्या व्यावसायिक परिस्थिती नुसार स्वतःला तयार करणे ही काळाची गरज आहे.

आजचा विद्यार्थी केवळ पदवीधर होऊन थांबू शकत नाही. त्याला अर्थशास्त्र, व्यवस्थापन, विपणन, वित्त आणि लेखा यांसारख्या विविध वाणिज्य शाखांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यावसायिक संधींची वाढ झाली आहे आणि या संधींना गवसणी घालण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना सक्षम करणे हे वाणिज्य विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.आपल्या विभागात आम्ही केवळ पुस्तकी ज्ञानावर भर देत नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम आयोजित करतो. चर्चासत्रे, कार्यशाळा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि औद्योगिक भेटी यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यावसायिक जगाची ओळख करून दिली जाते. यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो आणि ते भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज होतात.

आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाचे महत्त्व अनमोल आहे. वाणिज्य क्षेत्रातही नवीन तंत्रज्ञान वेगाने येत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा विश्लेषण यांसारख्या आधुनिक  चा वापर व्यवसायात वाढत आहे. त्यामुळे आमच्या अभ्यासक्रमात या नवीन तंत्रज्ञानाचा समावेश करणे आणि विद्यार्थ्यांना त्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी केवळ चांगले व्यावसायिक बनण्यावरच लक्ष केंद्रित करू नये, तर एक जबाबदार नागरिक म्हणूनही आपली भूमिका ओळखावी. नीतिमूल्ये आणि सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी आपल्या व्यावसायिक जीवनात यशस्वी व्हावे, ही आमची अपेक्षा आहे.

शेवटी, मी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच वाणिज्य विभाग यशस्वी वाटचाल करत आहे. येणाऱ्या काळातही आपण याच उत्साहाने काम करू आणि आपल्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी प्रयत्नशील राहू, यात मला कोणतीही शंका नाही.

धन्यवाद!

**हर्षद अनिता बळीराम जाधव**
सहा. प्राध्यापक
वाणिज्य विभाग

## ०१ * आजची स्त्री *

नाही राहिली अबला
झाली सबला सर्वार्थांनी
अवकाशास गवसणी
घालणारे तिचे विचार
विचारासम आचार
लौकिकार्थाने...

आजची स्त्री
दोन्ही घरची पणती
तेजोमय ज्योती
संपूर्णार्थाने...

जपते प्रेमाने
हृदयाशी सासरमाहेर
सौख्यमय आहेर
समाधानार्थाने...

संकटांशी झुंजते
रणचंडीका अवतार
दुर्गामाता तीच जगन्माता
खऱ्या अर्थाने...

स्त्री खरोखर
संपूर्ण विश्वाची माऊली
प्रेमाची सावली
सर्वांसाठी...

लाभला स्त्रीजन्म
हा नाहीच गुन्हा
मिळो पुन:पुन्हा
सौभाग्याने!

**कु. साक्षी आवटे**
बी. ए. भाग १

## ०२ * वडील *

वडील म्हणजे विशाल आभाळ असतं,
उंच भरारी घेण्यासाठी साद घालत असतं...
वडील म्हणजे वादळातलं घर असतं,
सुखरूप निवाऱ्याच जणू स्थान असतं...
वडील म्हणजे शिस्तीचं पुस्तक असतं,
जिवनाला योग्य वळण लावत असतं...
वडील म्हणजे समुद्रातलं जहाज असतं,
खंबीर आधाराचं दुसरं नाव असत...
वडील म्हणजे उंबराच झाड असतं,
लपलेल्या भावनांचं जणू खोड असतं,
लपलेल्या भावनांचं जणू खोड असत....

**प्रियंका संतोष ढेरे**
बी. ए. भाग १

# ०३ * सांग ना! *

सोडलेला हात पुन्हा पकडशील का...
तोडलेलं मन पुन्हा जोडशील का...
तू फक्त माझी आहेस पुन्हा बोलशील का...
सांग ना माझ्यावरती पहिल्यासारखं प्रेम करशील का...

तोडलेलं नातं पुन्हा जोडशील का...
सुकलेलं फुल पुन्हा खुलवशील का...
माझ्या आयुष्यात पुन्हा येशील का...
सांग ना माझ्यावरती पहिल्यासारखं प्रेम करशील का...

अपूर्ण राहिलेल्या गोष्टी पूर्ण करशील का...
तुझे सगळे बहाणे सोडुन मला स्वीकारशील का...
जीवनाच्या वाटेवर माझ्यासोबत चालशील का...
सांग ना माझ्यावरती पहिल्यासारखं प्रेम करशील का...

पुन्हा एकदा त्या वाटेला दिसशील का...
सर्व गोष्टी सोडून पुन्हा भेटशील का...
पहिल्यासारखं गप्पागोष्टी करशील का...
सांग ना माझ्यावरती पहिल्यासारखं प्रेम करशील का...

**रोहित जगताप**
बी. कॉम. भाग ३



०४

# * शाळा *

'शाळा म्हणजे विद्येचे मंदिर'
शाळेत प्रत्येकजण घडतो
पण वेगवेगळ्या रूपांत
प्रत्येक लहान मुल हा मातीचा गोळा असतो.
तो घडतो ते ठिकाण शाळा...

सर्वांत आधी अंगणवाडीची पाळी
तिथे जायला येते रडू पण
खाऊ मिळतो गोड म्हणतात जणू
तिथे मिळतात भरपूर मित्र
मग नाही दिसत रडण्याचे चित्र
तिथे जातात दोन वर्षे कशीबशी...

मग येती पहीलीची पाळी
जातात मुलं हसत, रडत
तेही वर्ष जाते फुकट
दुसरीपासून होतो अभ्यास सुरु
येतो त्यांना अभ्यासाचा कंटाळा...

मग वाटते, नको रे बाबा ही शाळा
अभ्यास न केला तर,
शिक्षक देतात शिक्षा आणि म्हणतात...
**छडी लागे छम छम**
**विद्या येई घम घम...**
पण छडी घेताना जो घाम घाम होतो
ते कसे अन् कोण त्यांना समजवायचे...

मग होतात ते मोठे
मग कळते शाळेत नाहीत तोटे
शिक्षण आहे महत्त्वाचं,
आयुष्य त्यातच कटवायचं...

**प्रा. आनंद शेळके**
बी. एस्सी.

# ०५ ✻ मैत्रीचा विश्वास ✻

मैत्रीचा अर्थ म्हणजे
जिवलग, साथीदार,
तीच असते आपली
एकमेव खात्रीदार...

जेव्हा ती बोलत नाही,
तेव्हा वाट बघत राही
दु:खाच्या क्षणी साथ देणारी,
संकटावेळी मदत करणारी,
कायम बोलत राहणारी असते मैत्री...

सत्याचं जग असते ती,
पण खोट्याचा ग्रह
बनावं लागतं तिला,
का तर खुश बघायचं असतं हिला...

कायम हसवते ती,
रडवते ती, चेष्टा-मस्करी करते ती
आणि समजत नाही कधी
साथ सोडुन जाते ती...

मैत्री तिच्याशी करा,
जी साथ देईल,
विश्वास ठेवीन,
नाहीतर अंधारात ढकलून जाईन...

मैत्री अशी करा, जी चिडवते,
आपल्यासाठी डोळे पाणावते,
रूसते, हसते नाही तर
मैत्री मन दुखवते, एकटीला पाडते,
वादळात ठेवते आणि
सुकल्या रानात सोडून जाते...

**कु. शिवांजली दिगंबर कुदळे**
वर्ग ११वी तु. अ



## ०६ * कणा *

–कुसुमाग्रज

‘ओळखलत का सर मला’ पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी.
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून...

‘गंगामाई’ पाहुणी आली, गेली घरट्यात राहून,
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतींत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी - बायको मात्र वाचली...

भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला येऊन संगे सर, आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे...

खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
‘पैसा नको सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा...’

**संकलन : कु. काजल काशिनाथ गावडे**
बी. ए. भाग २

## ०७ * मैत्री *

मैत्री असावी घडवणारी
ना की, बिघडवणारी
समजून घेणारी, समजावणारी...
वेळ प्रसंगी ओरडणारी.
चूक-बरोबर सांगणारी,
मैत्री असावी न सांगता
मनातलं गुपित ओळखणारी...
चेहरा पाहूनच दुःख जानणारी...
मैत्री असावी सुखात हसवणारी....
दुःखात सहभागी होऊन समजावणारी...
मैत्री असावी निस्वार्थ सोबत राहणारी...
मैत्री न मागता साथ देणारी असावी.
मनातील गोष्ट न सांगता ओळखणारी असावी...
मैत्री निखळ - निर्मळ पाण्यासारखी असावी
मैत्री रात्रीच्या चांदण्या सारखी असावी...
सोबत नसून ही प्रकाशाच्या
वाटा दाखवणारी असावी...
मैत्री ही अशी असावी.

**नाजिया समीर तांबोळी**
बी. एस्सी. भाग १

# ०८ * जन्माला आले *

मी मुलगी म्हणून जन्माला आले,
काहींना हसू झाले तर, काही दुःखात न्हाले...

पण आईने मात्र उराशी कवटाळले
कारण तिलाही तिचे बालपण आठवले...

लहानाची मोठी झाले,
समाजाच्या नजरेत रुतले
लोकांनी नको ते कट रचले
दुष्टांनी तुडवलेल्या चिखलात माखले गेले,
पण मी नाही हरले...

कारण बापाने ताठ मानाने जगायला शिकवले....
अन् जगण्याचा अर्थ मी जाणले
जोपासला तो विद्यार्थी धर्म
कारण मी मुलगी म्हणून जन्माला आले...

आज यशाचे शिखर मी गाठले,
अन् बघणाऱ्यांचे डोळे फाटले,
कदाचित यासाठीच देवाने मला घडवले...
आणि मी मुलगी म्हणून जन्माला आले...

**कु. साक्षी बरडे**
बी. एस्सी. भाग १

०९

# * लळा *

तुझ्या सहवासाचा मला फार लळा लागला
तुझ्यासोबत राहून मला आनंद अनावर का झाला
कळलेच नाही तुझी साथ मला कधी भिरकावून गेली
स्वतःवरचा ताबा मला ठेवताच नाही आला...

माझे भान मलाच आता राहिना
तुझी ओढ मला सतत जगू का देईना
काय जादू केली तू माझ्यावर अशी
भान राहिलेच नाही मला माझ्यावर कधी...

तुझ्याविना जगणं नकोसं झालंय
तुला कळलेच नाही, माझ्या वेदना का कधी
जीव मुठीत धरून जगतोय मी कधीचा
काळजाचे ठोके तु माझे ऐकशील का कधी...

लळा लागला तुझा सोबतीचा असा
गुंतलो मी तुझ्या प्रेमाच्या बंधनात कसा
तुझ्या ओढीने मला प्रेमात पाडलं
उरलासुरला प्राण माझा मी तुझ्यात वाहिले...

तुला का नाही लागला माझा लळा
वेडा तुझ्या पाठी मीच का खुळा
आवरतो आहे मी स्वतःला माझ्या
दुःख पेलतो आहे मी एकटाच माझ्या...

तुला पण लागूदे लळा माझा
कळू दे वेदना तुला पूर्ण माझ्या
समजेल जेव्हा तुला प्रेम माझ्या
होशील वेडा तू प्रेमात माझ्या...

**तुषार जाधव**
बी. कॉम. १

१०

# * पाणी *

पाणी म्हणजे जीवनधारा,
निसर्गाची अमूल्य देणगी सारा।

थेंब थेंब जपला पाहिजे,
संकटात उपयोगी पडतो तो साजेसा ।

डोंगरातून झरझरत वाहतो,
नद्या होऊन सागराशी मिळतो।

पाण्याशिवाय काहीच नाही,
शिवार, जनावरं, माणूस
सगळ्यांची श्वासधारा
याच्याशी आहे जुळलेली।

पाऊस येतो, पाणी देतो,
शेतात सोनं उगवतं, शिवार फुलतो।

तरी आज आपण
पाण्याची नासाडी करतो,
उद्या त्याच्याच थेंबांसाठी
आक्रोश करतो।

जपूया पाणी, जपूया निसर्ग,
हीच खरी जीवनाची संगतीची वळणं।

थेंब वाचव, जीवन वाचव,
भविष्यासाठी शुद्ध जल जपव।

**प्रगती सुरवसे**
बी. ए. भाग. ३

# ११ * कॉलेज गारवा *

सिलॅबस जरा जास्तच आहे
तो दर वर्षी वाटत?
चाप्टर्स पाहून पासिंगचा प्रॉब्लेम मनात राहतो...

तरी लेक्चर चालू राहतात
डोक्यात काही घुसत नाही.
चित्रविचित्र फिगर्सशिवाय
बोर्डावर काही दिसत नाही...

तितक्यात कुठून तरी फंक्शनची
डेट जवळ येते
सेमिस्टरमधले काही दिवस
नकळत चोरून नेते...

नंतर लेक्चर एक्स्ट्रा घेऊन
प्रॉब्लेम भराभरा शिकवत राहतात
प्रॉब्लेम, एक्झाम्पल थिअरी सांगुन
सिलॅबस लवकर संपवू लागतात...

मन मात्र चालत नाही.
सरांशिवाय वर्गामध्ये
कुणीच बोलत नाही
लेक्चर संपवून सबमिशनचा
सुरू होतो पुन्हा खेळ...

जर्नल कम्प्लिट करण्यामध्ये
फार फार जातो वेळ
चक्क डोळ्यांसमोर सिलॅबस
चुटकीसरशी संपून जातो
एक्झाममध्ये सुद्धा
पेपर का बरं सोपा जातो ?

**गायत्री येंगडे**
बी. ए. भाग ३

# १२ * निसर्ग *

निसर्गाच्या कुंडलात रंग असतात.
गंध आणि हवा समृद्धतेचे गाणे गातात.
पाहिलं की सर्व काही सुंदर दिसतं
आकाश आणि पृथ्वी एकमेकांत मिसळतं

ताजं पाणी नद्यांत जाऊन ग्वाही देतं
पाहून ती झाडे हिरवीगार रंगात खुलतं
फुलांमध्ये रंगांची जादू असते,
त्यांच्या सुगंधात मन रमून जातं

वाऱ्याची गारगी फुलांचं स्वागत करते
सूर्याच्या किरणांनी मातीला ऊब करतं

पाणी आणि माती मिळून जीवन निर्माण करतं
आणि तिथे निसर्ग सर्जनाची गाथा गात

निसर्ग म्हणजेच जीवनाची गाणी,
त्याच्यात आनंद आणि शांतीच्या गाणी
छाब्दांत व्यक्त होऊ शकत वाही तो सुंदर
तो समजून जगणे, हाच आदी निसर्गाचा ठराव

**आफ्रिन आघाडीवाले**
बी. ए. भाग ३

# १३ * हवा होता बाबा तुमचा हात *

सोबतीला हक्काने हात मला हवा होता तुमचा बाबा
चुकले कधी मी तर रागवायला, हवा होता तुम्ही
लहानपण माझे कसे गेले निघुन कळले नाही मला
तुमच्या आठवणी आहेत पण त्या खूप कमी

तुमचा चेहरा पण आठवत नाही हे किती दुर्भाग्य
तुमच प्रेम मला मिळाल नाही वाटते थोडिशी खंत
शाळेत सगळ्यांना होते बाबा त्यांचे लाड पुरवायला
मी कधी कोणाकडे हट्ट केला नाही

कधी-कधी एखादी जादूची छडी असावी
ती फिरवून तुम्हाला वापस आणावं
लहानपणी वाटायचे, जेव्हा कोणी विचारायचे
तुझे बाबा काय करतात, तेव्हा चेहऱ्यावर माझ्या
एक मोठ प्रश्नचिन्ह उमटायचे

आयुष्यात कधी मला या प्रश्नाचे उत्तर भेटले नाही
अजूनही कोणी विचारलं तरी मला उत्तर समजत नाही
हा प्रश्न मला सगळ्यांत अवघड वाटतो.
या प्रश्नात पण मन तुम्हालाच शोधते.

लहानपणी सगळ्यांचे वडिल त्याना शाळेत सोडायला यायचे
गेटवर सोडून मुलीला घट्ट मिठी मारायचे
तेथे पण मला तुमचीच आठवण यायची
कळायचे नाही कधी, पण क्षणोक्षणी तुमची गरज भासायची;

मला आवडत नव्हते कधी की मला वडिल नाहीत हे सांगायला
पण मनात वाटायचे, खरंच ते असले असते तर...
जसेजसे समजू लागलं तसेतसे सगळे
लहानपणीच्या गोष्टी सांगायचे

पण माझे प्रश्न तेथे मला त्रास द्यायचे.
कधी कधी मी लोकांपासून दूर जायचे.
का तर त्यांचे प्रश्न मनातल्या मनात खायचे

**''बापाची प्रॉपर्टी असणे गरजेचे नाही.**
**बापाची सावली असणे गरजेचे आहे''**

**कु. गायत्री गौतम येंगडे**
बी. ए. भाग ३

# १४ * अनमोल जीवन *

जीवन शब्द ऐकताच
मन कसं भरल्यासारखं वाटतं,
पण कुठेतरी काही तरी चुकल्यासारख वाटतं.

हे माझं आहे, ते तुझं आहे करत,
भांडणा-भांडणातच जीवन निघून जातं
आणि जीवनाचा आनंद घेणं राहूनच जातं.

जे रुसले त्यांना हसवायला शिका,
काही गोष्टी नव्याने करायला शिका
विनाकारण जीवनाचा आनंद घ्यायला शिका
स्वतःलाच स्वतःशी समजवायला शिका.

दोन क्षणांचं जीवन असतं
आज असतं तर उद्या नसतं,
त्यामुळे हसत जगा आणि मोकळ्या मनाने जगा,
कारण जग इतकंही वाईट नसतं
जसं आपल्याला वाटतं...

**कु. शुभम देशमाने**
बी. ए. भाग १

# १५ * मैत्री *

जीवनाच्या प्रत्येक क्षणाला
आनंदी करणारी
डोळ्यांतले अश्रू दूर करून,
ओठांवरती हसु आणणारी

रुसलो तर रुसवे पुरवणारी
आपले नखरे सांभाळणारी
चुकलो तर मार्ग दाखवणारी

जिवाला जीव लावणारी
मनापासून निःस्वार्थ, निखल
असं प्रेम करणारी...

**कु. जाधव राजश्री हनुमंत**
बी. एस्सी. भाग १

# १६ * आई वडील आले माझ्या वाट्याला *

बंगला, गाडी गेली वाटणीत मोठ्याला
घराजवळची बाग मिळाली धाकट्याला
सुपीक शेतीची जागा दिली, छोट्याला
किती माझे भाग्य, आई-वडील आले माझ्या वाट्याला ।। धृ ।।

पंच जमले होते, आम्ही वाटणी करताना
आगीत तेल घालत होतो, आम्ही भांडताना
आम्ही उत्सुक होती हिस्सा मागताना
त्यांना आनंद होत होता घर दुभगताना
दिसता सगळ्यांना धन-संपती हवी होती
मोठ्याचे किती माझे भाग्य, आई-वडील आले माझ्या वाट्याला ।।१।।

संपत्ती नावावर करण्याची प्रत्येकाला झाली होती घाई
आम्हांला कोण सांभाळेल या आशेने
बघत होते बाबा आई, आई बाबा माझ्याकडे
चला म्हणायला पुढे कोणच नाही आला
मला कळतचं नव्हतं माझ्या वाटेला येईल का काही
दागदागिने आईचे दिले पंचांनी धाकट्याला
मात्र आई-वडील आले माझ्या वाट्याला ।।२।।

सगळे खुश झाले बनून करोडपती फक्त
आई-वडील हीच माझी मोठी संपत्ती
आई-वडीलांच्या आशीर्वादाने मला मिळाली सुखशांती
शेवटी आइ-वडिलांचा आशीर्वाद येईल कामी
किती नशीबवान मी, काहीच कमी नाही, किती माझे भाग्य
आई-वडील आले माझ्या वाट्याला ।।३।।

**कु. गायत्री गौतम येंगडे**
बी. ए. भाग ३

# १७ * बाबा *

सगळे म्हणती आईची वेडी माया
तरी बाप असतो संपूर्ण कुटूंबाचा पाया
माया बाबांची असतात नारळ खरे
राग आला जरी वर आतून प्रेमाचे झरे
कुटुंबासाठी बाबा राबतात दिनरात देह
झिंजे त्याचा जळते जशी दिव्याची वात...

ढाल बनुनी बाप उभा राहिला दारात
हिंमत ना कोणाची उगाच येव्या घरात
माया बाबांची असते कस्तुरीपरी दिसली
नाही वरून जरी जाणावी तो अंतरी
येईला वृद्धपणी जेव्हा बाबांसाठी व्हा
तुम्ही त्यांच्या आधाराची एक काठी...

काय लिहू मी कळत नाही
'बाबा' या एका व्यक्तीसाठी
असे कसे म्हणू शकते कोणी
कोणीही नसते कुनासाठी...

जीवन खर्चले बाबांनी सारे आपल्या
कुटुंबातल्या माणसांसाठी
बघितलेच नाही बाबा तुम्हाला
कधी जगताना स्वतःसाठी

**रोहित राजेंद्र पवार**
**बी. ए. भाग १**

# १८ * जीवन एक : संघर्ष *

सोप नसतं आयुष्यात
सहज वावरणं
आपल्याच स्वप्नांना डोळ्यांदेखत
दूर जाताना पाहणं

सोपं नसतं प्रत्येक वेळी
संयमाचा मंत्र जपणं
आपल्याच ध्येयाला
आपणच दूर करणं

सोपं नसतं नियतीच्या परीक्षेला
परत-परत सामोरे जाणं
जिंकणार की हारणार
हेही माहीत नसताना

सोप नसतं स्वप्नांचा प्रवास करणं
खचलेल्या अवस्थेतही
त्यातच मनसोक्त
गुरफटणं...

असे हे जीवन एक संघर्ष असतो.
हरणं-जिंकण तर नित्याचे नते
उठून धैर्याने उभे राहणे शहाणपण ठरते.
संयमाने पुढे जाणाऱ्याला यश नक्कीच
मिळते.

**गायत्री गौतम येंगडे**
बी. ए. भाग ३

# १९ * आयुष्य – एक सुंदर प्रवास *

आयुष्य एक सुंदर प्रवास
सगळ्यांनी हसत जगलं पाहिजे
नव्या जोमात, नव्या उत्साहात
त्यालाही अनुभवलं पाहिजे

मित्र, नातलग, सगे-सोयरे
सर्वांच्या ध्यानी असलं पाहिजे
कुटुंबातील प्रत्येकाशी
आपुलकीने वागले पाहिजे.

संसाराचा गाडा हाकताना
तिलाही वेळ द्यायला पाहिजे
पुन्हा एकदा जुन्या आठवणीत
धुंद होऊन रमायला पाहिजे.

आयुष्यातल्या कठीण प्रसंगोला
धैर्याने सामोरे गेलं पाहिजे
गरुडभरारी घेऊन पुन्हा
उंच उड्डाण केलं पाहिजे.

सारे काही स्थिरस्थावर करून
स्वतःही थोडे जगायला पाहिजे,
पुन्हा एकदा फिनिक्स पक्ष्यासारखे
राखेतून जन्मायला पाहिजे.

**विठ्ठल माधव नलवडे**
बी. ए. भाग १

# २० * एक नातं *

एक नातं आपुलकीचं
मनाच्या बागेत रुजणार
एक नातं मायेचं
हळूच दवात भिजणारं....

एक नातं मैत्रीचं
नभासारखं प्रसरणारं...

एक नातं मैत्रीचं
फुलासारखं फुलणारं.
फुलता-फुलता मैत्रीच्या
झोक्यावर झुलणारं...

**प्रियांका संतोष ढेरे**
बी. ए. भाग २

# २१ * मैत्री *

मैत्री.... असावी हसवणारी...
ना की रडवणारी...

मैत्री असावी... घडवणारी
ना की, बिघडवणारी
समजून घेणारी, समजावणारी...

वेळप्रसंगी ओरडणारी.
चूक-बरोबर सांगणारी,
मैत्री असावी न सांगता
मनातलं गुपित ओळखणारी...

चेहरा पाहूनच दुःख जाणणारी...
मैत्री असावी सुखात हसवणारी....
दुःखात सहभागी होऊन समजावणारी...

मैत्री असावी निःस्वार्थी सोबत राहणारी...
मैत्री न मागता साथ देणारी असावी.
मनातील गोष्ट न सांगता ओळखणारी असावी...

मैत्री निखळ - निर्मळ पाण्यासारखी असावी
मैत्री रात्रीच्या चांदण्यासारखी असावी...
सोबत नसूनही प्रकाशाच्या वाटा दाखवणारी असावी...
मैत्री ही अशी असावी.

**नाजिया समीर तांबोळी**
बी. एस्सी. भाग १

## २२ * जगणं *

जगावं आभाळाहूनी उंच,
पर्वतापेक्षाही ताठ,
पृथ्वीच्या अंतरंगासारखं खोल.

कुणासाठी तरी समरसून जक्षावं,
कुणासाठी तरी निर्भिडतेने मराव.

कुणाच्या आनंदात बेभान नाचावं,
कुणाच्या दुःखात हमसाहमशी रडावं.

आधार द्यावा हळव्या मनास निःशब्द,
त्या निशब्दतेतही असावी अफाट ताकद.

कुणीतरी जिंकावं म्हणून
मुद्दामहूनच हरावं सुद्धा.

कुणास श्वासांचं दान देण्यासाठी
हसत हसत मरावं सुद्धा.

दुःखांना लावून पाठ हसावं,
संकटांच्या मानगुटीवर दिमाखात बसावं.

**प्रा. डॉ. चारू देवकर**
**इतिहास विभाग**

## २३ * सुख दुःख *

सुंदरतेसोबत काटे घेऊन उमलतो गुलाब जसा,
सुख अन् दुःखाचा जोडाही असतो अगदी तसा.

अव्याहतपणे चक्र चालतं निसर्गाचं,
अविरत चक्रच तर आहे सुख दुःखाचं.

हसतांनाही ओलावतात डोळ्यांच्या कडा,
उल्हासी मनाला जातो कधी-कधी तडा.

येणाऱ्या सुखाला पाहुन मन सुखावतं,
पण त्यामागून येणारं दुःख हळूच डोकावतं.

आपण नियतीच्या हातच्या बाहुल्यांनी एकच करावं,
सुखाचा भरभरून आनंद घ्यावा.

दुःखांला कडकडून सामोरं जावं,
सुख नि दुःख दोघांचेही हात हातात,
घेऊन हसत हसत चालावं.

मुठीतले आभाळ / १८

**प्रा. डॉ. चारू देवकर**
**इतिहास विभाग**

२४


# * मैत्री *

आयुष्यात माझ्या जेव्हा कधी
दुःखाची लाट होती तर कधी
अंधारी रात होती सावलीलाही
भिणारी एकट्याची अशी वाट होती
तेव्हा फक्त मित्रा तुझी आणि
तुझीच साथ होती...

मैत्रीत नसे कसली रिती मैत्री
म्हणजे निखळ प्रीती मैत्रीत
दाटतो एकच भाव, मैत्री म्हणजे
एकमेकांच्या काळजाचा अचूक ठाव
मैत्रीत असे फक्त प्रेमाचीच शिंपण
खरेतर, मैत्री म्हणजे दोन जिवांची
नाजूक गुंफण...

जीवनाच्या वाटेवर चालताना कधी
भेटलास तू सोबती चालताना
अर्थ जगण्याचा शिकवलास तू
कधी वाटेल भिंती एकटे होण्याची
मित्रा, फक्त मागे वळून पहा
तुझ्याच पाठी असेन मी...

**धूश्री गपाट**
बी. ए. भाग ३



# * हिंदी विभाग *

०१

# श्याम की माँ

– साने गुरुजी

'**श्याम** की माँ' ये 'साने गुरुजी ऊर्फ पांडुरंग सदाशिव साने' इन्होंने लिखी हुई आत्म-कथनात्मक पुस्तक हैं। ये पुस्तक उन्हके बचपन की यादें से घुडी हुई पुस्तक है। उन्होंने अपने माँ के त्याग और सुसंस्कार का प्रभावी चित्रण किया है। साने गुरुजी उन्हें लेखणी के माध्यम से उनके माँ के निस्सीम प्रेम, त्याग और कर्तव्य की भाव की अप्रतिम कहानी है।

उन्होंने अपने जीवन से जुड़ी हुई कहानी लिखी है। ये श्याम उन्हके जीवन के बारे में यह पुस्तक यानी 'श्याम की माँ' यह हमे बताती हैं।

ये काहानी उन्हकें यानी श्याम के बालपन / बचपन, गरीब और संस्कारक्षम कुंटूंब में होते है। श्याम के कुंटुंब की आर्थिक परिस्थिती बहुत कठीण थी। उनके पिता जी जादा पिढाई न होने पर, उन्हे रोजगार योग्य नहीं मिल पाता। इस लिए श्याम की माँ अपने परिवार की जिम्मेदारी उठाती है। वह बहुत कष्ट, संयमी, त्यागशील स्वभाव की थी । उन्होंने अपने भविष्य की सर्व दुख और अपनी पीढ़ा सह करती हुए। अपने बच्चों को अच्छे संस्कार दिये। 'श्याम की माँ' थे पुस्तक केवल माँ की ममता की नहीं तो उनकी नैतिकता, समाजसेवा और कर्तव्यपालन की उत्कृष्ट उदाहरण है।

वो अपने बच्चों को कष्ट करने का महत्त्व समझाती हैं और उनके बच्चों को कभी निराश नहीं करती। 'श्याम की माँ' उन्हके बच्चो को सत्य, अहिंसा और प्रामाणिक शिक्षण दिया। वो श्याम को दूसरे की मदत करने की ओर प्रेरित करती । श्याम की माँ भगवान की श्रब्दा, कष्ट और त्याग की शिक्षण देती।

यह पुस्तक अनेक प्रसंग में माँ के कर्तृत्त्व के बारे में बताया है। यह 'श्याम की माँ' पुस्तक हमें माँ, प्रेम, कष्ट, और कर्तव्य समझाता हैं।

**कोमल संजय वायदंडे**
बी. ए. भाग २



02

# शिक्षक दिवस

**रोज** सुबह मिलते है इूसे, हमको करना है ये बतलाते है ले के तस्वीरें इन्सानों की, सही-गलत का भेद हमें ये बतयाते है। कभी डांट तो कभी प्यार से, कितना कुछा हमको ये समझाते है। है रंग कईं इस जीवन में, है भविष्य देश का जिन में, उनका सबका भविष्य ये बनाते है। रंगों की दुनिया से पहचान ये करवाते है। खो ना जाये भीड़ में कहीं हम, हम को हम से ही ये मिलवाते है। हार हार के फिर लड़ना ही जीत है सच्ची ऐसा एहसास ये हमको करवाते है। कोशिश करते रहना हर पाल, जीवन का अर्थ हमें ये बतलाते देते है। नेक मंज़िल भी हमें, राह भी बेहत्तर हमें ये दिखलाते देते हैं । ज्ञान जीवन का काम यही सब है इनका, ये शिक्षक कहलाते है, ये शिक्षक कहलाते है।

शिक्षक दिवस की ध्वनि बनी, ज्ञान की चाया में सब भीगी। उन्होंने दिल से बच्चों को पढाया, मार्गदर्शन करके जीवन को सजाया। ज्ञान का दीपक जला कर राह दिखाई, सपनों को साकार करने की आज़ादी दिलाई । चिड़ीयों की तरह उड़ने की शिक्षा दी, उन्होंने हमें सच्ची मानवता सिखाई। कलम की धड़कन से जीवन को रंग दिया, ज्ञान की किताबों को हमेशा मजबूत से लिखा। शब्दों की छायाओं में छपी है उनकी मेहनत, शिक्षक दिवस पर उन्हें करते है सलामती से सलाम।

जो क्लास में बने मॉनीटर, कोरी शान दिखाते है। आता जाता कुछ भी नहीं, पर हम पर रोब जमाने है। जब क्लास में टीचर नहीं, तो खुद टीचर बन जाते हैं। कॉपी पेंसिल लेकर बस नाम लिखने लग जाते हैं। खुद तो हमेशा बाते करें, हमें चुप करवाते हैं। अपनी तो बस गलती माफ, हमें बाल चढ़ाते है। क्लास तो संभाल पाते नहीं, बस चीखते और चिल्लाते है। भगवान बचाए इन मॉनिटर से इन्हें हम नहीं चाहते है। जब बचपन था, तो जवानी एक ड्रीम था जब जवान हुए, तो बचपन एक जमाना था। जब घर में रहते थे आजादी अच्छी लगती थी। आज आजादी है, फिर भी घर जाने की जल्दी रहती है कभी होटल में जाना पिज्जा, बर्गर खाना पसंद था । आज घर आमा और माँ के हाथ का खाना पसंद है । स्कूल में जिनके साथ झगड़ते थे, उन्हेही इंटरनेट पे तलाशते है । ये अब पता चला है, बचपन क्या था, इसका एहसास अब हुआ है, काश बदल सकते हम जिंदगी के कुछ साल...

काश, जी सकते जिंदगी फिर एक बार ! जीवन में जो राह दिखाए, सही तरह चलना सिखाए । माता-पिता से पहले आता, जीवन में सदा आदर पाता। सबको मान प्रतिष्ठा जिससे सीखी, कर्तव्यनिष्ठा जिससे कभी रहा न दूर मैं जिससे, वह मेरा पथदर्शक है । जो मेरे मन को भाता, वह मेरा शिक्षक कहलाता । कभी है शांत, कभी है धीर, स्वभाव में सदा गंभीर, मन दबी रहे ये इच्छा, काश मैं उस जैसा बन जो मेरा शिक्षक कहलाता ।

**माता गुरु है, पिता भी गुरु है,**
**विद्यालय का शिक्षक भी गुरु है,**
**जिससे भी सीखा है हमने, हमारे लिए**
**हर वो शख्स गुरु है ।**

जीवन के हर अंधेरेमे रोशनी दिखाते हो आप । बंद हो जाए सब दरवाजे नए रास्ते दिखाते हो आप । सिर्फ किताबी ज्ञान नहीं, जीवन जीना सिखाते हो आप । इस शिक्षक दिवस करते है आप का धन्यवाद...!

**गुरु का योगदान हमारे जीवन में**
**अनमोल होता है। इस शिक्षक**
**दिवस पर, हप आप के ज्ञान और**
**समर्पण को सम्मानित करते हैं ।**
**शिक्षक दिवस की**
**हार्दिक शुभकामनाएँ !**

**गुमनामी के अंधेरे में था, पहचान बना दिया**
**दुनिया के गप से मुझे**
**अनजान बना दिया**
**उनकी ऐसी कृपा हुई**
**गुरू ने मुझे एक**
**अच्छा इंसानबना दिया**

**वक्त और टीचर में**
**थोडा सा फर्क होता है**
**टीचर सीखा कर**
**इम्तिहान लेता है और**

वक्त इम्तिहान लेकर
सिखाता है।

आप से सीखा और जाना
आप को ही गुरु माना
सीखा सब आपसे हमने
कलम का मतलब भी
आप से जाना
शिक्षक दिवस की
हार्दिक शुभकामनाएँ

हजारो फूल चाहिए एक माला बनाने के लिए
हजारों रंग चाहिए एक रंगोली बनाने के लिए
हजारों दिये चाहिए एक आरती सजाने के लिए
पर एक सच्चा शिक्षक अकेला काफी है
बच्चों के जिंदगी को स्वर्ग बनाने के लिए...

**सृष्टी योगेश शहा**
बी. ए. भाग ३



०३

# हर घर की बेटी

**पृथ्वी** पर मानव जाति का अस्तित्व, आदमी और औरत दोनों की समान भागीदारी के बिना असंभव है। दोनों ही पृथ्वी पर मानव जाति के अस्तित्व के साथ ही साथ किसी भी देश के विकास के लिये समान रूप से जिम्मेदार है। हालांकि, इसमें कोई संदेह नहीं है। कि महिलाएँ पुरुषों से अधिक महत्त्वपूर्ण है क्योंकि इनके बिना हम मानव जाति की निरंतरता के बारे में नहीं सोच सकते क्योंकि उनके द्वारा ही महिलाओं को जन्म दिया जाता है। यही कारण है कि हमें कन्या भ्रूण हत्या जैसे गंभीर अपराध को पूर्ण रूप से रोकने की आवश्यकता है, इसके साथ ही हमें लड़कियों को आगे बढ़ाने के लिये सुरक्षा, सम्मान और समान अवसर प्रदान किये जाने चाहिये।

भारतवर्ष में अलग-अलग जाती - वर्णों में नारी को प्रताडित कर उनकी अवहेलना की जाती है। उनसे ही समाज का फैलाव है। नारी एक नहीं बल्कि भिन्न-भिन्न रूपों में समाहित है। पैदा होने से पहले ही उसके प्रति मन में द्वेष निर्माण करने वाली इन जनसामान्यों को किसने जन्म दिया क्या वह भूल गए होंगे? स्त्री को एक काम तृप्ति, खिलौना समझने वाले पुरुष किसी-न-किसी के पेट से आए हुए होंगे। यह एहसास उन्हें क्यों नहीं होता होगा। जहां लड़कियों की सुरक्षा के लिए प्रबंध किया जाता है वहां उनकी रक्षा करने वाले व्यक्ति की प्रवृत्ति मूलतः रक्षा करना है या नहीं इसकी जाँच किए बिना ही उन्हें तैनात किया जाता है।

जिस घर में पैदा होते ही उस घर को समाज के शिक्षित लोग भी अपशगुन का दर्जा दे देते हैं। पैदा होते ही सब तरफ उसकी अवहेलना के बादल उसके जीवन में छा जाते हैं। शादी होने तक और उसके बाद में भी उसकी जिंदगी में क्या ही बितती होगी। शादी के बाद भी उसका जीवन उसका नहीं होता। वह हर समय रिश्तो में खुद को समर्पित कर देती है। समाज को, जाति-धर्म के नियमों की वजह से लड़कीयों से अपनी इज्जत बचाने-बढ़ाने तक सीमित न होकर उसे कुछ कदम आगे बढ़ने का अवसर प्रदान कर देना चाहिए ताकि कईयों के बच्चियों को वह अवसर मिल सके, जो आज तक उन्हें न मिल सका; जो कि उन्हें मिलना चाहिए था और उसके बल पर वह, वो सब कुछ कर दिखाएँगी जो किसी ने किया न हो।

हर जगह यह देखने को मिल जाएगा कि स्त्रियों को पुरुष के बाद वाला स्थान दिया जाता है ना की बराबर वाला। अल्प बुद्धि के लोग उन्हें भोग की वस्तु और बच्चे पैदा करने के नजरिए से देखते आए हैं और यह प्रथा बहुत लंबे अरसे से चलती आ रही है। किसी स्त्री से जन्म लेकर किसी और स्त्री को प्रताड़ित करना क्या यही पुरुषार्थ है? छोटी बच्ची के गूँजते पायल घर में छाया हुआ सन्नाटा पल भर में संगीत में बदल देता है। यह अद्भुत चमत्कार घर में लड़की होने मात्र से होती है।


भारतीय धर्मशास्त्र के अनुसार स्त्रियों को देवी एवं सृष्टि निर्माता कहा गया है। वही पर आने को कुप्रथा एवं संस्कारों की जंजीरों में उनके पैरों को बांधा गया है। बेटी होने पर पिता की आज्ञा का पालन करना, पत्नी बनने पर पति के इशारों पर चलना, माँ बनने पर बच्चों का पालन-पोषण करना तथा मर्यादा को कायम रखते हुए घर की चार दीवारों में कैद रहना ही उनका कर्तव्य माना जाता था। आज भी भारत के कइ हिस्सों में स्त्रियों को ऐसी कठोर प्रथा का पालन करना पड़ रहा है। उन्हें आज भी शिक्षा, संपत्ति एवं सामाजिक सहभागिता से वंचित रखा गया है। अप्रत्यक्ष रूप से कह तो यह धार्मिक संस्कृति का ही प्रभाव है।

सन १९९९, २००१ एवं २०११ की जनगणना के अनुसार महिलाओं की जनसंख्या पुरुषों के अनुपात में निरंतर गिरावट देखी गई। लगातार महिलाओं की घटती जनसंख्या का मुख्य कारण निरक्षरता के साथ-साथ आज भी हमारे समाज में व्याप्त दहेज प्रथा है। आज भी सामान्य लोगों की मानसिकता होती है की बेटी तो पराया धन है इसे पढ़ाने से क्या फायदा, शादी करने पर बहुत सारा दहेज भी देना पड़ेगा, फलस्वप लोग बेटियों को पैदा होने से पहले ही मार देते है।

आज शिक्षा के विस्तार के फलस्वरुप लोगों की मानसिक सोच में काफी परिवर्तन आया है। हम आज बेटे एवं बेटियों की परवरिश तथा शैक्षणिक प्रक्रिया को एक समान रखने

का प्रयास कर रहे हैं। देखा जाए तो आज प्रतिस्पर्धा एवं सेवा के क्षेत्र में लड़कों से कहीं आगे बढ़ती जा रही है। सुई से लेकर जहाज के निर्माण में, एक गृहिणी से लेकर राष्ट्रपति के पद तक, चिकित्सा से लेकर देश की रक्षा में भी अपना परस्पर सहयोग दे रही है। अपने माता-पिता के साथ देश का नाम भी रोशन कर रही है।

**मुस्ताक इम्तियाज शेख**
सोलापूर विश्वविद्यालय



# ०१ * दोस्ती *

दोस्ती नाम है सुख दुख की कहानी का,
दोस्ती राज है सदा ही मुस्कुराने का,
ये कोई पल भर की जान-पहचान नहीं है,
दोस्ती वादा है उम्र भर साथ निभाने का।

आप की निगाह अगर मेहरबान हो जाये
मैं जिस जमीं पे हूँ, आसमान हो जाये,
है अब भी आप को शक मेरी दोस्ती पर,
तो फिर इक बार मेरा इम्तेहान हो जाये ।

दिल के हर कोने में बढ़ने वाले हो तुम,
हर दर्द को हँसी में बदलने वाले हो तुम
तुमसे ही तो जिंदगी की ये कहानी है,
दोस्त तुम मेरी सबसे बड़ी निशानी हो ।

जिन्दगी के हर मोड़ पर खडा रहता
जो तेरे गमों को तुझसे छीन लेता है।
जो बिना किसी शर्त के निभाता यारी
दोस्त ही है जो राहों से काँटे बीन लेता है।

दोस्ती नहीं, अपनेपन का एहसास हो तुम
दोस्त हर मुसीबत में साथ की आस हो तुम
सच्ची दोस्ती है तुमसे ऐ दोस्त
सच है जिंदगी मैं सहारे का
सच्चा विश्वास हो तुम ।

तुमसे क्या दोस्ती हो गयी है ।
ज़िन्दगी ज़िन्दगी हो गयी है ।

**सृष्टी योगेश शहा**
बी. ए. भाग ३

०२

# * स्वतंत्रता का भ्रम *

चलने-फिरने वाले ये लोग
चल तो रहे हैं अपने पैरों पर,
लेकिन, ये चल रहे हैं किसके विचारों पर?
मंजिल का तो पता नहीं
और सोचना इनको आता नहीं ।

डूब गए हैं विद्वान,
उस खोज में जिसका उन्नति से नाता नहीं ।
पीड़ितों को सुधारने खड़े ठेकेदार हजार है,
और देश को सुधारने की डोर
पकड़ने वाले गैर-जिम्मेदार है।

संघर्ष का पथ धैर्यता से पार होता है,
मुश्किल हालातों में
अपनों का ही सहारा होता है।
पर अकेले चलने की ज़िद में,
भीड़ के बीच भी खो गया इंन्सान ।

ज़रूरत थी,
अपनों के सहारे की
जैसे समंदर को होती है किनारे की ।
स्वतंत्र रहने की चाह में
बंट गए हैं लाखों परिवार !

एकता तोड़ने वालों की कमी नहीं इस धरती पर,
किसी ने जातियों के नाम पर काटा...
किसी ने धर्म के नाम पर तोड़ा..
हम आज़ाद हैं,
पर क्या सच में हम आज़ाद हैं?

हर व्यक्ति
किसी न किसी बंधनों में,
रिवाजों में, रूढ़िवादी परंपरा के
थोथे विचारों की बेड़ियों से जकड़ा है,
क्या आज़ादी ऐसी होती है?

**अमित शिवाजी सरवदे**
एम. ए. भाग २

# * इंग्रजी विभाग *

01

# Friendship

## HAPPY FRIENDSHIP DAY !

I am so grateful for your constant support, love and understanding. Here's to many more year of our beautiful friendship.

There are so many people around me but you are the only one to allow me to be myself ! This special day is for my best friend entirely.

You're a true friend. that want you to know out love, for each other has helped us to grow we've been through Some though times but we' ve made it through The only one ever trusted was you!

A true friend is someone who thinks. You are a good age even though she knows you are slightly cracked.

Dear friend, ever since you Come into my life, you have filled my life with utter joy and happiness!! **Happy Friendship Day to you!**

You always make me smile and laugh Thank you for such being a great friend. Good Friends Good Books and a sleepy conscience this is the ideal life Happy Friendship Day! You have a way of making the darkest days brighter and the joyful moments even more special.

I am so grateful your constant Presence, understanding and the way you always know how to make me smile.

A true friend never waits for your permission to enter and brighten your life. He comes all at once and wins you ever before you know it. Happy friendship Day!

Spirits Always High If one fells the others help him rise it's A joint effort the Spirit never dies. Friends are connected Heart To Heart Distance & Time Can't Break Them Apart. No matter where life takes us remember that you have a friend for life. Happy Friendship Day, my treasured, long-distance friend!

**A STRONG<br>FRIENDSHIP DOESN'T<br>NEED DAILY<br>CONVERSATION,<br>DOESN'T ALWAYS<br>NEED TOGETHERNESS,<br>AS LONG AS THE<br>RELATIONSHIP LIVES<br>IN THE HEART,<br>TRUE FRIENDS<br>WILL NEVER PART...**

A simple friend thinks of friendship when you argue. A true friend knows that it is not a friendship until you have fought.

A good friend wants to hear Your stories. Your best friend's are there to live them with you!

On this special day, I Celebrate the deep friendship that binds us together. your love & support are for every blessings, and I'm thankful for every moment we share.

**A true friend is<br>Someone who thinks<br>You are a good egg<br>even though she<br>knows you are<br>Slightly Cracked.**

**Srushti Shaha**<br>B. A. Part 3

# 02 William Shakespeare

**William** Shakespeare was an english playwright, poet and actor. He is widely regarded as the greatest writer in the english language and the world's pre-eminent dramatist. He is often called England's national poet and the "Bard of Avon" or simply **"The Bard".** His extant works, including collaborations, consist of some 39 plays, 154 sonnets, three long narrative poems and a few other verses, some of uncertain authorship. His plays have been translated into every major living language and are performed more often than those of any other playwright. Shakespeare remains arguably the most influential writer in the English language, and his works continue to be studied and reinterpreted.

Shakespeare was born and raised in Stratford-upon-Avon, Warwickshire. At the age of 18, he married Anne Hathaway, with whom he had three children : Susanna, and twins Hamnet and Judith. Sometime between 1585 and 1592, he began a successful career in London as an actor, writer, and part-owner **"Sharer"** of a playing company called the Lord Chamberlain's Men, later known as the King's Men after the ascension of King James VI of Scotland to the English throne. At age 49 (Around 1613), he appears to have retired to Stratford, where he died three years later. Few records of Shakespeare's private life survive; this has stimulated considerable speculation about such matters as his physical appearance, his sexuality, his religious beliefs and even certain fringe theories as to whether the works attributed to him were written by others.

Shakespeare produced most of his known works between 1589 and 1613. His early plays were primarily comedies and histories and are regarded as some of the best works produced in these genres. He then wrote mainly tragedies until 1608, among them Hamlet, Othello, King Lear and Macbeth, all considered to be among the finest works in English. In the last phase of his life, he wrote tragicomedies (also known as romances) such as The Winter's Tale and The Tempest, and collaborated with other playwrights.

Many of Shakespeare's plays were published in editions of varying quality and accuracy during his lifetime. However, in 1623, John Heminges and Henry Condell, two fellow actors and friends of Shakespeare's, published a more definitive text known as the First Folio, a posthumous collected edition of Shakespeare's dramatic works that includes 36 of his plays. Its Preface includes a prescient poem by Ben Jonson, a former rival of Shakespeare, who hailed Shakespeare with the now famous epithet: "Not of an Age, but for all Time".

**Collected By**
Abutalib Shaikh
B. A. Part 3

# 03 Geoffrey Chaucer

**Geoffrey** Chaucer (/ˈtʃɔːsər/ CHAW-sər; c. 1343 – 25 October 1400) was an English poet, author, and civil servant best known for The Canterbury Tales. He has been called the "father of English literature", or, alternatively, the "father of English poetry". He was the first writer to be buried in what has since come to be called Poets' Corner, in Westminster Abbey.

Chaucer also gained fame as a philosopher and astronomer, composing the scientific A Treatise on the Astrolabe for his 10-year-old son, Lewis. He maintained a career in public service as a bureaucrat, courtier, diplomat, and member of parliament, having been elected as shire knight for Kent.

Among Chaucer's many other works are The Book of the Duchess, The House of Fame, The Legend of Good Women, Troilus and Criseyde, and Parlement of Foules. He is seen as crucial in legitimising the literary use of Middle English when the dominant literary languages in England were still Anglo-Norman French and Latin. Chaucer's contemporary Thomas Hoccleve hailed him as "the first finder of our fair language" (i.e., the first one capable of finding poetic matter in English). Almost two thousand English words are first attested in Chaucerian manuscripts.


Chaucer was born in London, most likely in the early 1340s (by some accounts, including his monument, he was born in 1343), though the precise date and location remain unknown. The Chaucer family offers an extraordinary example of upward mobility. His great-grand-father was a tavern keeper, his grandfather worked as a purveyor of wines, and his father, John Chaucer, rose to become an important wine merchant with a royal appointment.[8] Several previous generations of Geoffrey Chaucer's family had been vintners and merchants in Ipswich. His family name is derived from the French Chaucer, once thought to mean 'shoemaker', but now known to mean a maker of hose or leggings.

In 1324, his father, John Chaucer, was kidnaped by an aunt in the hope of marrying the 12-year-old to her daughter in an attempt to keep the Ipswich property in the family.[14] The aunt was imprisoned and fined £250, now equivalent to about £200,000, suggesting that the family was financially secure.

John Chaucer married Agnes Copton, who inherited properties in 1349, including 24 shops in London, from her uncle Hamo de Copton, who is described in a will dated 3 April

1354 and listed in the City Hustings Roll as "moneyer", said to be a moneyer at the Tower of London. In the City Hustings Roll 110, 5, Ric II, dated June 1380, Chaucer refers to himself as me Galfridum Chaucer, filium Johannis Chaucer, Vinetarii, Londonie, which translates as: "I, Geoffrey Chaucer, son of the vintner John Chaucer, London".

**Kalpesh Bhoj**
**B. A. Part 3**



# 01 College Days

In halls where dreams and echoes blend,
We find new paths, and hearts to mend.
Among the books and laughter's sound,
A world of wonder we have found.

The morning bells, the crowded halls,
The scribbled notes on classroom walls.
With every lecture, every test,
We strive to give our very best.

The friends we meet, the bonds we tie,
The sleepless nights that pass us by.
From campus walks to canteen chats,
In every corner, joy begats.

The teachers, guides with wisdom deep,
Awaken minds once lost in sleep.
They show the stars beyond the page,
And spark the thoughts that light our age.

Yet time, like wind, begins to flee,
And soon we're roots of memory.
But college lives within our soul,
A golden chapter, bright and whole.

So here's to days of youth and cheer,
To every smile, to every tear.
A toast to moments bold and free
Forever part of you and me.

**By. Sanika Dharak**
B. A. Part 3

02

# Poem on Life

Life is a journey, winding and wide,
With rivers to cross and mountains to stride.
A canvas of colors, both dark and bright,
Painted by moments of shadow and light.

It whispers in dawn, so quiet and new,
And dances in raindrops, fresh with dew.
It roars in the storm, wild and free,
Yet calms like the hush of a moonlit sea.

It teaches with time, through sorrow and song,
That even the hardest days don't last long.
We stumble, we rise, we break and mend,
Each twist and turn, each start and end.

Love is its anchor, hope is its flame,
Loss carves its mark, yet never brings shame.
For even in struggle, something will grow
A strength we didn't yet know we could know.

So live without fear, with heart open wide,
Chase every dream you've hidden inside.
For life is a gift, both fleeting and grand,
A poem still written by your own hand.

**By. Akanksha Dain**
**B. A. Part 2**

## 03 Friendship

In quiet times and storms that roar,
A friend is there, forevermore.
Through whispered dreams and laughter loud,
They lift us up, they make us proud.

No need for gold, no jeweled crest,
True friendship stands the toughest test.
It's in the glance, the silent cheer,
The hand that wipes away a tear.

They walk beside us, never ahead,
But match our steps with hearts well-spread.
In darkest night or brightest day,
A friend is never far away.

They know our faults, yet love us still,
Support our hopes, respect our will.
In pages worn or just begun,
Friendship writes a tale of one.

So here's to friends, both old and new,
The rarest gems, the truest crew.
In every heart, they plant a seed
Of joy, of strength, of every good deed.

**By. Sakshi Jagtap**
**B. Com. 2**

# * अहवाल विभाग *

# कार्यालय विभाग

करमाळा या दुष्काळी व ग्रामीण भागात जून १९६६ साली कै. नामदेवराव जगताप यांनी 'विद्या विकास मंडळा'ची स्थापना करून उच्च शिक्षणाचे रोपटे लावले. या ऐतिहासिक घटनेला ५९ वर्षे पूर्ण झाली. संस्था सुवर्णमहोत्सवी झाली. या ५९ वर्षांच्या कालखंडामध्ये विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, शील आणि देशसेवेचे संस्कार करण्याचे ध्येय समोर ठेवून महाविद्यालय विकासाचा एक-एक टप्पा गाठत आहे. महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच संस्थेचा मानस आहे.

मा. प्राचार्य मिलिंद फंड हे विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष आहेत. गेल्या ३५ वर्षांपासून यशवंत परिवाराचे आधारस्तंभ मा. श्री. विलासराव घुमरे (सर) विद्या विकास मंडळाच्या सचिवपदाची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या लौकिकामध्ये भर घालणारे नावीन्यपूर्ण व समाजोपयोगी उपक्रम सातत्याने व यशस्वीपणे राबविले जात आहेत.

महाविद्यालयाची सुसज्ज इमारत, भव्य सभागृह, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुला रंगमच, भव्य क्रीडांगण, यशवंत व्यायामशाळा, समृद्ध ग्रंथालय, सर्व सोयी-सुविधांनी युक्त असलेले मुलींचे वसतिगृह, शुटिंग हॉल, अभ्यासिका, राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) व राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.) ही महाविद्यालयाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

महाविद्यालयात इ. ११ व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांसाठी माहिती व तंत्रज्ञान (आय. टी.) तसेच इ. ११ वी व १२ वी विज्ञान शाखेसाठी कॉम्प्युटर सायन्स व क्रॉप सायन्स या विषयांचे पर्याय उपलब्ध आहेत.

करमाळा तालुक्यातील विद्यार्थ्यांना एकाच छत्राखाली ११वी ते उच्च पदवी (बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., पीएच. डी.) पर्यंत बाहेर न जाता आपल्याच तालुक्यात शिक्षण घेणे सुलभ झाले आहे.

नविन शैक्षणिक धोरण (NEP 2020) अंमलबजावणी झाली असुन त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

महाविद्यालयात प्रशिक्षित अध्यापक वृंद व प्रशासकीय कर्मचारी वृंद कार्यरत व विद्यार्थ्यांसाठी तत्पर असतात.

कनिष्ठ विभाग व वरिष्ठ विभाग शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ विद्यार्थी प्रवेशित एकूण संख्या :

**कनिष्ठ विभाग**

| Class | Admission |
|---|---|
| XI Arts | 410 |
| XI Comm. | 235 |
| XI Sci. | 240 |
| XII Arts | 413 |
| XII Comm. | 231 |
| XII Sci. | 234 |
| **All Admission Total** | **1687** |

वरिष्ठ विभाग

| Class | Admission | Class | Admission |
|---|---|---|---|
| B. A. I | 354 | B. Sc. I | 120 |
| B. A. II | 237 | B. Sc. II | 63 |
| B. A. III | 91 | B. Sc. III | 39 |
| **Total** | **682** | **Total** | **222** |
| B. Com. I | 168 | M. A I Hindi | 0 |
| B. Com. II | 134 | M. A II Hindi | 3 |
| B. Com. III | 111 | M. A I Marathi | 3 |
| **Total** | **413** | **Total** | **6** |
| **All Admission Total** | | **1323** | |

**विद्यार्थी परीक्षा निकाल**

इयत्ता ११ वी ते उच्च पदवी (बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., पीएच. डी.) निकालाची देदीप्यमान उज्ज्वल यशाची परंपरा.

**विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील विविध सोयी-सुविधा**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर गरजा लक्षात घेऊनच संस्थेने पुढील शैक्षणिक सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

**ग्रंथालय**

कला, वाणिज्य व विज्ञान या विभागांसाठी सुसज्ज, सर्व सोयींनी युक्त व प्रशस्त असे ४८,२३४ ग्रंथसंख्या असलेले ग्रंथालय आहे. अभ्यासक्रमाची पुस्तके, संदर्भग्रंथ, ललित साहित्य, कथा, कादंबरी, नाटक व विद्यार्थ्यांना उपयुक्त अभ्यासक्रमाची क्रमिक पुस्तके तसेच क्रमिक पुस्तकांचे व प्रश्नपत्रिकांच्या पीडीएफ अशा विविध प्रकारच्या ग्रंथांनी व सोयीसुविधांनी ते समद्ध आहे.

**अभ्यासिका**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन तासांव्यतिरिक्त अभ्यासिकेमध्ये बसून मनसोक्त वाचन करता यावे म्हणून महाविद्यालयाने अभ्यासिकेची सोय केली आहे.

**भव्य क्रीडांगण (जिमखाना)**

सर्वप्रकारचे देशी तसेच टेबलटेनिस, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, क्रिकेट हे विदेशी खेळ या महाविद्यालयात खेळले जातात. यासाठी सुसज्ज अशा भव्य क्रीडांगणावर तालुका पातळी, जिल्हा पातळी व विद्यापीठ पातळीवरील स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. इनडोअर गेमसाठी भव्य शुटिंग हॉल उपलब्ध आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांत विद्यार्थी-विद्यार्थिनींना सामाजिक बांधीलकीची जाणीव

करून देण्यासाठी, सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश दिला जातो.

**राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.)**

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांत कला, वाणिज्य व विज्ञान विभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना सामाजिक बांधिलकी, देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक ऋण यांची जाणीव करून देण्यासाठी राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.) युनिट कार्यरत आहे. दरवर्षी यामध्ये एकूण १०७ विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवड केली जाते. एनसीसी युनिट हे तीन वर्षांचे असून बी अँड सी प्रमाणपत्र परीक्षा घेतल्या जातात. सदर परीक्षांचा दरवर्षी १०० टक्के निकाल लागत असून बी अँड सी प्रमाणपत्र मिळालेल्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना दरवर्षी आर्मी, पोलिस, एस. आर. पी., सी.बी.एस.मध्ये भरती होऊन नोकरीसाठी संधी गेल्या अनेक वर्षांपासून मिळत आहेत. महाविद्यालयामार्फत अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून प्रेरणा दिली जाते.

**क्रीडा विभाग**

आपल्या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांत कला, वाणिज्य व विज्ञान विभागांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना तालुकापातळी व जिल्हापातळीवर विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन विविध खेळांचे संघ क्रीडास्पर्धेसाठी विविध ठिकाणी जातात. तसेच क्रीडा विभागाच्या वतीने विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. तसेच या स्पर्धांची प्रशिक्षण शिबिरेही या महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केली जातात. या शिबिरातून विद्यापीठ संघ आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी होतात. विजयी होऊन आलेल्या संघाचा सत्कार व बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात केला जातो. यासाठी संस्थेचे सचिव मा. श्री. विलासराव घुमरे (सर) विद्यार्थ्यांना नेहमी प्रेरणा देतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्ती निर्माण होऊन विविध खेळांचा प्रचार व प्रसार होतो. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची व व्यायामाची आवड निर्माण होते.

- विद्यार्थ्यांसाठी यशवंत युवा मोत्सवात विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करुन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो.
- पदवी प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाची नियोजित विमा रक्कम महाविद्यालयात विद्यार्थ्याने भरल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याला अपघात विमा कव्हरेज मिळण्याची विमा कंपनीकडून सोय केली जाते.

**विद्यार्थी निवड**

१) दिल्ली येथील ध्वजारोहण समारंभाच्या आर. डी. परेडसाठी महाविद्यालयातील एन. सी. सी. कॅडेटची निवड होते. देशाचे मा. राष्ट्रपती व मा. पंतप्रधान यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात येतो.

२) स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी स्वतंत्र वर्ग चालवून मार्गदर्शन केले जात असल्यामुळे अनेक विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करतात.

३) विद्यापीठ परीक्षेत विद्यार्थी सुवर्णपदक मिळवितात.

४) ऑल इंडिया, इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत सहभाग
५) करिअर कट्टा
६) प्लेसमेंट सेल : आयसीआयसीआय बँक यांच्या कॅम्पस मुलाखतीतून विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

**सांस्कृतिक व साहित्यिक मंडळ**

महाविद्यालयात विविध विषयांची वाङ्मय मंडळे, प्रश्नमंच, भित्तिपत्रके, वादविवाद मंडळ, इ. विभाग प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रतिनिधी चालवितात. कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा, आरोग्य शिबिरे, वाणिज्य मंच व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन विद्यार्थीच करतात. यामधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. शिक्षणाबरोबर आविष्कार, स्वयंसिद्धा, बिझनेस स्टार्टअप असे विविध कार्यक्रम राबविले जातात. यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना विविध संधी उपलब्ध होतात.

**मुलींचे वसतिगृह**

महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थिनींना राहण्यासाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त, सुरक्षित व ग्रामीण भागातील मुलींना माफक फीमध्ये वसतिगृहात राहण्याची उत्तम सोय आहे. तसेच मुलींसाठी स्वतंत्र विश्रामकक्ष, इनडोअर जिम, आरओचे शुद्ध पिण्याचे पाणी, सॅनिटरी मशीन, एच.बी., आरोग्य तपासणी, इ. सोयी आहेत. कनिष्ठ विभाग ११वी व १२वी मधील सर्व विद्यार्थिनींना मोफत एस.टी. पास सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

**विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना**

१) ई. बी. सी. शिष्यवृत्ती (राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क)
२) ग्रामीण भागातील हुशार, होतकरू विद्यार्थ्यांना देण्यात येणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती
३) मागासवर्गीय शिष्यवृत्ती
४) अल्पसंख्याक समाजातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची मॅट्रिकेतर शिष्यवृत्ती योजना
५) दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती
* बी. सी. स्कॉलरशिप व इतर सर्व शिष्यवृत्त्यांचे प्रत्येक वर्षासाठी नूतनीकरण करावे लागते.

**महत्वाचे** : विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी शिष्यवृत्ती-बाबतची सर्व परिपत्रके वेळोवेळी नोटीस बोर्डवर लावली जातात. अधिक माहितीसाठी ती सर्व परिपत्रके विद्यार्थ्यांनी लक्षपूर्वक वाचून, समजून घ्यावीत व सूचनांनुसार वेळेवर कागदपत्रांची पूर्तता करण्यात यावी. परिपत्रकानुसार नियम व अटी लागू करण्यात येतात.

तसेच विद्यार्थी साहाय्यता निधीतून कमवा शिका योजना, शिक्षक पालकत्व योजना, गरजू विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी व परीक्षा फॉर्म फी भरण्यास शिक्षकांकडून आर्थिक मदत दिली जाते.

**महाविद्यालय विकास समिती (सीडीसी)** सभेत मान्यवर व सदस्यांमार्फत वेळोवेळी महाविद्यालयाच्या विकासासंदर्भात निर्णय घेतले जातात.

कार्यालयातील सर्व कर्मचारी उत्साहाने कार्यालयीन कामकाज व विद्यार्थ्यांना सहकार्य करतात.

अशा सर्व सोयींनी युक्त असणारे हे महाविद्यालय ग्रामीण भागात असून, महाविद्यालयाने शैक्षणिक दर्जातून उंची गाठली आहे. विद्या विकास मंडळांचे सचिव मा. श्री. विलासराव घुमरे सर, अध्यक्ष मा. प्राचार्य मिलिंद फंड सर, वरिष्ठ महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य लेफ्टनंट श्री. संभाजी किर्दाक व प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते निकालापर्यंत विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी तत्पर असतात. कार्यालयीन कर्मचारी विद्यार्थ्यांना सहकार्याची भूमिका ठेवून विद्यार्थ्यांचे कामकाज करतात.

**सौ. अनिता वसंतराव देशमुख**
एम. ए., बी. एड.

# मराठी विभाग

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये मराठी विभागाच्या वतीने खालील उपक्रम राबविण्यात आले :**

१) मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभ

२) वाचन संकल्प महाराष्ट्र अंतर्गत प्रा. सुरेश शिंदे यांचे व्याख्यान.

३) कवी कुसुमाग्रज जन्मदिन **'मराठी भाषा गौरव दिन'** म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी 'माझी मराठी स्वाक्षरी उपक्रम' तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'भाषा गौरव दिना' निमित्त आपले विचार व्यक्त केले. तसेच 'मराठी भाषेची गरज' यावर प्रा. डॉ. वंदना भाग्यवंत यांनी व्याख्यान दिले. (दि. २७ फेब्रुवारी, २०२५)

४) पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्यावतीने **'२००० नंतरची ग्रामीण कविता'** या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. (दि. १० फेब्रुवारी, २०२५)

५) मराठी विभागाच्या वतीने महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी **'महात्मा फुले : जीवन व कार्य'** या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

६) मराठी विभागाच्या वतीने **'जीवन सुंदर आहे'** या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

७) महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने भित्तिपत्रकाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आहे. यावेळी विश्वंभर लांडगे यांसह मराठी विभागाचे विद्यार्थी, मराठी विभागप्रमुख प्रा. नितीन तळपाडे, प्रा. डॉ. वंदना भाग्यवंत तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

८) मराठी विभागाच्या वतीने हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये मराठीसह इतर विभागांतील विद्यार्थ्यांनी ही सहभाग नोंदविला होता.

**प्रा. नितीन तळपाडे**

मराठी विभाग

# इतिहास विभाग

**इतिहास विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ मध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रम :**

१) शिवराज्याभिषेक दिनानिमित्त भित्तीपत्रक उपक्रम

२) विद्यार्थी स्वागत समारंभ

३) आहिल्याबाई होळकर स्मृतिदिन

४) शिक्षक दिन

५) जागतिक पर्यटन दिन

६) इतिहास भित्तिपत्रक उद्‌घाटन

७) ग्रंथालय भेट

८) शैक्षणिक सहल

९) सेमिनार

१०) करमाळा तालुक्यातील स्थानिक इतिहासाचे विद्यार्थ्यांकडून संकलन

११) विद्यार्थ्यांचे वाढदिवस

१२) महापुरुष व कर्तुत्त्ववान स्त्रिया यांच्या जयंती व स्मृति दिनानिमित्त अभिवादन

१३) सिंधु संस्कृती लिपी, फोटो व माहिती असे प्राचीन काळातील विषयांची माहिती दिली.

१४) पारंपारिक वेशभुषा

१५) विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन

१६) निरोप समारंभ

**प्रा. सरला चव्हाण**

इतिहास विभाग

# अंतर्गत तक्रार निवारण समिती (ICC)

**सन २०२४-२०२५ मध्ये अंतर्गत तक्रार निवारण समितीतर्फे खालील उपक्रम राबविण्यात आले :**

१) डॉ. कविता कांबळे यांचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ रोजी महिलांच्या "PCOS" या आजारावर व्याख्यान संपन्न झाले.

२) प्रा. डॉ. मुक्ता काठवटे यांचे दि. ८ मार्च, २०२५ रोजी 'समाजातील महिलांची स्थिती आणि आव्हाने' या विषयावर जागतिक महिला दिनानिमित्त व्याख्यान संपन्न.

**प्रा. सरला चव्हाण**

# भूगोल विभाग

**शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये भूगोल विभागांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले :**

१) भूगोल तज्ज्ञांची जयंती साजरी करण्यात आली.

२) **'जागातिक ओझोन'** दिनानिमित्त प्रा. जगताप महेश यांचे व्याख्यान घेण्यात आले.

३) जागतिक पर्यटन दिनानिमित्त प्रा. उत्तम विटुकडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

४) भूगोल दिनानिमित भित्तिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले.

५) विद्यार्थ्यांचे सेमिनार, चार्चासत्रे घेतली.

६) मौजे वांगी नं. १ येथे ग्रामसर्वेक्षण करण्यात आले.

७) प्रतापगड, महाबळेश्वर येथे अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात आले होते.

८) विभागातील प्राध्यापकांचा राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग, पेपरवाचन व संशोधन पेपेर प्रसिद्ध झाले.

९) विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले.

१०) भूगोल विभागातील एका विद्यार्थ्याची 'महाराष्ट्र पोलीस' म्हणून निवड.

११) बी. ए. भाग-३ मधील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

इ. उपक्रम राबविण्यात आले.

**प्रा. डॉ. विजया गायकवाड**

# अर्थशास्त्र विभाग

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये अर्थशास्त्र विभागात पुढीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आले :**

१) अर्थशास्त्र विभागात नियमितपणे विद्यार्थी सेमिनार, चर्चासत्र, भित्तिपत्रक, बजेट चर्चा घेतली.

२) मौजे चोंडी या ठिकाणी शैक्षणिक सहल आयोजित केली.

३) कु. काजल गायकवाड हिने पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अर्थशास्त्र विषयात प्रथम क्रमांक व सुवर्णपदक मिळविले.

४) एक दिवसीय ऑनलाइन आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले (झाडबुके महाविद्यालय, बार्शी) MOU

५) कृषी भेट - मौजे चापडगाव, ता. कर्जत, जिल्हा. अहिल्यानगर

६) मा. विलासरावजी घुमरे सर यांच्या वाढदिवसानिमित्त इकॉनॉमिक्स फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात आले.

७) भित्तिपत्रक उद्‌घाटन मा. प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

८) आ. विचारवंत व थोर महापुरुष यांच्या जयंती, पुण्यतिथी तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांचे वाढदिवस साजरे करण्यात आले.

९) प्रा. कांबळे कृष्णा बुवाजी (अर्थशास्त्र विभागप्रमुख) यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेत पेपर वाचन केले.

१०) प्रा. कांबळे कृष्णा व डॉ. करपे अंकुश यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन नॅशनल एज्युकेशन अवॉर्डने सन्मानित.

११) आविष्कार २०२४ - कु. सायली नीळ हिने सहभाग घेऊन संशोधन पेपर सादर केला.

**प्रा. कृष्णा कांबळे**
अर्थशास्त्र विभाग

# एन. सी. सी. विभाग

महाविद्यालयातील एन. सी. सी. हा एक महत्त्वाचा विभाग असून याची स्थापना १ जून, १९७१ रोजी झाली आहे. महाविद्यालयात एन. सी. सी. विभागाची एकूण संख्या १०७ असून त्यापैकी ३५ मुली व ७२ मुले आहेत. **'एकता व अनुशासन'** हे एन. सी. सी.चे बोधवाक्य आहे. प्रत्येक वर्षी एन. सी. सी.मधून कित्येक मुले व मूली पोलीस व आर्मीमध्ये भरती होतात. त्याप्रमाणे यावर्षीही म्हणजेच २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षात ६ मुले अग्निवीरमध्ये,१ मुलगा **सी. आर. पी. एफ.** मध्ये, तसेच २ मुली व ३ मुले पोलीसमध्ये भरती झाली आहेत. म्हणूनच एन. सी. सी. हा कॉलेजचा आत्माच समजला जातो. कॅप्टन डॉ. विजया गायकवाड व **CTO** प्रा. राम काळे हे एनसीसीचे समन्वयक आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एनसीसी विभागांतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले आहेत.

१) सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, उदा. सार्वजनिक बागा, महापुरुषांचे पुतळे, इ.
२) कॉलेज कॅम्पसची स्वच्छता
३) रक्तदान शिबिराचे आयोजन
४) **'हर घर तिरंगा'** अंतर्गत विविध उपक्रम, रॅली
५) आंतरराष्ट्रीय योगा डे
६) कारगील विजय दिवस
७) तिरंगा प्रतिज्ञा
८) **AO & CO** सर यांची महाविद्यालयाच्या एनसीसी विभागास भेट व कॅडेटस्ना मार्गदर्शन.
९) **B & C** सर्टिफिकेटची पूर्वतयारी

इ. कार्यक्रम एनसीसी विभागातर्फे राबविण्यात आले.

**कॅप्टन विजया गायकवाड**
एन. सी. सी. विभागप्रमुख

# सांस्कृतिक विभाग

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने खालील उपक्रम राबविण्यात आले :**

१) सांस्कृतिक विभागाच्या वतीने महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

२) महाविद्यालयातील वरिष्ठ विभागातील प्राध्यापकांचे वाढदिवस साजरे करण्यात आले.

३) पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व लोकमंगल उद्योगसमूहाच्या वतीने वडाळा येथे आयोजित युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रांगोळी, मेहंदी, कथाकथन, काव्यवाचन या कलाप्रकारांत सहभाग घेतला.

४) विद्या विकास मंडळाचे सचिव मा. विलासराव घुमरे सर यांच्या वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वैयक्तिक नृत्य, समूहनृत्य तसेच विविध कलाप्रकारांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

५) सांस्कृतिक विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती.

६) महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**निबंध सर्धेतील विजेते खालीलप्रमाणे :**

**प्रथम क्रमांक :** अबुतालीब शेख - बी. ए. भाग ३

**द्वितीय क्रमांक :** समाधान दामोदरे - बी. ए. भाग ३

**तृतीय क्रमांक :** तेजस्विनी मंडलीक - बी. ए. भाग ३

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

ह्या स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्याकामी प्रा. सरला चव्हाण, प्रा. सुधीर मुळीक यांनी विशेष परिश्रम घेतले.

**प्रा. नितीन तळपाडे**
सांस्कृतिक विभाग

# वाणिज्य विभाग

**वाणिज्य विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ते खालीलप्रमाणे :**

१) वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी **Income Tax & GST** यांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी **C. A.** लहू काळे यांचे मार्गदर्शन कार्यशाळा दि. १० जून, २०२४ रोजी आयोजीत केला.

२) विद्यार्थ्यांसाठी **'विमा व शेअर बाजार'** या विषयावर प्रा. आर. एस. रोडगे यांचे मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

३) विभागातील विद्यार्थ्यांसाठी बँकिंग व स्पर्धा परीक्षा या विषयावर बँक ऑफ इंडियामधील श्री. अविनाश थोरात यांचा मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला.

४) राष्ट्रीय सेवा योजना (NSS)च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधीलकी जपली आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान दिले.

५) विभागातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग घेतले आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.

६) विभागातील बी. कॉम. भाग ३ च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी आयोजित केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. एल. बी. पाटील सर यांनी भूषविले. या कार्यक्रमाला बी. कॉम. भाग १ व २ चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रा. डॉ. विजयराव बिले**

वाणिज्य विभाग

# Department of Physical Education & Sport Report

## YASHWANRAO CHAVAN MAHAVIDYALAY KARMALA, DIST-SOLAPUR
## ACADEMIC YEAR 2024-25
## DEPARTMENT OF PHYSICAL EDUCATION & SPORT- REPORT

| Sr. No. | Date | Event | Venue | Level | Stuent Name | Present Class | Acheivement |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 04-10-2024 | Kabaddi (Men) | Y.C.M. Karmala | Inter Colleigate | Mauli Arjun Kandekar | B.A.II | Participation |
| | | | | | Sagar Siddheshwar Bhere | B.A.II | |
| | | | | | Rohit ShankarBhere | B.Sc.II | |
| | | | | | Jayesh Yogesh Thombare | B.Sc.II | |
| | | | | | Vikram Mahadev Raut | B.A.II | |
| | | | | | Abhiman Somnath Patil | B.Com.II | |
| | | | | | Ravsaheb Bharat Ghavane | B.A.I | |
| | | | | | Suraj Vikas Markad | B.A.I | |
| | | | | | Somnath Hanumant Naiknavare | B.Com.I | |
| | | | | | Sidhheshwar Rama Salunkhe | B.A.I | |
| 2 | 04-10-2024 | Kabaddi (Men) | Y.C.M. Karmala | Inter Colleigate (Selection Trail) | Payal Bharat Pore | B.A.I | Selected for West Zone Inter University Kabaddi Tournament |
| | | | | | Pallavi Dattatray Survase | B.A.II | Participation |
| | | | | | Supriya Ajinath Shinde | B.A.I | Participation |
| 3 | 17-Oct-24 to 19-Oct-24 | **Athletics (Men)** | Shri. Sushilkumar Shinde College of Physical Education,Solapur | Inter Colleigate | | | Participation |
| | | 800M | | | Shivam Sachin Zade | B.Com - I | |
| | | 100M,4X100M Relay | | | Dnyanraj Parmeshwar Shingare | B.A. - I | |
| | | 800M, 4x100M Relay | | | Gaurav Gorakh Labade | B.Sc.-I | |
| | | 100M,4X400M Relay | | | Jayesh Yogesh Thombre | B.A.-II | |
| | | 200M,4x100M Relay | | | Shambhuraje Shivaji Mane | B.A.-III | |
| | | 110M Hurdle,4X100M Relay | | | Digambar Sanjay Shelar | B.A.-II | |
| | | 5000M | | | Vinayak Balashaeb Todkar | B.A.-II | |
| | | 1500M | | | Aditya Narayan Kshirsagar | B.A.-I | |
| | | 110M Hurdle, Long Jump | | | Ranjeet Anna Pawar | B.A.-I | |
| | | 400M,4x400M Relay | | | Raju Prakash Pandharkar | B.A.-I | |
| | | 400M,4x400M Relay | | | Abhijeet Bapu Pandharkar | B.A.-I | |
| | | 200M,4x400M Relay | | | Vinayak Subhash Meher | B.Sc.-I | |
| | | 5000M, 10000M | | | Ritesh Kakasaheb Pawar | B.A.-II | |
| | | **Athletics (Women)** | | | | | |
| | | 1500M, 400M | | | Shital Baburam Rao | B.A.I | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 17-Oct-24 to 19-Oct-24 | Shotput, Hammer Throw | Shri. Sushilkumar Shinde College of Physical Education,Solapur | Inter Colleigate | Afrin Samir Mujawar | B.A.I | Participation |
| | | 100M, Long Jump | | | Supriya Ajinath Shinde | B.A.I | |
| | | 400M, Long Jump | | | Payal Bharat Pore | B.A.I | |
| | | 800M, 4x100M Relay | | | Vrushali Manohar Gatkul | B.A.II | |
| | | 200M, 4x100M Relay | | | Kajal Vijay Gawade | B.Com.II | |
| | | 100M, 400M, 4x100M | | | Shweta Laxman Dalvi | B.A.I | |
| 5 | 19-Oct-24 | Fencing (Men) Foil | Sangameshwar Ratra Mahavidyalay, Solpaur | Inter Colleigate | Alok Dilip Mishra | B.Sc.-III | Achieve 3rd Rank & Selected for All India Inter University Fencing Tournament |
| 6 | 19-Oct-24 | Fencing (Women) Epee | Sangameshwar Ratra Mahavidyalay, Solpaur | Inter Colleigate | Vaishnavi Laxman Dalvi | B.A.-II | Achieve 2nd Rank & Selected for All India Inter University Fencing Tournament |
| | | | | | Shweta Laxman Dalvi | B.A.-I | Achieve 1st Rank & Selected for All India Inter University Fencing Tournament |
| 7 | 28-Oct-24 | Athlectics(Men) Cross Country | Mauli Mahavidyalay, Vadala | Inter Colleigate | Ritesh Kakasaheb Pawar | B.A.-II | Participation |
| 8 | 12-Nov-24 | Judo (Men) | K.N.B.K. Arts, Comm. & Vinayakrao Patil Science College | Inter Colleigate | Natha Yuvraj Palve | B.A. I | Participation |
| 9 | 28-Nov-24 | Yoga (Men) | Uma Mahavidyalay, Pandharpur | Inter Colleigate | Goraksh Natha Londhe | B.Sc.-I | Participation |
| 10 | 30-Nov-24 | Football (Men) Selection Trail | H.N.C.C. Solapur | Inter Colleigate | Digambar Sanjay Shelar | B.A.-II | Participation |
| | | | | | Prasad Dagadu Kokane | B.Com.-III | |
| | | | | | Amir Yakub Pathan | B.A.-I | |
| | | | | | Shubham Santosh Mane | B.A.-II | |
| | | | | | Shivraj Pappu Lashkar | B.A.-II | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 03-Dec-24 | Mallakhamb (Men) | K.N.B.K. Arts, Comm. & Vinayakrao Patil Science College | Inter Colleigate | Goraksh Natha Londhe | B.Sc.-I | Achieve 2nd Rank & Selected for All India Inter University Mallkhamb Tournament |
| 12 | 12-Dec-24 | Wrestling (Men) Free Style | K.N.B.K. Arts, Comm. & Vinayakrao Patil Science College | Inter Colleigate | Rohit Mahadev Randive | B.A.-I | Participation |
| 13 | 12-Dec-24 | Wrestling (Women)Free Style | K.N.B.K. Arts, Comm. & Vinayakrao Patil Science College | Inter Colleigate | Ashlesha Kalyan Bagade | B.A.-II | Achieve 1st Rank & Selected for All India Inter University Wrestling Tournament |
| 14 | 13-Dec-24 | Wrestling (Men) Greco | K.N.B.K. Arts, Comm. & Vinayakrao Patil Science College | Inter Colleigate | Natha Yuvraj Palve | B.A. I | Participation |
| 15 | 15-Dec-24 | Bodybuilding (Men) | Shankarrao Mohite Mahavidyalay, Akluj | Inter Colleigate | Laxman Dattatray More<br>Sagar Tanaji Jagtap | B.A.-II<br>B.A.-I | Participation |
| 16 | 06-Nov-24 to 10 Nov-24 | Fencing (Men & Women) | University of Jammu | All India Inter university Fencing Competition | Alok Dilip Mishra<br>Vaishnavi Laxman Dalvi<br>Shweta Laxman Dalvi | B.Sc.-III<br>B.A.-II<br>B.A.-I | Participation |
| 17 | 05-Jan-25 to 08 Jan 25 | Mallakhamb (Men & Women) | L.N.C.T. University Bhopal (M.P.) | All India Inter university Mallakhamb Competition | Goraksh Natha Londhe | B.Sc.-I | Participation |
| 18 | 14Jan-25 to 17Jan-25 | Wrestling (Men & Women) | Guru Kashi University Bathinda, Punjab | All India Inter university Wrestling Competition | Ashlesha Kalyan Bagade | B.A.-II | Achieve 2nd Rank in All India Inter university Wrestling Competition |

**Prof. Ram Kale**
Dept. of Sport Head

# ग्रंथालय विभाग

## शै. व. २०२४–२५

**महाविद्यालयातील शिक्षणामध्ये ग्रंथालयाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रंथालयात माहितीचे संकलन संग्रहण व वितरण केल्या जाते. त्या दृष्टीने ग्रंथालय अध्ययन, अध्यापन व संशोधनाच्या प्रक्रियेमध्ये अत्यंत मोलाचे योगदान देत आहे.**

**ग्रंथ संग्रह**

ग्रंथालयात क्रमिक व संदर्भ ग्रंथ सुमारे ४७,४९४ एवढे असून हा ग्रंथ संग्रह वेगवेगळ्या विषयावर आधारित आहेत.

**नियतकालिके**

ग्रंथालयात विषयांशी संबंधित व अद्ययावत माहितीने परिपूर्ण अशी २४ नियतकालिके येतात. त्याचा विद्यार्थ्यांनी व शिक्षकांना चांगला फायदा होतो. तसेच सहा वर्तमानपत्र वाचण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रंथालयाद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा**

**१. वाचन कक्ष :** ग्रंथालयात शिक्षक व विद्यार्थ्यांनी यांच्यासाठी स्वतंत्र वाचन कक्ष असून त्यांचा लाभ सर्व वाचक घेतात.

**२. प्रचलित जागरूकता सेवा :** ग्रंथालयात नव्याने उपलब्ध झालेल्या साहित्याची सूचना या सेवेद्वारा दिली जाते.

**३. इंटरनेट :** ग्रंथालयाद्वारे विद्यार्थ्यांनी व शिक्षकांसाठी इंटरनेट सेवा विनामूल्य दिल्या जाते. याचा लाभ शिक्षक व विद्यार्थ्यांनी घेतात.

**४. एन लिस्ट प्रोग्राम :** INFLIBNET अहमदाबाद यांनी सुरू केलेल्या एनलिस्ट प्रोग्राम या सेवेचे आमचे महाविद्यालय सभासद असून, याद्वारे ७५००० ई-बुक्स व ३३०० ऑनलाईन सर्च करता येतात. याचा लाभ शिक्षक व विद्यार्थ्यांना होतो.

**५. ग्रंथालय संगणक प्रणाली :** मागील सात वर्षांपासून ग्रंथालयीन सेवा संगणकाद्वारे दिल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने सर्कुलेशन, रिपोर्ट जनरेशन व सर्च ओपॅक (ऑनलाईन पब्लिक एक्सेस कॅटलॉग) यांसारख्या महत्त्वपूर्ण सेवांचा उल्लेख करता येईल.

**६. वर्तमानपत्र कात्रण :** वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेले अभ्यासक्रम विषयक माहितीपर लेख, तसेच महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या बातम्या, इत्यादी सूचना फलकावर प्रदर्शित केल्या जातात.

**७. इतर साहित्य :** विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या ५७५ पुस्तकांचा संग्रह ग्रंथालयात उपलब्ध आहे.

**८. ग्रंथेत्तेर साहित्य :** ग्रंथालयात २२ सीडी व डीव्हीडी तसेच ऑडिओ कॅसेट संग्रही आहेत.

**९. संदर्भ ग्रंथ :** ग्रंथालयात सुमारे ५८५ संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. यामध्ये शब्दकोश विविध विषयांचे ज्ञानकोश भौगोलिक संदर्भ साधने उपलब्ध आहेत. सदर साहित्याचा उपयोग विशिष्ट विषयाची विस्तृत माहिती मिळवण्यासाठी होत असतो.

**डॉ. एस. एस. रामटेके**
**ग्रंथपाल**

# इंग्रजी विभाग

**Report of academic year 2024-2025**

## Report on Online Speech by Prof. Gautam Kharat on Shakespearean Sonnets

An insightful online lecture was delivered by **Prof. Gautam Kharat**, an esteemed professor, on **19th December, 2024** for the students of **Dada Patil Mahavidyalaya, Karjat.** The session focused on the theme of **Shakespearean Sonnets**, aiming to introduce and familiarize students with the richness and literary significance of this poetic form.

Prof. Kharat began the session by providing a brief background on **William Shakespeare**, highlighting his immense contribution to English literature. He then introduced the structure and thematic essence of Shakespearean sonnets, explaining their unique **14-line format.**

The speaker further elaborated on the central themes explored in the sonnets, such as **love, beauty, time, and mortality,** using examples from some of Shakespeare's most well-known sonnets like **Sonnet 18 ('Shall I compare thee to a summer's day?')** and **Sonnet 116 ('Let me not to the marriage of true minds')**. Prof. Kharat's engaging presentation style and in-depth analysis helped students appreciate the emotional depth and poetic craft of the sonnets.

The session proved to be highly enriching for literature students, offering them a valuable academic experience and deepening their understanding of one of the most celebrated poetic forms in English literature.

The faculty and students of Dada Patil Mahavidyalaya expressed their gratitude to Prof. Gautam Kharat for his time and efforts in making the session both informative and inspiring.

**Report on the**
**Essay Writing Workshop**

**Date :** 28th March 2025

A workshop on **"How to Write an Essay"** was organized for students on 28th March 2025. The session aimed to enhance the writing skills of students, with a special focus on structuring essays effectively, presenting arguments logically, and developing a strong command over language and grammar.

The workshop was conducted under the guidance of **Prof. Dhere**, an experienced teacher known for his expertise in language and writing. He engaged the students with insightful tips and techniques on how to write impactful essays, emphasizing the importance of a clear introduction, coherent body paragraphs, and a strong conclusion.

During the session, students were introduced to different types of essays such as narrative, descriptive, argumentative, and expository. Prof. Dhere also discussed common mistakes to avoid, ways to improve vocabulary, and how to make essays more engaging and informative.

An interactive Q&A session followed the lecture, where students actively participated and cleared their doubts.

## Report on the Speech by Prof. S. D. Mulik on English Language Day

**Date :** 23rd April 2025

**Venue :** Pratapsinh Mohite-Patil College

On the occasion of **English Language Day**, celebrated on **23rd April 2025, Prof. S. D. Mulik** was invited as the **Resource Person** at **Pratapsinh Mohite-Patil College.** The event was organized to mark the global significance of the English language and to honor the legacy of **William Shakespeare**, whose birth and death anniversaries both fall on this date.

Prof. S. D. Mulik delivered an enlightening and engaging speech, focusing on the importance of the English language in today's world. He emphasized how English serves as a global medium of communication and plays a vital role in academic, professional, and social spheres. He encouraged students to develop proficiency in English to access vast knowledge resources, enhance career opportunities, and participate effectively in a globalized world.

Furthermore, Prof. Mulik provided a brief yet insightful biography of William Shakespeare, the greatest dramatist and poet in the English language. He highlighted Shakespeare's immense contribution to literature through his timeless plays and sonnets, which continue to influence writers and readers across the globe. Prof. Mulik shared interesting facts about Shakespeare's life, his creative genius, and the universal appeal of his works.

## Report on the Online Speech by Prof. Dr. Anant Hipperkar on William Shakespeare's Birth Anniversary

**Date of Event :** 23 April, 2025

**Occasion :** Birth Anniversary of William Shakespeare

**Speaker :** Prof. Dr. Anant Hipperkar, Dada Patil Mahavidyalaya, Karjat, Ahmednagar District

**Mode :** Online Webinar

On April 23, 2025, Dada Patil Mahavidyalaya, Karjat, commemorated the birth anniversary of William Shakespeare by organizing an online speech delivered by Prof. Dr. Anant Hipperkar. The event aimed to enlighten students about the life and works of the eminent playwright and poet.

Prof. Dr. Hipperkar provided an in-depth exploration of William Shakespeare's life, delving into his early years, literary journey, and enduring impact on English literature. He discussed Shakespeare's humble beginnings in Stratford-upon-Avon, his prolific writing career, and his contributions to the English language and drama.

The lecture emphasized the universality of themes in Shakespeare's works, such as love, power, jealousy, betrayal, and the human condition. Prof. Dr. Hipperkar highlighted how these themes continue to resonate with audiences today, making Shakespeare's plays timeless masterpieces.

Additionally, the speech covered Shakespeare's influence on modern literature and theater, noting how his storytelling techniques and character development have set benchmarks for writers and dramatists worldwide.

**Prof. Abhimnu Mane**

English Dept. Head

# विज्ञान विभाग

## शै. व. २०२४–२५ अहवाल

**विद्या विकास मंडळाचे सचिव आदरणीय विलासरावजी घुमरे सर यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेतील पदवी शिक्षणासाठी इतरत्र जावे लागू नये, या उद्देशाने २०१७ - २०१८ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयात बी. एस्सी. विभाग सुरू करण्यात आला. सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला व भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित व वनस्पतीशास्त्र, या विभागांची मान्यता मिळाली.**

१) चालू शैक्षणिक वर्षामध्ये बी.एस्सी. भाग एक १२० विद्यार्थी, बी.एस्सी. भाग दोन ६२ विद्यार्थी व बी.एस्सी. भाग तीन मध्ये ३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

२) महाविद्यालयामध्ये पुरेशा भौतिक सुविधांबरोबरच स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा असून विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक व संशोधक वृत्ती विकसित करण्यावर सर्व शिक्षकांचा भर असतो.

३) याच जाणीवेतून '**अविष्कार**' सारख्या संशोधन स्पर्धेमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी विज्ञान विभाग प्रयत्नशील आहे.

४) चालू शैक्षणिक वर्षातील विज्ञान मंडळाचे उद्घाटन यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष व मायक्रोबायोलॉजिस्टस् सोसायटी ऑफ इंडियाचे प्रा. गणेश करे-पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी मूलभूत विज्ञानातील संशोधन व करिअरच्या संधीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

५) तसेच चालू शैक्षणिक वर्षापासून विज्ञान विषयात विद्यापीठ पातळीवर प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास संस्थेच्या वतीने विशेष पारितोषिकांची घोषणा केली.

६) दरवर्षीप्रमाणे विद्यापीठ परीक्षांच्या निकालामध्ये विज्ञान विभागाची उत्कृष्ट कामगिरी सातत्यपूर्ण होताना दिसते.

७) अतिशय कमी कालावधीमध्ये व संस्थेचे सचिव आ. विलासरावजी घुमरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विभागाची प्रगती होत आहे ही सर्वांच्या दृष्टीने आनंदाची व अभिमानाची बाब आहे.

**प्रा. व्ही. एस. शिंदे**
समन्वयक विज्ञान विभाग

# हिंदी विभाग

**शैक्षणिक साल २०२४-२०२५ मे हिंदी विभाग द्वारा निम्न उपलब्धियाँ :**

१) समय समय पर विभागा द्वारा विभिन्न लेखक, कवियों के जन्मदिन एवं पुण्यस्मरण मनाये गए ।

२) प्रा. डॉ. सुनिल बनसोडे (टी. सी. महाविद्यालय, बारामती) का व्याख्यान आयोजित किया गया ।

३) हिंदी दिन के उपलभ्य मे विविध प्रतियोगिताओं का आयोजन करके अंत मे डॉ. बाबासाहेब आम्बेडकर माहाविद्यालय पुणे (औंध) की अध्यापिका एवं हमारी पुर्व छात्रा कु. प्रा. डॉ. कु. स्वाती चव्हाण जी का व्याख्यान आयोजित किया गया ।

४) पुरेवर्ष में दो आर. ए. सी. बैठक का आयोजन किया गया ।

५) डॉ. विनायक खयमल एवं डॉ. साळुंखे जी के विभिन्न लेख प्रकाशित हुए ।

६) डॉ. अनिल साळुंखे जी ने विविध संगोष्ठीयाँ एवं इंटरनॅशनल संगोष्ठीयों मे अध्यक्ष, पेपर वाचक एवं विषय प्रवर्तक रुप मे काम किया ।

७) हिंदी अनुसंधान की छात्रा कु. पल्ला का स्पायरल बायडींग पी.एच. डी. उपाधि हेतु विश्व विद्यालय में जमा किया गया।

८) हिंदी अनुसंधान के माध्यम से पी.एच. डी. करने वाले छात्रों को समय समय पर मार्गदर्शन किया गया ।

९) बी. ए. भाग तीन के छात्रों को अध्यापन शाला के लिए राजी कर उनके आवेदन पर केंन्द्रीय हिंदी निर्देशालय, दिल्ली भेज दिया ।

१०) बी. ए. भाग तीन के छात्रों को ग्रंथालय भेंट, बँक, पोस्ट, तथा एल. आय. सी. कार्यालयों से भेट करवाई ।

**प्रा. डॉ. अनिल साळुंखे**
**हिंदी विभाग**

# एन. एस. एस. विभाग

**Report on NSS Regular activities**

1. Environment Awareness, Tree Preservation and Plantation. A special programme focusing on Environment Awareness, Tree Preservation and Plantation was held on 25th July 2024 at Yashavantrao Chavan Mahavidyalaya, Karamala. The event was presided over by Principal L. B. Patil, and the keynote address was delivered by Dr . Malik Rokade.

2. Oath-Taking Programme about Not to Use of Abusive Language An oath-taking programme promoting respectful and non-abusive language was organized on 4th December 2024 in front of Yashawantrao Chavan Mahavidyalaya. The event aimed to instill a sense of responsibility and discipline among students, encouraging them to refrain from using abusive words in any context.

The programme commenced with an introductory speech by Prof. P. D. Shete, the NSS Programme Officer, who highlighted the importance of respectful communication and the role of youth in building a positive social environment. Following the introduction, Prof. K. B. Kamble led the students in taking the oath, affirming their commitment to avoid the use of abusive or harmful

**3. Blood Donation Camp Report** – 05/02/2025 A blood donation camp was organized by the NSS (National Service Scheme) and NCC **(National Cadet Corps)** departments of Yashawantrao Chavan Mahavidyalaya on 5th February, 2025. This initiative was held to commemorate the birthday of Honorable Vilasraoji Ghumare, the respected Secretary of Vidya Vikas Mandal. There was enthusiastic participation from NSS and NCC students, college staff, and local citizens. The collective effort resulted in the successful donation of 85 pouches of blood, which will significantly aid to the need for blood during emergencies.

**N.S.S. Special Camp detailed report.**

The National Service Scheme (NSS) Inauguration Ceremony was held on Tuesday, 11th February 2025 at Pothare Village. The event was graced by the auspicious presence of Mrs. Shilpa Thokade, Tahshildar of Karmala, who inaugurated the program and shared her enriching experiences with NSS, inspiring the volunteers with her words.

The inauguration program was presided over by Mr. Vilasrao Ghumare, who addressed the NSS volunteers and emphasized the importance of social responsibility and active community involvement. Mr. Ganeshbhau Kare Patil was the Chief Guest for the occasion and extended his best wishes to the volunteers.

On 12th February 2025, NSS volunteers conducted a community service activity at the Pothare village bus stand. The volunteers diligently engaged in a cleanliness drive by sweeping the entire bus stand area. As part of the waste management initiative, all collected plastic waste was responsibly disposed of through controlled burning.

On the morning of 13th February 2025, NSS volunteers actively participated in a cleanliness drive at the Shani Temple. The volunteers diligently cleaned the temple yard, collected all the garbage, and responsibly disposed of it by burning.

On the morning of Thursday, 14th February 2025, NSS volunteers carried out a cleanliness drive in Pothare. During this activity, the volunteers diligently cleaned the roads and collected all plastic waste, which was later responsibly disposed of by burning.

On the morning of Friday, 15th February 2025, the NSS volunteers organized a Hemoglobin (HB) and Thyroid check-up camp. The initiative aimed to promote health awareness among villagers and volunteers. A total of 50 people availed themselves of the health check-up facilities and benefited from the camp.

On the morning of 16th February 2025 (Saturday), NSS volunteers undertook a cleanliness drive at the **Z. P. School, Pothare**. They diligently cleaned the school grounds and its surroundings, contributing to a healthier and more hygienic environment.

The NSS unit of Yashwantrao Chavan Mahavidyalaya successfully concluded its NSS Special Camp with a valedictory program held on 17th February, 2025. The chief guest for the event, **Adv. Baburao Hirade**, addressed the NSS volunteers, applauding their dedication, discipline, and selfless service towards society. He emphasized the importance of youth involvement in community development and encouraged the volunteers to continue their good work beyond the camp.

**Prof. Sudhir Mulik**
**NSS Program Officer**

# अविस्मरणीय क्षण



अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थिनी
कु. काजल सौदागर गायकवाड
पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठात अर्थशास्त्र
विषयात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सुवर्णपदक




निबंध लेखन या विषयावर
प्रा. अक्षय ढेरे यांचे मार्गदर्शन



चि. शिवम चिखले याची धनुर्विद्येमध्ये देशात
प्रथम क्रमांक आल्याबद्दल संस्थेचे
सचिव मा श्री. विलासरावजी घुमरे (सर)
यांच्या हस्ते सन्मान समवेत इतर मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तर मधील
दोन विद्यार्थिनींची
हरियाणा शिबीरामध्ये निवड



मौजे उंदरगाव येथील एन. एस. एस.
श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन प्रसंगी
मा. श्री. विलासरावजी घुमरे (सर)
समवेत इतर मान्यवर .



संस्थापक अध्यक्ष कै. नामदेवरावजी जगताप व
राजर्षी शाहु महाराज यांची पुण्यतिथी साजरी
याप्रसंगी विद्या विकास मंडळाचे सचिव आदरणीय
श्री. विलासरावजी घुमरे सर, संस्थेचे विश्वस्त
ॲड. विक्रांत (भैय्या) घुमरे, प्राचार्य, उपप्राचार्य .

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय











## • महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये •

• स्वतःच्या मालकीची भव्य आकर्षक व निसर्गरम्य सर्वसोयींनी युक्त परिपूर्ण इमारत. • सर्व सुविधांनीयुक्त मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह • पीकशास्त्र (CROP SCIENCE), संगणक शास्त्र (COMPUTER SCIENCE) व माहिती तंत्रज्ञान (IT) विषय उपलब्ध • सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय व संगणक प्रयोग शाळेची सोय • JEE, NEET, MHT-CET, NDA प्रवेश परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन करणारी तालुक्यातील एकमेव संस्था • वैयक्तिक मार्गदर्शन व मोफत जादा तासांची सोय • अनुभवी, तज्ञ व विद्यार्थी हितचिंतक असा प्राध्यापक वर्ग • मेडिकल व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा मार्गदर्शन वर्गाची सोय • भव्य क्रीडांगण, व्यायामशाळा व देशी-विदेशी खेळांची सोय • राष्ट्रीय छात्र सेना (एन्.सी.सी.) मुला-मुलींसाठी • राष्ट्रीय सेवा योजना (एन्.एस्.एस्.) कमवा व शिका योजना • मागास विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व आर्थिक सवलती, सरकारी आर्थिक सवलती व शिष्यवृत्ती • इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी रात्रअभ्यासिकेची सोय • विविध विषयात पुणे बोर्डात प्रथम आलेले अनेक विद्यार्थी व बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यशाची दीर्घ परंपरा • विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी स्पर्धात्मक उपक्रमांसाठी विशेष मार्गदर्शनाची सोय • मासिक पालक सभा • प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सरावासाठी बोर्डाच्या सर्व विषयाच्या प्रत्येकी दहा प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जातात • विद्यार्थी दत्तक योजना • ताणतणावांपासून मुक्त राहण्यासाठी समुपदेशन • पीकशास्त्र विषयाच्या प्रात्यक्षिकासाठी आधुनिक शेती उपलब्ध • माफक फी